# १

# प्राचीन भारतीय इतिहासाची साधने

**घटक रचना:**

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ प्राचीन भारतीय इतिहासाची अलिखित भौतिक / पुरातत्वीय साधने.

१.३ भारतीय भाषेतील लिखित वाङमयीन साधने

१.४ परकीय इतिवृत्ते / साहित्य / प्रवासवृत्तांन्त

१.५ साधनांचे महत्व

१.६ सारांश

१.७ प्रश्न

१.८ संदर्भ

munotes.in

## १.० उद्दिष्ट्ये :

- प्राचीन भारतीय पुरातत्त्वीय साधनांचा अभ्यास करणे.
- प्राचीन भारतीय वाङमयीन साधनांचा अभ्यास करणे.
- प्राचीन भारतीय परकीय साधनांचा अभ्यास करणे.

## १.१ प्रस्तावना :

प्राचीन भारतीय इतिहासाच्या अभ्यासासाठी लिखित व अलिखित दोन प्रकारची साधने आहेत. लिखित साधनांमध्ये भारतीय भाषेतील साधने व परकिय प्रवासवर्णने यांचा समावेश होतो. लिखित साधनाप्रमाणे अलिखित साधने ही अतिशय महत्त्वाची आहेत. कारण त्या साधनामध्ये कोणत्या ही प्रकारचा बदल करता येत नाही. या साधनांच्या आधारे प्राचीन भारताची राजकिय, सामाजीक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक परिस्थितीची माहिती मिळते.

## १.२ प्राचीन भारतीय इतिहासाची अलिखित साधने :

प्राचीन भारताच्या इतिहास व संस्कृतीच्या अभ्यासाठी अलिखित साधने अतिशय महत्वाची आहेत. अलिखित साधनाना **भौतिक साधने किंवा पुरातत्वीय साधने** असेही

म्हणतात. वाङ्मयीन साधना पेक्षा भौतिक साधने अधिक विश्वसनीय असतात. कारण त्यामध्ये कोणताही बदल पुन्हा करता येत नाही. अलिखित साधनाचे पुढीलप्रमाणे प्रकार आहेत

१) **उत्खनन अवशेष :-** भारतीय पुरातत्वखात्याचा महानिरीक्षक म्हणून कनिंगहॅम यांची नेमणूक सन १८६२ मध्ये झाली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली बोधगया, भारहुत, सारनाथ, तक्षशिला इ. ठिकाणी उत्खनन करण्यात आले. लॉर्ड कर्झनने १९०४ मध्ये स्वतंत्र उत्खनन विभाग सुरू केला. त्याच्या प्रमुख म्हणून मार्शलची नियुक्ती केली. डॉ. मार्शल, स्टाईन, ब्लॉक व स्पुनर यांनी या खात्याची धुरा सांभाळली. **डॉ. मार्शलने** तक्षशिला, डॉ. **स्पूनरने** पाटलीपुत्र, **राखलदास बॅनर्जीने** मोहेंजोदडो, **माधोस्वरुप वत्स दयारामजीने** हडप्पा **आर. एन. रावने** लोथल, **बी. बी. लालने** कालीबंगण व ओजियाना येथील ठिकाणी उत्खनन केले.

उत्खननात शहराची व्याप्ती, इमारती, बांधकाम, रस्ते, दिवाबत्ती, सांडपाण्याची व्यवस्था, व्यापारीपेठा, धरणबांधणीची रचना इ. ची माहिती मिळाली. त्याच प्रमाणे दैनंदिन जीवना संदर्भात माहिती देणाऱ्या अनेक वस्तू सापडलेल्या आहेत. त्यामध्ये, धान्य, अलंकार, भांडी, मातीची खपरे, कापडे, शिक्के, मूर्ती, खेळणी, टोपली, शेतीची अवजारे, प्राप्त झाली आहेत. हाडाच्या सांगाड्यावरून प्राणी व मानवाचा वंश याची माहिती मिळाली. भूगर्भशास्त्र, प्रस्तरशास्त्र व कार्बन १४ याच्या आधारे कालमापन निश्चित करण्यात आली. अश्मयुगीन मानवापासून ते गुप्त - सातवाहन काळापर्यंतची माहिती उत्खननातून प्राप्त झाली. त्यामध्ये मानव वंश, व त्याची सामाजिक, धार्मिक, आर्थिक परिस्थितीची माहिती मिळने.

२) **स्मारके :-** स्मारके म्हणजे भूतकाळातील बांधकामाचे अवशेष होय. स्मारकांना राजकीय दृष्टीकोनापेक्षा सांस्कृतिक दृष्टीकोनातून अधिक महत्व आहे. प्राचीन भारतामध्ये लेणी, किल्ले, गढ्या, मंदिर, स्तुप, गुफां, तोरण, मूर्ती, स्तंभ, घरे, राजवाडे चित्रे इ. च्या स्वरूपात स्मारके आढळतात. स्मारकाच्या आधारे तत्कालीन बांधकाम पद्धती, त्याचे तंत्र, लोकजीवन, धर्म संकल्पना, युध्दतंत्र, शस्त्रे - अवजारे, मूर्ती, शिक्षण संस्था व त्यांची शिक्षण पद्धत इ. माहिती मिळते. स्मारके भारतात आणि विदेशातही आहेत. **भारतातील स्मारकांचा** विचार करताना उत्खननातून प्राप्त झालेल्या ठिकाणांचा व वस्तूंचा विचार करावा लागतो. पाटलीपुत्र उत्खननातून मौर्य राजधानीची, **सारनाथ** येथील स्तूप व अन्य अवशेषावरून बौद्ध धर्म व सम्राट अशोकाची माहिती मिळते, तक्षशीला येथून विद्यापीठाची, **जमालगडी** येथून गांधारशैलीच्या शिल्पांची **काश्मीरमधील** उत्खननातून बौध्द, स्तुप व मठ आणि भींतीवरील मृतिकापटची माहिती मिळते. वारानसी, कौसंबी श्रवस्ती अहिछत्र मथूरा येतील उत्खननावरून राजकीय व संस्कृतिक विकासाची माहिती मिळते. पूहारपूर, महास्थान, बंगार, कोमिल्ला येथील उत्खननावरून बौध्द स्थापत्याची माहिती मिळते. उदयगिरी-खंडगिरी लेण्यापासून वेरूळ - अजिंठा लेण्यांची माहिती मिळते. गुप्तकालीन मंदिरापासून ते चालूक्य - यादवकालीन मंदिरांपर्यंतचे प्राचीन स्मारके आहेत.

भारताबाहेर जावा, कम्बोज, मलाया, बालि इ. देशात स्मारके आहेत. कांबोडियामध्ये अंगरकोरवट, जावामध्ये बोरोबुदुरमंदिर या संर्दभात विशेष महत्वाची ठरतात. श्रीलंकेतील अनुराधापूर पोलोनरुवा येथे बौध्द धर्मा संर्दभात माहिती मिळते. प्राचीन स्थापत्य कलेची समृध्दता, गुणग्राहकता, व्यापकता त्यातून दिसून येते.

३) **कला** - पुरातत्वीय सर्वेक्षणाच्याद्वारे ज्ञात झालेल्या विविध प्रकारच्या वस्तु, मुर्ती, शिल्प, चित्र, इत्यादीच्या आधारे तात्कालीन कलेची माहिती मिळते. दगड, लाकूड, धातू, माती या स्वरूपात असंख्य अवशेष प्राप्त झाले आहे. मौर्य, सातवाहन, कुशाण, गुप्त, चालूक्य, वाकाटक, राष्ट्रकुट या राजघराण्याच्या कालखंडात निर्माण झालेल्या कला इतिहासाचे बोलके पुरावे आहे. गुप्तकला, गांधारकला, मथूरा कला, पल्लव कला, इ. महत्वाच्या मूर्ती कला होत्या. मूर्तीवरून व चित्रकलेवरून तत्कालीन केशभूषा, वेशभूषास, अलंकार देवतांच्या मूर्तीवरून धार्मिक परिस्थितीची माहिती मिळते. आजंठा - वेरूळची चित्रकला अप्रतिम आहे. विविध वस्तूमधून तत्कालीन लोकांचे छंद, मनोरंजन, युध्दसाहित्य इ. माहिती मिळते. माती व दगडापासून तयार केलेले शिक्के व मुद्रा प्राप्त झाल्या आहेत. त्यावरील देवदेवता, प्राणी यांची चित्रे व लिपी याची माहिती प्राप्त होते. त्यावरून तत्कालीन धार्मिक संकल्पना, देवदेवतांची कल्पना याचा अभ्यासासाठी उपयोग होतो.

४) **नाणी :-** प्राचीन भारतात राजे, गणराज्ये, व्यापारी संघटना (श्रेणी) यांनी सोने, चांदी, तांबे, शिसे इ. धातूची नाणी तयार केली. १) प्रचलित नाणी साधी व ओबडधोबड असून एका बाजूस आकृतीचे (चित्राचे) ठसे असत. **अलेक्झांडरच्या स्वारीनंतर** नाण्यामध्ये बदल करण्यात आला. नाण्यावर राजाचे नाव, सन व अन्य मजकूर उमटविण्याची पध्दत सुरू झाली. तसेच नाण्याचा आकारमान व वजन निश्चित करण्यात आले. ठसा उमटविलेली भारतीय नाणी खाजगी चलन म्हणून वापरण्यात येत. अशी नाणी विविध श्रेणी व सोनार राजाच्या पूर्वपरवानगीने पाडत असत. या नाण्यावर एकाबाजूला नाणी पाडणाराचे नाव व दुसऱ्या बाजूला राजाचे नाव असत. ज्या प्रदेशात नाणी सापडतात त्यावरून राजाच्या साम्राज्यविस्ताराचे ज्ञान होते. नाण्यावरील देवदेवतांच्या प्रतिमांवरून त्या काळातील धार्मिक जीवनाचे ज्ञान मिळू शकते. नाण्याच्या धातूवरून तत्कालीन आर्थिक जीवनाची माहिती मिळते. नाण्यावरील मुद्रावरून राजाची व त्याचे धार्मिक धोरणाची माहीती समजते. नाण्यावरील लिपी मुळे भाषेचे ज्ञान, तसेच लिपीत झालेला बदल याची माहिती मिळते. प्राचीन जनपद व महाजनपदांनी **अहत नाणी** मोठ्या प्रमाणात पाडली. त्या नाण्यावर प्राणी, नदी, सूर्य, चंद्र, फुले व अनेक धार्मिक चित्र कोरली. **इंडो-ग्रीक** नाण्यावर राजाची नावे, चित्रे, कोरली. **सातवाहन नाण्यावर** हात्ती, बैल, राजाची नावे आहेत. कुशाण, गुप्त, राजपुत घराण्यातील राजानी स्वतःची नाणी निर्माण केली. या नाण्याच्या आधारे तत्कालीन राजकीय, आर्थिक, धार्मिक व सामाजिक व सांस्कृतिक माहिती प्राप्त होती त्यामुळे नाणी इतिहासाचे साधन म्हणून अतिशय महत्वाचे आहे.

५) **आलेख :-** प्राचीन भारताच्या इतिहास लेखनामध्ये आलेखाची महत्वाची भूमिका आहे. हे आलेख पाषाण व ताम्रपटावर कोरलेले आहेत. **बोगाझकोई** हा मध्य आशियातील इ. स. पूर्व १५०० च्या दरम्यानचा **सर्वात प्राचीन** शिलालेख आहे. त्यात ऋग्वेदकालीन मित्र, वरुण इ. आर्यसदृश देवतांचा उल्लेख आहे. आर्यांच्या मूळवसतीस्थानासंबंधीची माहिती मिळते. **सम्राट अशोकाच्या** काळात आलेख कोरण्याची पद्धत अधिक विकसीत झाली.

आलेखामध्ये शिलालेख, गिरीलेख, धातूलेख, स्तंभलेख, गुहालेख, मूर्तिलेख, मंदिरलेख, पत्रलेख, ताम्रपट, भूर्जपत्रे इत्यादींचा समावेश होतो. आलेखामधून राज्यकर्त्यांचा विजय, किर्ती, दानधर्म, उत्सव, चांगले कार्य, व्यापार विषयक, अदभूत, प्रशासकीय, प्रासंगिक, धार्मिक, साहित्यीक इ. संदर्भात वर्णन आहे.

i) **शिलालेख :-** प्रामुख्याने पर्वतीय प्रदेशात मोठ्या खडकावर कोरलेल्या आलेखाना शिलालेख म्हणतात. अशोकाच्या चौदा आलेखाचा सर्वप्रथम उल्लेख शिलालेख म्हणून करतात. हे शाहाबजगडी, मानसेहरा, कालसी, गिरनार, सोपारा, धौली, जौगड, येरंगुडी इ. ठिकाणी आहेत. यामध्ये अशोकाच्या विजयाची, हृदयपरिवर्तनाची, धर्मप्रचाराची, आणि सामाजिक व आर्थिक धोरणाची माहिती मिळते. त्याचे **लहान शिलालेख** म्हणजे बैराठ, जटिंग, रामेश्वर, ब्राम्हगिरी इ. होय. **"प्रियदसि"** नावाने कोरलेले आलेख हे सम्राट अशोकाचे आहेत, याची माहिती सर्व प्रथम **मास्की आलेखावरून** मिळते. कारण "प्रियदसि" नावाबरोबर "असोकस" शब्दाचा उल्लेख केलेला आहे. रूद्रदामन व स्कंन्दगुप्ताचा **जुनागढ शिलालेख**, पुष्यमित्र शुंगाचा **अयोध्याचा शिलालेख,** यामधून त्यांची माहिती मिळते. **हाथीगुंफा शिलालेखा**तून कलिंगचा राजा खारवेलची व नाशिकजवळ पांडवलेणी शिलालेखातून सातवाहन व शक क्षत्रप यांच्या सघर्षाची माहिती मिळते.

ii) **स्तंभ लेख :-** एखाद्या ठिकाणी स्तंभ उभा करून त्यावर कोरलेल्या आलेखाला स्तंभलेख म्हणतात. स्तंभ उभारण्याची **परंपरा सिंधू संस्कृती** पासूनची आहे. परंतू स्तंभावर आलेख कोरण्याची **परंपरा सम्राट अशोकापासून** सुरू झाली. अशोकाचे स्तंभलेख नंदनगढ, लौरिया, दिल्ली, इलाहाबाद येथे प्राप्त झाले. नेपाळमधील रूम्मिनदेई, निगलीवा स्तंभलेखातून अशोकाचे बौध्दधर्म यात्रा यासंदर्भात माहिती मिळते. सांची व सारनाथ स्तंभलेखातून बौध्दधर्मातील मतभेद दूर करण्यासाठी अशोकाने केलेल्या प्रयत्नाची माहिती मिळते. अशोकाचे वायव्यप्रांतातील स्तंभलेख **खारोष्टी लिपीतील** असून बाकी सर्व ब्राम्ही लिपीतील स्तंभलेख आहे.

हेलियोडोरसच्या **बेस़नगर स्तंभलेखातून** बौद्ध धर्माची लोकप्रियता, सामाजिक, धार्मिक इ. माहिती मिळते. **अलाहाबाद** येथील अशोकाच्या स्तंभावर कवी हरिसेन याने समुद्रगुप्ताचा स्तंभलेख कोरला. यशोवर्माचा **मंदसोरचा स्तंभलेख**, दुसऱ्या पुलकेशीचा **ऐहोळचा स्तंभलेख**, **स्कंदगुप्ताया भितरीचा स्तंभलेख**, उल्लेखनीय आहे. काही स्तंभलेखात संस्कृत नाटकाचे प्रवेश, संगीतशास्त्राचे नियम, विशिष्ट दान दिल्याची माहिती मिळते. विशिष्ट योध्दयाचे प्रतीक म्हणून काही स्तंभ (विरगळ) उभारलेले दिसतात. सतीचे प्रतीक म्हणूनही काही स्तंभ आहेत.

iii) **गुहालेख :-** प्राचीन काळात गुहालेख अनेक शासकानी कोरले आहेत. त्यामधून त्यांचे राजकीय जीवन तसेच तत्कालीन सामाजिक, धार्मिक स्थितीची माहिती मिळते. अशोकाच्या धार्मिक सहिष्णूतेची, बराबर गुहालेखातून, दशरथाचे जैनधर्मावरील प्रेमाची **नागार्जूनी गुहालेख**, सातवाहनाच्या उत्पत्ति, मुळस्थांना विषयाची माहिती **नासिक गुहालेखातून**, चंद्रगुप्ताच्या गुजराथ विजयाची **उदयगिरी गुहालेखातून** माहिती मिळते. नाणेघाटचा नागनिकाचा लेख, तसेच कार्ले, अमरावती येथील गुहालेख महत्वाचे आहेत.

iv) **मंदिर लेख :-** भारतामध्ये, मंदिर व बौध्दधर्माचे स्तुप निर्माण करण्याची परंपरा सुरू झाली. तेव्हापासून काही धार्मिक तत्वे सुरक्षित ठेवण्यासाठी व प्रचारासाठी मंदिराच्या भिंतीवर दरवाज्यावर कोरले. भरहुत स्तुपची चारी भिंतीवर "सुगन रजे" हा लेख शुंग शासकानी कोरले

आहेत. भितारी येथील स्कंदगुप्ताचा तर ऐहोल मंदिर परिसरातील पुलकेशीचा आलेख महत्वाचा आहे.

v) **मूर्तिलेख :-** मूर्तिनिर्मितीबरोबर मूर्तिलेख विकसीत झाले. यामध्ये कनिष्कची मूर्तीवरील लेख, जैनमूर्तीवरील राजगुप्ताचा लेख, करमदण्डा व मानकुवरच्या मूर्तीवरील कुमारगुप्ताचा लेख, इ. महत्वाचे मूर्तीलेख आहेत. पिपरवाच्या अभिलेखात गौतम बुध्दाच्या अस्थिंची माहिती मिळते.

vi) **भूर्जपात्र आलेख :-** धातुच्या पत्र्याप्रमाणे झाडाच्या पानाचा ही उपयोग केला जात होता. यामध्ये **पिप्रा कलश** लेख पात्र, **नळदमयंतीयांची** प्रेमपत्रे प्रसिद्धत आहेत.

vii) **ताम्रपट / धातूलेख :-** प्राचीन काळात राजातर्फे एकाद्या व्यक्तीला दान देताना ते तांब्याच्या पत्र्यावर कोरून दिले जात त्यास ताम्रपट म्हणतात. ताम्रपत्रवर प्रथम कुलदेवतेची प्रर्थना, वंशावळी, घराण्याचा इतिहास कोरत असे. त्यानंतर तुझ्यासाठी व काय दान दिले याची माहिती असे. **संजन ताम्रपट**, **सांगली** व **काम्बेचे** ताम्रपटातून रामगुप्तची माहिती मिळते. अमोघवर्षाचे **संजन ताम्रपट**, कुमारगुप्ताच्या काळातील **धनैदह ताम्रपट**, व **बैग्राम ताम्रपट**, हर्षवर्धनचा **बॉसखेडा ताम्रपट** महत्वाचा आहे. **कुशीनगर** येथील तेरा ओळीच्या ताम्रपटान उदान सुत्राची माहिती मिळते.

**आपली प्रगती तपासा :**

१. आलेखाची माहिती द्या.

## १.३ प्राचीन भारतीय इतिहासाची लिखित साधने :

प्राचीन भारताच्या इतिहासाची माहिती देणारी लिखित साधने अतिशय महत्वाची आहेत. लिखित साधनामध्ये विविधता व समृद्धता आहे. भारतीय भाषेतील साधने आणि अभारतीय / विदेशी साधने असे लिखित साधनाचे दोन प्रकार मानले जातात. भारतीय भाषेमध्ये जी साधने उपलब्ध आहेत त्यांचे विभाजन दोन वर्गात करता येते ते म्हणजे **धार्मिक /धर्मग्रंथ आणि धर्मनिरपेक्ष किंवा लौकिक साधने** होय. धर्मग्रंथामधून तत्कालीन धर्माचे स्वरूप आणि समाज रचना यांचे चित्रण रेखाटले आहे. धर्मनिरपेक्ष ग्रंथामधून तत्कालीन आर्थिक, राजकीय आणि ऐतिहासिक घटनांचे संदर्भ दिलेले आहेत.

## अ) हिंदू धर्माचे धार्मिक साहित्य :-

प्राचीन काळापासून भारतीय समाजामध्ये धर्माला अतिशय महत्वाचे स्थान आहे. धर्माचे विचार प्रसार या उद्देशाने धर्मग्रंथाचे लेखन केले. धर्मग्रंथामधून भारतीय राजनिती समाज, धर्म, संस्कृती याची माहिती मिळते. प्राचीन काळात तीन प्रमुख धर्म होते. त्यांनी जे साहित्य निर्माण केले त्याचे विभाजन हिंदु धर्मग्रंथ, बौध्द धर्मग्रंथ, जैन धर्मग्रंथ असे करता येईल. हिंदु धर्मग्रंथामध्ये वैदिक साहित्य, श्रुती वाङमय महाकाव्य, पुराण इ. समावेश होतो. वैदिक साहित्यामध्ये श्रुतीवाङमय सुत्रवाङमय असे दोन प्रकार आहेत. श्रुतीवाङ्मयामध्ये वेद / संहिता, ब्राम्हणग्रंथ, आरण्यके, उपनिषेद, वेदांगे यांचा समावेश होतो.

**१) संहिता / वेद :-** प्राचीन भारताची सर्वात मोठी देणगी म्हणजे **वेद** होय. ते सर्व भारतीय विद्यांचे उगमस्थान आहे. मुळ संस्कृत विद् (जाणणे) धातूपासून वेद हा शब्द-प्रचलीत झाला. वेद या शब्दाचा अर्थ **ज्ञान** असा आहे. धर्मज्ञान संग्रहित करणाऱ्या ग्रंथाना वेद असे संबोधण्यात येऊ लागले. हे ज्ञान पिढ्यानुपिढ्या अखंड **मौखिक परंपरेने** चालत आले आहे म्हणून त्याला **'आगम'** **किंवा** **'श्रुति'** असे म्हणतात. ऋक् / ऋचा म्हणजे श्लोक किंवा छंदोध्द रचना होय. वेदातील मंत्रांना **संहिता** असे म्हणतात. वैदिक वाङ्मयाचे तीन वर्ग पाडता येतील. **पहिला वर्ग म्हणजे संहिता** होय. (संहिता म्हणजे मंत्रसंग्रह किंवा भिन्न भिन्न देवतांना उद्देशून लिहिलेल्या प्रार्थना होय.) **दुसरावर्ग ब्राम्हणग्रंथ किवा आचारधर्म**. **तिसरा म्हणजे उपनिषदे अथवा तत्वज्ञानविषयक** ग्रंथाचां समावेश होय. संहिता म्हणजे वेद होय. वेदामध्ये ऋग्वेद, सामवेद, अथर्ववेद, यजुर्वेद असे चार वेद आहेत. ते पुढील प्रमाणे.

i) **ऋग्वेद :-** भारतातील सर्वात प्राचीन ग्रंथ रचना असून त्याची निर्मिती **इ.स.पू. १५०० ते इ.स.पू. १०००** च्या दरम्यान झाली. ऋग्वेद हा शब्द **ऋक्+वेद** या दोन शब्दापासून बनलेला आहे. ऋक् याचा अर्थ श्लोक किंवा छदंबध्द रचना आणि वेद म्हणजे ज्ञान होय, श्लोकमध्ये / छंदबद्ध रचनेत असलेले ज्ञान म्हणजे ऋग्वेद होय. ऋग्वेदसंहिता म्हणजे इतर तीन वेदांचे उगमस्थान होय. ऋग्वेदातील मंत्र म्हणणाऱ्या पुरोहिताला **'होता'** असे म्हणतात ऋग्वेदात १० मंडले व १०२८ सुक्ते आहेत. ऋग्वेदातील मंडले अनेक ऋषीनी रचली आहेत. पहिल्या, नवव्या, दहाव्या मंडळाचे ऋषी अनेक आहेत. दुसरे मंडळ - **गृत्समद ऋषी,** तिसरे - **विश्वामित्र**, चौथे - वामदेव, पाचवे - **अत्रिऋषी,** सहावे - **भारद्वाज**, सातवे **वासिष्ठ** आठवे मंडळ - **कज्ब व अंगिरसा** ऋषीनी रचले आहे. ऋग्वेदातील कठीण भाषेचा अर्थ समजण्यासाठी **निघण्टू** व **निरूक्त** हे दोन ग्रंथ तयार करण्यात आले. निघण्टू म्हणजे **वैदिक शब्दांचा** कोश असून हा ग्रंथ **कश्यप महर्षींनी** लिहिला आहे. **निघण्टूवरील यास्काचार्यांचे** भाष्य म्हणजे निरूक्त होय. निघण्टुचे चौदा अध्याय आहेत ऋग्वेदातील प्रत्येक सुक्ताच्या प्रसंगी त्याची रचना करणाऱ्या ऋषीचे नाव आणि गोत्र याची माहिती दिलेली आहे. ऋग्वेदातला **मुख्यदेव इंद्र** आहे. त्याच प्रमाणे वरूण देव यांना वाहिलेल्या ऋचा आहे. विश्वाची निर्मिती व विकास यासंदर्भात प्रथम या ग्रंथात माहिती मिळते. लोकांचे जीवन, राजांची नावे, संस्कृती इ. माहिती मिळते. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील पुरूषसुक्तात वर्णव्यवस्थेचा उल्लेख आहे.

ii) **सामवेद :-** सामवेदाची रचना इ.स.पू. **१००० ति इ.स.पू. ५००** च्या दरम्यान झाली. साम म्हणजे गायन होय. यज्ञाच्यावेळी गावयाच्या ऋचा संग्रह म्हणजे सामवेद होय. ३६ प्रकारे वेदमंत्र

यात सांगितले आहेत. गाण्याच्या चालीवर ऋचा म्हणण्याचे काम ज्या पुरोहिताकडे असे त्यास **उदगाता** असे म्हणतात. सामवेदामध्ये **१५४९ ऋचा** आहेत. त्यामधील ७५ ऋचा वगळता बाकीचे उरलेले सर्व ऋचा ऋग्वेदातील आहेत. सामवेदाच्या कौथुम व जैमिनीय अशा दोन संहिता आज उपलब्ध आहेत. आर्चिक व उत्तरार्चिक असे दोन भाग आहेत. आर्थिकात ५०५ रागांचा संग्रह तर उत्तरार्चिकात ४०० गान आहेत. **यज्ञकर्म** व **भारतीय संगीत** यांचा इतिहास समजण्यास सामवेदाचा उपयोग होतो.

iii) **यजुर्वेद :-** यजु (यज्ञ) वेद (ज्ञान) = यजुर्वेद होय. **यज्ञासंदर्भात ज्ञान देणारा ग्रंथ** म्हणजे यजुर्वेद होय. या वेदातील मंत्रांना **'यजस'** म्हणतात. यजुर्वेदामध्ये **शुक्ल व कृष्ण** असे दोन भाग आहेत. **कृष्ण** यजुर्वेदात मंत्र व त्यावरील गधविवेचनयाचा समावेश आहे. भाषेच्या स्वरूपावरून कृष्ण यजुर्वेद हा शुक्ल यजुर्वेदापेक्षा जुना आहे. कृष्ण यजुर्वेदाच्या **तैत्तरीया, मैत्रायणी, काठक, कपिष्ठलकठ, श्वेताश्वर** अशा पाच संहिता आहेत. शुक्ल यजुर्वेदात फक्त मंत्रांचाच समावेश आहे. शुक्ल यजुर्वेदाच्या **काण्व व माधंदीन** अशा दोन संहिता आहेत. शुक्ल यजुर्वेदाचे ४० अध्याय आहेत. प्रार्थना पद्धतीचा प्रारंभ व वाढ, धर्म व त्याचा विकास याची माहिती मिळते या वेदामध्ये कर्मकांडाला प्राधान्य दिलेले आहे. ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद यांना **'वेद त्रयी'** असे म्हणतात.

iv) **अथर्ववेद :-** हा अग्निउपाक पुरोहितांचा वेद आहे. त्याचे मुळ नाव **अथर्वोभिरस** होय. **अथर्व ऋषीने** रचना केल्याने त्याला अथर्ववेद म्हणतात. अथर्ववेदात ४० अध्याय असून, ७३१ सुक्ते व ६००० ऋचा / मंत्र आहेत. याचा एकूण १/३ भाग ऋग्वेदातूनच घेतला आहे. अथर्ववेदाच्या **शौनक व पिप्पलाद** या दोन शाखा आहेत. यामध्ये जादुटोणा, तंत्रमंत्र, अंधश्रद्धा व्रात्यस्तोम इ. विषयाची माहिती आहे. या शिवाय **आयुर्वेद, अर्थशास्त्र** यांची सुरूवात यामध्ये आढळते. या वेदामध्ये आर्य-अनार्य याच्या विचारांचा समन्वय स्पष्ट स्वरूपात दिसतो हे महत्वाचे आहे.

२) **ब्राम्हणग्रंथ :-** ब्रम्हा म्हणजे यज्ञकर्मातील एखाद्या मुद्द्यावर केलेले विवेचन म्हणजे **ब्राम्हण** होय. ब्राम्हणांचे वर्णन यज्ञशास्त्रग्रंथ असेही करता येईल ब्राम्हाण ग्रंथ जास्त प्रमाणात **गद्यशैली** असून, धर्म व यज्ञाच्या संदर्भात माहित आहे. ब्राम्हण ग्रंथातील विचारसरणी **गुढवादी, प्रतिकात्मक व रूक्ष** आहे. या ग्रंथाचा मुख्य विषय म्हणजे **मूळ वेदातील कठीण विभागाचे स्पष्टीकरण** करणे होय. त्याचे **विधि व अर्थवाद** असे दोन भाग आहेत**. विधि** विभागात यज्ञाचे विधी कसे करावेत तर **अर्थवाद** विभागात यज्ञकर्म, मंत्र यातील हेतू, अर्थ यांचे विवेचन केले आहे. प्रत्येक वेदापासून निरनिराळे ब्राम्हणे तयार झालेले आहेत.

**ऋग्वेदाची ऐतरेय व कौषीतकी** ही दोन ब्राम्हणे आहेत**. ऐतरेय ब्राम्हणात** सोमयाग, अग्निहोत्र, राजसूय यज्ञाचे वर्णन आहे. **कौषीतकि ब्राम्हणात** ऋतुयाग, सोमयाग, अग्नयधान इ. माहिती आहे. **सामवेदाची** पंचविश (तांड्य) व षड्विंश ही दोन ब्राम्हणे आहेत. **पंचविश ब्राम्हणात** व्रात्यस्तोम विधीचे वर्णन आहे. **यजुर्वेदाची** तैत्तिरीय व शतपथ ही दोन ब्राम्हणे आहेत. **तैत्तिरीय ब्राम्हण** हा कृष्ण यजुर्वेदाच्या संहितेचा उत्तरभाग असून, पुरूषमेधाच्या वर्णनावरून वेदकालीन यज्ञसंस्थेत नरमेधाय अंतर्भाव होत असे. सर्व ब्राम्हणात **शतपथ ब्राम्हण** हे प्रमुख

ब्राम्हण आहे. शुक्ल यजुर्वेदाचा ब्राम्हणग्रंथ आहे. शंभर अध्याय आहेत. **अथर्ववेदाचे गोपथ** ब्राम्हण आहे या मध्ये बराचसा भाग ऐतरेय व शतपथ ब्राम्हणातून घेतला आहे. एकूण सात ब्राम्हणे आहेत ते म्हणजे एतरेय, कौषीतकी, पंचविश, षडविंश, तैत्तिरीय, शंतपथ गोपथ इ. होय. ब्राम्हण ग्रंथातून तत्कालीन बैदिकधर्म, सामाजिक, राजकीय, आर्थिक जीवनाची माहिती मिळते.

३) **आरण्यके :-** ब्राम्हण ग्रंथाची **पुरवणी** म्हणजे आरण्यके होय. आरण्यके म्हणजे अरण्यात असताना ऋषीमुनीच्या चिंतनातून प्रकटलेले ग्रंथ होय. यज्ञाचे मुळस्वरूप, त्याचे गुढार्थ, तत्वज्ञान याचे विवेचन करणे. उपनिषदाची सुरूवात **आरण्यके पासून** झाली असे म्हणावयास वाटते.

४) **उपनिषदे :-** वैदिक आर्याच्या **तत्वज्ञानाचे पूर्णरूप** म्हणजे उपनिषदे होय. आरण्यकांत ब्राम्हज्ञानाची जेवढी चर्चा झाली, तेवढ्या भागाला **उपनिषद** म्हणतात. ब्राम्हाणग्रंथाच्या नंतर **आरण्यके व उपनिषदे** येतात म्हणून त्यांना **वेदान्त** असेही म्हणतात. वैदिक ज्ञानाचा अंतिम निष्कर्ष व ध्येय यामध्ये सांगीतले आहे. असे शंकराचार्य सांगतात. उपनिषद हा शब्द **उप नि सद** म्हणजे **'जवळ बसणे'** या धातूपासून निघाला असून त्याचा मूळ अर्थ गुढज्ञानाची माहिती घेण्यासाठी छात्राने गुरूजवळ बसणे हा आहे. उपनिषदे ही ब्राम्हणग्रंथाची अंगभूत **अंगे** आहेत. मुख्य उपनिषद ही इ.स.पू. १२०० ति ६०० पर्यंतच्या काळात रचली आहेत. **जीवात्मा व परमात्मा** या दोन विषयाचे तात्विक विवेचन या ग्रंथातून केलेले आहे. **'तत्वमसि'** हा उपनिषदांच्या तत्वज्ञानाचा गाभा आहे. भारतीय तत्वज्ञानाची बैठक उपनिषदांनी घातली आहे. आत्मज्ञानासाठी तप, संन्यास, योग इ. मार्ग सांगीतले आहे. **वेवरच्या** मते २३५ उपनिषदे आहेत. **मुक्तिकोपनिषदात** १०८ उपनिषदे सांगितली आहे. ईंश, केन, कठ, प्रश्न, मुण्डक, माण्डूक्य, तैत्तिरीय, ऐतरेय, छान्दोग्य, बृहदारण्यक ही **दशोपनिषदे जूनी व महत्वाची** आहेत. कौषीतकी, मैत्रायणी, श्वेताश्वर मिळून **त्रयोदश उपनिषदे** प्रसिद्ध आहेत.

५) **वेदांगे** - वेदाची पुरकशास्त्रे म्हणजे वेदांगे होय. वेद परंपरातील सिद्धांत सुत्ररूपाने एकत्र ग्रंथित करण्यात आले या वाङःमयास सुत्रवाङ्मय असे म्हणतात. श्रवण परंपरेने आलेले ज्ञान स्मरणात राहण्यासाठी हे वाङमय असल्याने त्यास **स्मृती** असे म्हणतात. हे ग्रंथ वेदांच्या अंतर्भूत असल्याने त्यांना वेदांगे म्हणतात. एकूण ६ वेदांगे आहेत. १) शिक्षा या वेदांगामध्ये स्पष्ट उच्चार आणि संहिता - पाठ कसा घ्यावा याची माहिती आहे. शिक्षेच्या ग्रंथाना **प्रातिशाख्ये** असे म्हणतात. २) **कल्पयाचे** तीन भाग आहे. **श्रौतसुत्र** - यज्ञ व इष्टी संबंधीचे नियम सांगीतले आहे. **गृहसुत्र**-यामध्ये इहलोक व परलोक या संबंधीची कर्तव्य सांगीतली आहे. **धर्मसुत्र**-यामध्ये सामाजिक जीवनासंदर्भातील नियम आहे. शुल्क सुत्र-यामध्ये यज्ञकुंडाच्या रचनेसंदर्भात माहिती दिलेली आहे. कल्पसुत्रामध्ये धर्म, समाज, राजनिती संदर्भात माहिती सांगीतलेली आहे. ३) **व्याकरण** - यामध्ये व्याकरण विषयक नियमांचे विवेचन केले आहे. पाणिनीच्या **अष्टाध्यायीला** वेदांग व्याकरण मानतात. ४) **निरूक्त** - वेदातील कठिण भाषेचा अर्थ सांगितलेला आहे. निरूक्त हा ग्रंथ यास्काचार्यांनी लिहिला. ५) **छंद** - वैदिक मंत्र विशिष्ट छंदातच म्हंटला पाहिजे असा दंडक होता. त्यामुळे या शास्त्राचा विकास झाला. पिंगलाची छन्दसुत्रे ही वेदांगे मानली जातात. ६) **ज्योतिष** - यामध्ये ऋग्वेद ज्योतिष, यजुर्वेद ज्योतिष,

munotes.in

अर्थवेद ज्योतिष असे तीन भाग आहेत. ग्रह कालगणना, नक्षत्र, युगकल्पना इ. माहिती आहे. आर्यभट्ट, लल, वराहमिहिर, ब्रम्हगुप्त, भास्कराचार्य इत्यादींना ज्योतिषशास्त्राची प्रगती केली.

६) **उपवेद** - आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्ववेद, शिल्पकला व इतर कला या विषयावरील ग्रंथ म्हणजे **उपवेद** होय. अर्थशास्त्र हा ग्रंथ उपवेदांत यामध्ये समावेश होतो.

७) **धर्मशास्त्रे व स्मृति वाङ्मय** - प्राचीन भारताच्या कायदेविषयक साहित्याला **धर्मशास्त्र** म्हणतात. हिंदू कायदयाची मुळ बिजे **कल्पसुत्रातील धर्मसुत्र**, व गृहसूत्र यामध्ये सापडतात. सर्व धर्मसुत्रांत गौतमाचे धर्मसुत्र हे प्राचीन असावे. बौध्दायन धर्मसूत्र, वाशिष्ठधर्मसुत्र मानवधर्मसुत्र, हारितधर्मसुत्रे इ. धर्मशास्त्रे आहेत. धर्मशास्त्रा प्रमाणेच स्मृतिचे महत्व असाधारण आहे. वारसाहक्क, दानविधान, स्त्रीधन, कुटुंबपद्धत, माहमाना इ. संदर्भात हिंदुकायदा स्मृतिग्रंथ आहेत. मनुस्मृती ही प्राचीन असून याज्ञवलक्य, विष्णू नारद, पराशर, बृहस्पति इ. स्मृतिग्रंथ आहेत.

८) **महाकाव्य** - रामायण व महाभारत ही दोन महाकाव्य आहेत. रामायण हे महाकाव्य वाल्मिकीने रचले असून ते ७ कांड आणि २४००० श्लोक आहेत. त्याला **आदिकाव्य** म्हणतात. महाभारताची रचना **व्यास** यांनी केली. कौरव-पांडव यांच्यातील संघर्ष वर्णन केले आहे. महाभारतामध्ये **१ लाख श्लोक** आहेत म्हणून त्याला **शतसाहस्त्री संहिता** म्हणतात.

९) **पुराण** - पुराणांची रचना इ. स. ४०० च्या दरम्यान झाली असावी. १८ पुराणे व १८ उपपुराणे आज उपलब्ध आहेत. विष्णू, वायू, मत्स्य, ब्रम्ह, भविष्य ही पुराणे इतिहायाची साधन म्हणून उपयुक्त आहेत. प्रत्येक पुराणाचे पाच भाग पाडले आहेत. पुराणातून राजकीय, सामाजिक, धार्मिक माहिती मिळते.

**आपली प्रगती तपासा :**

**१.** वेदांची माहिती द्या.

___

___

___

___

___

**ब) बौद्ध धर्माचे धर्मग्रंथ व लौकिक साहित्य :**

बौद्ध धर्माचे धर्मग्रंथ पाली, मागधी, संस्कृत इ. भाषेत लिहिले आहेत. त्रिपिटक, दीपवंश, महावंश, महावस्तू, ललित-विस्तार, बुद्धचरित मिलिन्दपन्हा इ. महत्त्वाचे ग्रंथ आहेत.

**त्रिपिटक :**

बौद्ध धर्मग्रंथामध्ये महत्त्वाचे साहित्य आहे. विनय पिटक, सुत्तपिटक, अभिधम्मपिटक या तीन पिटकांना त्रिपिटक म्हणतात. त्रिपिटकाचे एकूण तीन भाग आहेत. ते पुढीलप्रमाणे.

**१) विनयपिटक :** भिक्षू - भिक्षूणी यांना पाळावयाच्या शिस्तीसंबंधीचे नियम सांगितले आहे. प्रारंभ ते १५२ असून, नंतरच्या काळात २२७ नियम झाले. विनयपिटकाचे तीन भाग आहेत.

**i) सुतविभाग :** याचे माहविभंग, भिक्षुणी विभंग दोन भाग आहेत. माहविभंगमध्ये प्रायश्चित्त विषयी माहिती असून आठ प्रकरणे आहेत. भिक्षुणी विभंगमध्ये नियम आहेत.

**ii) खण्दक :** याचे दोन भाग आहेत. महावग्गमध्ये संघाची स्थापना, प्रवेश, नियम या संदर्भात दहा प्रकरणे आहेत. चुल्लवग्गमध्ये बुद्ध जीवन, संघाचा इतिहास भिक्षूचे नियम या संदर्भात बारा प्रकरणे आहेत.

**iii) परिवार :** यामध्ये वरील तीन भागाची माहिती प्रश्नोत्तर पद्धतीची आहे.

**२) सुत्तपिटक :** बौद्ध धर्माचे तत्वज्ञान असून धर्माची रुपरेषा स्पष्ट करते. याचे पाच संग्रह आहेत त्यांना निकाय असे म्हणतात.

**i) दीघनिकाय :** गौतमाच्या ३४ प्रवचनांचा संग्रह आहे. शिलाखंड, महावग्ग, पातिकवग्ग असे तीन उपविभाग आहेत. महापरिनिब्बानसूत्त हे प्रमूख असून बुद्धाच्या अंतिम जीवनाची कथा आहे.

**ii) मज्झिमनिकाय :** यामध्ये ५० सुत्र आहेत. बौद्धधर्माचे सिद्धांत व भिक्षूचे जीवनासंदर्भात माहिती आहे. धर्म कल्पना व समाजशास्त्राची माहिती आहे.

**iii) संयुक्तनिकाय :** बुद्धाच्या जीवनातील घटना, देवी-देवता, बौद्धधर्म सिद्धांत या संदर्भात माहिती आहे.

**iv) अंगुतरनिकाय :** यामध्ये ११ निपात म्हणजे भाग आहेत. प्रत्येत निपाकाचे अनेक भाग म्हणजे उपविभाग आहेत. बुद्धाच्या प्रवचनाची गुणानुक्रमाने मांडणी केली आहे.

**v) खुद्दनिकाय :** पुरवणी स्वरुपाचा संग्रहात्मक भाग आहे. धर्माची शिकवण, बुद्धाचे जीवन, धर्माची लोकप्रियता या संदर्भात माहिती आहे. खुद्दकपाठ, धम्मपद, उदान, इतिउत्तक, सुत्ननिपात, विमानवथ्थू, पतवथ्थू, थेरगाथा, थेरीगाथा, जातक, निद्देस, पतिसंविधामग्ग, अपदान, बुद्धवंश, चरियापिटक इ. खुद्दनिकायचे उपविभाग आहेत. धम्मपद हा सर्वात लोकप्रिय व प्रसिद्ध ग्रंथ आहे.

**उदान :** बौद्ध नितीचे विवेचन, इतिउत्तक : गौतमाच्या वचनांचा संग्रह, सुत्ननिपतात सुंदर संवाद सुक्ते व ब्रहोघे आहेत. थेरगाथा-थेरीगाथा - भिक्षू-भिक्षणी यांनी रचलेल्या कवितांचे संग्रह आहेत. जातक - बुद्धाच्या पूर्वजन्माच्या कथांचा विग्रह आहे.

जातकामध्ये ५४९ कथा आहेत. जातक कथांनी वाङ्मय, शिल्प कला यांना अनेक विषय पुरवले आहेत. आपदानमध्ये वीर व उदात्त कृत्यांच्या कथा आहेत.

**३) अभिधम्मपिटक :** सुत्तपिटकातील विषय प्रश्नोत्तर स्वरुपाने हाताळले आहेत. धम्मसंगणी, विभंग, धातुकला, पुग्गलपज्जत्रि, कथावस्तू, यमक, पठ्ठान ही सात प्रकरणे आहेत. मोग्गलिपुत्र तिस्सने तिसऱ्या बौद्ध परिषदेत संकलित केलेला 'कथावस्तू' हा सर्वाधिक महत्त्वाचा आहे.

**बौद्धधर्माचे लौकिक साधने :**

**दीपवंश :** याची रचना ४-५ शतकाच्या दरम्यान झाली. यामध्ये सिंहलीद्विपचा इतिहास आहे.

**महावंश :** महानाम कविने ५ व्या शतकात याची रचना केली.

**महावस्तू :** बुद्धाचे जीवनवृत्तांत सांगितला आहे. मिश्रित संस्कृत भाषेत लिहिला आहे. हीनायान पंथाच्या संबंधीत असूनही महायानपंथाची माहिती आहे.

**ललितविस्तर :** बुद्धाचे लौकिक जीवन मांडले आहे. बुद्धाला दिव्यशक्तिच्या रुपाने मानले.

**बुद्धचरित :** अश्वघोषने संस्कृत भाषेमध्ये बुद्धाचे चरित्र लिहिले आहे.

**सौन्दरनंद :** अश्वघोषने हे महाकाव्य संस्कृत भाषेत रचले आहे. बुद्धाचे जीवन, बौद्ध धर्माचे सिद्धांत मांडले आहेत.

**भवदान साहित्य :** अशोकाच्या उत्तराधिकारीपासून ते पूश्यमित्र शृंगापर्यंतची राजकीय माहिती आहे.

**मिलिन्द पन्हो :** राजा मिलिन्द आणि भन्ते नागसेन यांच्यातील प्रश्नोत्तर स्वरुपात आहे.

**पाली भाषेतील लौकिक ग्रंथ :** महाकश्यप याने नेत्तिकपकरण, पेटकोपदेश हे ग्रंथ लिहिले आहेत. बुद्धघोष याने विशुद्विमग्ग, सामन्तपाशादिका, सुमंगलविलसिनी इ. ग्रंथ लिहिले. त्रिपिटकावर अनेक टीका ग्रंथ लिहिले. बुद्धदत्ताने विनयविनश्रय, उत्तरविनिश्रय, अभिधम्मावतार, रुपारुपविभंग, जीनालंकार इ. ग्रंथ रचना केली. कावेरी तीरावर कन्हदासाने बोधीच्या संघारामात वास्तव्य होते. आनंदने मूलटीका ग्रंथ लिहिला. धम्मपालाने परमथ्यदीपणि, खुद्दकनिकायावर टिका; परमथ्यमंजुष, इ. ग्रंथ लिहिले. उपसेनाने संघम्मप्पज्योतिका, चुल्लधम्मपालाने सज्जसंखेप इ. रचना केली.

**आपली प्रगती तपासा :**

१) पाली भाषेतील साहित्य सांगा.

munotes.in

**क) जैन धर्माचे धर्मग्रंथ व लौकिक साहित्य :** महावीराची शिकवण मौखिक पद्धतीने संग्रहीत केले त्यास संग्रहास पूर्व म्हणतात. त्याची १४ संख्या आहे. जैन वाङ्मयाचे सहा भाग असून ते १२ अंगे, १२ उपांगे, १० प्रकिर्ण, ६ छेदसुत्र, मुळसुत्र, अन्य संकिर्ण वाङ्मय होय. जैन आगम मध्ये १२ अंगे महत्त्वाची आहे. यामध्ये भिक्षूचे नियम, जीवन पद्धत महावीराचे जीवन व कार्य, शिकवण याची माहिती आहे. आचारंगसुत्रमध्ये धर्मगुरुच्या आचारविषयीचे नियम. भगवती सुत्रामध्ये सिद्धांत व तत्व सविस्तर मांडली आहे. १२ उपांगमध्ये पौराणिक घटना, भूगोल, खगोलशास्त्र विश्व या संदर्भात चर्चा केली आहे. १० प्रकिर्णांमध्ये अनेक विध सिद्धांताची माहिती आहे. ६ छेदसुत्रामध्ये धर्मगुरुंच्या आचार, नियम यांची माहिती आहे. मुळसुत्रामध्ये धर्माची तत्वे वेगळ्या पद्धतीने मांडली आहेत. संकिर्ण वाङ्मयामध्ये कथा, काव्य, यांचा समावेश होते. (हरिभद्रचे समरादित्यकथा, धुताख्यान ग्रंथ आहेत. उघोतनसुरीने कुवलमाला ही धर्म कथा लिहिली. महेश्वरसूरीचे जिनपंचमीकता, शीलाचार्याने महापुरुषस् हा ५४ संताचा चरित्र ग्रंथ लिहिला आहे.)

**ड) धर्मनिरपेक्ष किंवा लौकिक साधने** - धर्मग्रंथाशिवाय जी इतर साहित्य आहेत ती धर्मनिरपेक्ष साधने होय. ही साधने संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश, द्राविड कन्नड इ. भाषेत आहेत. या शिवाय प्राकृत भाषेच्या पाली, अर्धमागधी, मागधी, शौरसेनी, महाराष्ट्री इ. अनेक उपप्रकारच्या भाषेतील साधनामध्ये लेखन झालेले आहे. धर्मनिरपेक्ष साधनामध्ये चरित्रे, काव्य, कथा कादंबरी, नाटक, शास्त्रीय साधने महत्वाची आहेत.

१) **चरित्र ग्रंथ** - प्राचीन भारतामधील चरित्रग्रंथ हे महत्वाचे साधन आहे. अश्वघोषचे **बुद्धचरित्र** हा सर्वात प्राचीन चरित्रग्रंथ आहे. बाणभटाच्या हर्षचरित्र मधून हर्षवर्धनाची माहिती मिळते. **वाक्पतीने** कनोजच्या यशोधर्मनच्या जीवनावर गौडवहो या चरित ग्रंथाचे लेखन केले. बिलहाणाने चालुक्य राजा विक्रमादित्याच्या जीवनावर **विक्रमांकदेवचरित्र**, जयसिंहाने – कुमारपालचरित्र, भोजप्रबंध इ. महत्वाचे चरित्र ग्रंथ आहेत. त्यामधून ऐतिहासिक माहिती मिळते.

२) **काव्य** - संस्कृत काव्याचा उदय इ. स. पूर्व दुसऱ्या शतकात झाला असावा. संस्कृत काव्याचे बीज वैदिक वाङमयात आढळते. आज सर्वात जुने असे उपलब्ध काव्य म्हणजे अश्वघोषचे **बुद्ध चरित्र** होय. **अश्वघोषचे** सौदशनंद, बुद्धचरित्र, **कुमारलाटचे** सुत्रालंकार, **कालिदासचे** कुमार संभव, मेधदुत, रघुवंश, **भारविचे** - किरातार्जुनीय इ. प्रमुख काव्य आहेत. या शिवाय काही **लौकिकगीते** आहेत. त्यामध्ये नलोदय, शृंगारतिलक, इ. समावेश होतो. प्राचीन काळातील **कविता संग्रहामध्ये** कवीन्द्र - समुच्यय, सदुक्तिकरणामृत, सुभाषित मुक्तावली इ. काव्य संग्रहाचा समावेश होतो. या काव्यामधून तत्कालीन संस्कृतीचे स्वरूप पहावयास मिळते.

३) **नाटक** - भारतीय नाट्याचे उगमस्थान **ऋग्वेदात** आहे. वेदकालीन मुकाभिनय व करमणूकीकरता सांगितलेल्या दंतकथा यांच्या संयोगामुळे नाटकाचा उदय झाला असे म्हणता येईल. भारतीय नाट्याची जन्मभूमी **शैरसेनची** राजधानी **मथूरा** होय. अश्वघोष हा सर्वात प्राचीन नाटककार असून त्याचे सारीपुत्त - प्रकरण हे नाट्य वाङमयातील पहिले नाटक मानले जाते. **भासाने** १३ नाटके लिहिली. **कालिदासने** शाकुंतला, मालविकाग्निमित्र, विक्रमोर्वशीय ही नाटके लिहिली. **विशाखादत्ताने** मुद्राराक्षस हे चंद्रगुप्ताच्या जीवनावर नाटक लिहिले आहे.

**हर्षवर्धनाची** नागानंद, रत्नावली, प्रियदर्शिका ही नाटके आहे. **भट्टनारायणचे** वेणीसंहार, **भवभूतिचे** मालतीमाधव, महावीरचरित्र, उत्तररामचरित्र इ. नाटके आहेत. नाटकामधून तत्कालीन राजकीय, सामाजिक, धार्मिक जीवनाची माहिती प्राप्त होती.

४) **कथा - कादंबरी** - कथा वाङमयाची सुरूवात वेदामधील **पुरूरवा-उर्वशीच्या** कथापासून झाली. दंतकथा, आख्यायिका, गोष्टी, परिकथा इ. **कथाचे प्रकार** आहेत. **अतिप्राचीन कथासंग्रह** म्हणजे बौद्धधर्मीयांचे **अवदान** हा होय. पंचतंत्र, जातककथा, बृहदकथासंग्रह या दंतकथा आहेत. आंध्रप्रदेशाचा प्रधान **गुणाढ्याने** बृहकथा पैशाची भाषेत लिहिली आहे. **सोमदेवाचे** कथासरितसागर, **क्षमेन्द्राचे** बृहतकथामंजरी **दंडीचे** दशकुमारचरित्र **सुबन्धुने** वासवदात्ता कथा लिहिली. शुकसप्तती या कथेचे फारशी भाषांतर **तुतीनामा** या नावाने केले आहे. श्रीहर्षांच्या दरबाराचा राजकवी **बाणभट्टाने** कादंबरी व हर्ष चरित्र दोन ग्रंथ लिहिले. या साहित्यातून लोकजीवन, लोकसमजूती, राजा - सामान्य माणसाचे जीवन याची माहिती मिळते. कादंबरी हा प्रकार **बाणभट्टाने लोकप्रिय** केला.

५) **शास्त्रीय वाङ्मय** - शास्त्रीय वाङमयाची सुरूवात वैदिककाळात झालेली दिसते. शास्त्रीय वाङमयाच्या अनेकशाखा आहेत **१) व्याकरण** - भारतीयांचे **आद्यशास्त्र** म्हणजे व्याकरण होय. त्याच्या अभ्यासाची सुरूवात शाकल्याच्या ऋग्वेदाच्या पदाने झाली. **निरूक्त** हा या विषयावरील **पहिला ग्रंथ** आहे. **पाणिनीचे** अष्टाध्याची (शब्दानुशासन), **कात्यायनाचे** वार्तिक, **पंताजलीचे** महाभाष्य **भर्तुहरीचे** वाक्यपदीय इ. महात्वाचे ग्रंथ आहेत. पंतंजलिचे महाभाष्य हे सर्वात जुने भाष्य होय. **२) कोष** - भारतामध्ये कोषरचनेची सुरूवात **कश्यपमुनीच्या निधण्टू** ग्रंथापासून झाली. **धातुपाठ व गणपाठ** ही कोशाची पूर्वतयारी असे म्हणावे लागले. प्राचीन काळातील **आद्यकोष** म्हणजे **अमरसिंहाचे** नामलिंगानुशासन (अमरकोश) होय. या ग्रंथावरील सर्वांत प्राचीन टिका लिहिली ते म्हणजे क्षीरस्वामींची **उदघाटन** होय. सर्वानंदाने टीकासर्वस्व या नावाने ही टिका इ. महत्वाचे ग्रंथ आहे. **३) धर्मशास्त्र** - प्राचीन भारताच्या कायदेविषयक साहित्याला धर्मशास्त्र हे नाव आहे. कल्पसुत्रातील धर्मसुत्रे व गृहसुत्रे यामध्ये **कायद्याचा उगम** झाली. **गौतमाचे** धर्मसुत्र, वाशिष्ठचे धर्मसुत्र, बैधायनचे धर्मसुत्र, वैष्णावचे धर्मसुत्र इ. महत्वाची आहेत. **४) स्मृति** - धर्मशास्त्रावरील सर्वात लोकप्रिय ग्रंथ म्हणजे मनुस्मृति होय. याज्ञवलक्य स्मृति, नारदस्मृति बृहस्पतिस्मति इ. ग्रंथ महत्वाचे आहेत. हिंदु **कायदा स्मृतिवर** आधारलेला आहे. **५) छंदशास्त्र पिंगलाचा छंद** - सुत्र हा छंदशाष्यावरील पहिला ग्रंथ होय. भरत, जयदेव, वराहमिहिर, उत्पलाने ही छंदशास्त्राच लेखन केले. **६) नाट्यशास्त्र** - भरतमुनीचे नाट्यशास्त्र हा यावरील पहिला ग्रंथ होय त्याला **नाट्यवेद किंवा पाचवावेद** असेही म्हणतात. **धनंजयचा** दशरुपक **विश्वनाथचा** साहित्यदर्पन हे नाट्य शास्त्राचे प्रमुख आहेत. **धनिकाने** अवलोक नावाची टिका लिहिली. नाट्यशास्त्राबद्दलची माहिती आहे. **७) साहित्यशास्त्र** - साहित्यशास्त्रावरील **सर्वात प्राचीन ग्रंथ** म्हणजे **अग्निपुराण** होय. भामह व **दंडी यांनी** साहित्यशास्त्रावर स्वतंत्रपणे ग्रंथनिर्मिती केली. **भामहाचे** काव्यालंकार, **दंडीचे** काव्यादर्श, उद्‌भटाचे अलंकारसारसंग्रह, वामनचे काव्यालंकारसुत्र रुद्रटचे काव्यालंकार, **राजशेखरचे** काव्यमीमांसा इ. महत्त्वाचे ग्रंथ आहेत. ८) **राज्यशास्त्र** - राज्यशास्त्रात अर्थशास्त्र, दंडनिती,

राजनिती, नितीशास्त्र असेही म्हणतात. कायदा, अर्थशास्त्र व समाजशास्त्र इ. माहीती या शास्त्रामध्ये येते. महाभारताच्या शांतिपर्व धर्मसूत्र, धर्मशास्त्र यामध्ये याची माहिती मिळते. राज्यशास्त्रामधील कौटिल्याचे अर्थशास्त्र हा महत्त्वाचा ग्रंथ आहे. **कामन्दकचे** नितिसार **सोमेश्वराचे** 'अभिलाषितार्थ - चिंतामणी, इ. ग्रंथ आहेत. **९) ज्योतिषशास्त्र** - भारतीय ज्योतिषाशास्त्राची सुरुवात वैदिक ऋचात आढळते. यजुर्वेदात ४३, ऋग्वेदात ३६ श्लोक ज्योतिष शास्त्रावर आढळतात. गार्गीसंहिता , वृध्दगर्गसंहिता (सर्वात जूना ग्रंथ) सुरिप्यपण्णती, महाभारतातील काही भागामध्ये, मानवधर्मशास्त्र यामध्ये माहिती आढळते. **१०) कामशास्त्र** – सुसंस्कृत व रसिक नागरिक, राजकन्या, उच्चपदवीच्या मुली व गणिका यांच्यासाठी कामशास्त्र आहे असा उल्लेख सापडतो कामशास्त्र ग्रंथामध्ये स्त्रीपुरुष संबंध हा मुख्य विषय असला तरीही लोकजीवनाची माहिती मिळते. मल्लनाथ-वात्स्यायनाचे 'कामसुत्र' हा **सर्वात** प्राचीन ग्रंथ होय. यशोधर इंद्रपादचे **जयमंगल** कोकाचे **रतिशास्त्र** कल्याणमल्लचे **अनंगरंग** हे महत्त्वाचे ग्रंथ आहेत. जयमंगला हा ग्रंथ कामसुत्रावरील टीका होय **११) वैद्यक शास्त्र** - याचा प्रारंभ अर्थवेदातील **कौशिकसुत्र** मध्ये झाला. अथर्ववेद व शतपथब्राम्हण यामध्ये आरोग्यशास्त्र, शरीरशास्त्र या संदर्भात माहीती आहे प्रथम श्रेणीचा अत्रिय याला मानले जाते. भारतीय वैधकशास्त्राताचे तीन तज्ञ म्हणजे चरक, सुश्रूत वाग्भट इ. होय त्यांनी लिहिलेल्या ग्रंथाना संहिता म्हणतात. चरकसंहिता, सुश्रुतसंहिता, अष्टांगहृदयसंहिता (वाग्भटची) इ. महत्वाचे ग्रंथ आहेत. **१२) खगोलशास्त्र** – भारतीय खगोलशास्त्राच्या विकास मुख्यत्वेकरून **उत्तरवेदकाळात** झाला 'सिध्दांन्त' व कारण या संदर्भात ग्रंथ लिहिले. ब्राह्मणग्रंथामधून विश्वरचनेसंबंधीची मालिका त्यामध्ये उगम झालेली आहे. आर्यभट्टांचा **'आर्यभटीया (आर्य सिध्दांत)'** वराहमिहिरचा **पंचसिद्धांतिक,** ब्रह्मगुप्ताने **ब्रह्म-स्फुट सिध्दांत'**, भास्कराचार्याने **सिध्दांन्तशिरोमणी** हा ग्रंथ लिहिला. **१३) गणितशास्त्र** - आर्यभट्ट ब्रम्हगुप्त भास्कर हे प्रसिध्द खगोलशास्त्रज्ञ आणि गणितीही होते. अंककणित बीजगणित, भूमिती याचा अभ्यास ग्रंथामध्ये आहे. ब्रह्मगुप्ताचा **ब्रम्हस्फुटसिध्दांन्त** भास्कराचा **सिध्दांन्त शिरोमणी** हे ग्रंथ आहेत. ब्रह्मगुप्ताच्या ग्रंथात **कुट्टक** हे अध्यायान **बीजगणिताचा** विषय आहे. भास्कराच्या ग्रंथातील **लिलावती** अध्यायात **अंकगणिताची** चर्चा केली आहे. **दशमान पध्दतीचा** पुरस्कार प्रथम भारतीयांनी केला. **शुन्याचा शोध** भारतीयांनी लावला. **त्रिकोणमितीचा उपयोग** खगोलशास्त्रासाठी केला. शुल्कसुत्रामध्ये भूमितीशास्त्राचा उगम स्थान आहे. **१४) रसायनशास्त्र** – या विषयावरील प्रमुख ग्रंथ म्हणजे नागार्जूनचा 'सिध्दनागार्जून' होय. त्यामध्ये पाऱ्यासंबंधीचे विचार मांडले आहेत.

६) **संगमसाहित्य** – दक्षिण भारताच्या इतिहासाच्या अभ्यासात उपयुक्त ठरणारे **तामिळी भाषेतील** संगम साहित्य होय. **पांड्य राजाद्वारे मदुराई** येथे विद्वानांची साहित्य परिषद भरवली. त्यामधून ज्यासाहित्याची निर्मीती झाली त्यास संगम साहित्य असे म्हणतात. **पहिली परिषद /संगम मदुराई /मदुरा** येथे भरते. ५४९ लेखकांनी लेखन केले. आज एकही ग्रंथ उपलब्ध नाही. दुसरे **संगम** कपाटपुरम / अलईवई येथे भरले त्यामध्ये ४४९९ लेखकांच्या ग्रंथाचे परिक्षण केले. तामिळी भाषचे व्याकरण 'तोलकाप्पियम' नावाचा एक ग्रंथ उपलब्ध आहे. तिसरे संगम उत्तरी मदुराई येथे भरले असून, पत्थूप्पातू, एतुत्थोकई पदिनेनकीलकनक्कू हे महत्त्वाचे ग्रंथ आहेत.

**आपली प्रगती तपासा :**

**१.** लौकिक वाङमयातील शास्त्रीय साहित्य सांगा.

## १.४ परकीय इतिवृत्ते / प्रवासवृत्तांत / साहित्य

प्राचीन भारतीय इतिहासासंबंधी ज्ञान देण्याच्या दृष्टीने परकिय लिखाणही अतिशय महत्त्वाचे आहे. निरनिराळ्या कालखंडामध्ये अनेक परकीय प्रवाशांनी वेगवेगळ्या कारणासाठी भेटी दिल्या. त्यांनी भेटीचे वृत्तांत लिहून ठेवले. त्यातून आपणाला तत्कालीन राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक परिस्थितीची माहिती मिळते.

**i) ग्रीक प्रवास वृत्तांत :** ग्रीक प्रवासांनी व लेखकांनी भारतासंबंधी लेखन केले आहे. हिरोडाटस्च्या 'हिस्टोरिका' ग्रंथात भारतविषयक प्रथम माहिती आहे. त्याने पर्शिया व भारत यांच्यातील संबंधाची माहिती दिली आहे. सम्राट डेरियसचा सैनिक स्काइलैक्सने आपल्या वृत्तांत सिंधू संस्कृतीची माहिती दिली आहे. हिलेटिअस मिलेटसने 'भूगोल' या ग्रंथामध्ये स्काइलैक्सच्या वृत्तांताच्या आधारे सिंधू संस्कृतीची माहिती दिली आहे. अलेक्झांडर बरोबर भारतात आलेल्या निआर्कस, ओनोसिक्रटस्, ऐरियन इ. इतिहासकारांनी तात्कालीन राजकीय, आर्थिक, सामाजिक, जीवनाविषयी माहिती लिहिली आहे. भारतीय राज्ये, रीतीरीवाज, चंद्रगुप्त मौर्य यांची माहिती आहे. मॅगेस्थेनीसचे मुळ लेखन उपलब्ध नाही. परंतु एरियन व स्ट्रॅबोच्या लेखनात उल्लेख आहे. ओनोसिक्रटसने 'सिंकदरचे जीवन' ग्रंथ लिहिला आहे. एरिस्टोब्युलसने 'युद्धाचा इतिहास' हा ग्रंथ लिहिला आहे. एरियनच्या ग्रंथामध्ये अलेक्झांडरची स्वारी, समकालीन राजे आणि तत्कालीन परिस्थितीची माहिती आहे. ग्रीक सेनापती सेल्यूकस निकटरचा राजदुत मॅगेस्थेनिस हा इ. स. पूर्व ३०४ ते इ.स. पूर्व २११ या काळात चंद्रगुप्त मौर्याच्या दरबारी होता. त्याने 'इंडियन' नावाचे प्रवासवृत्तांत लिहिले. त्यामध्ये मौर्य प्रशासन, सैन्य, युद्धपद्धती, नगर प्रशासन, राजधानी, समाजरचना इ. माहिती आहे. मेगॅस्थेनिस चंद्रगुप्त मौर्याच्या, डायमेकस बिंदुसारच्या, तर नंतरच्या काळात डायनोशियस भारतात आला. त्यांनी भारताविषयी लेखन केले.

इ.स. ८० च्या दरम्यान एका ग्रीक खलाशाने 'पेरिप्लस ऑफ दी युरेथ्रियन सी' ग्रंथ लिहिला. त्याने सातवाहन राजाविषयी व व्यापाराविषयी माहिती दिली आहे. भारतातील बंदरे, व्यापारी केंद्र, बाजारपेठा, विनिमय होणाऱ्या वस्तू इ. माहिती आहे. टॉलेमी ने 'भूगोल' या ग्रंथामध्ये भारताचा भूगोल लिहिला असून त्यामध्ये अनेक नकाशे काढलेले आहेत. प्लिनीने नच्ररल हिस्ट्री (प्राकृतिक इतिहास) हा ग्रंथ लिहिला आहे. त्यामध्ये तत्कालीन वनस्पती, प्राणी, खनिजे यांची माहिती आहे.

**ii) चीनी व तिबेट प्रवासी :** भारतातील बौद्ध तीर्थ क्षेत्रांना भेटी, मुळ ग्रंथाचा अभ्यास करणे व चिनीभाषेत भाषांतर करण्याच्या हेतूने अनेक चीनी प्रवासी भारतात आले. त्यातील प्रमुख प्रवासी म्हणजे फाहियान - हा चीनी प्रवासी इ.स. ३९९ मध्ये दुसरा विक्रमादित्यच्या काळात आला. तो १५ वर्षे भारतात आला. त्याने फोक्बोकी या प्रवास वर्णनामध्ये सामाजिक, धार्मिक, राजकीय माहिती दिली आहे. सुंग-युन हा चीनी प्रवासी बौद्ध धर्माचा शोध घेण्यासाठी आला. त्याने ३ वर्षात १७० धर्मग्रंथ एकत्र केले, त्याने प्रवास वर्णन लिहिले. यूआन च्वांग हा चीन प्रवासी इ.स. ६२९-३० च्या दरम्यान भारतात आला. हर्षवर्धनाच्या दरबारी राहिला होता. त्याने सियुकी (पाश्चित्य जगाच्या नोंदी) नावाचा ग्रंथ लिहिला. त्याने चालुक्य राजा दुसरा पुलकेशी, पल्लव राजा महेंद्रवर्मन यांच्या दरबाराला भेटी दिल्या. त्याच्या प्रवास वर्णनामध्ये, वर्धन, चाणुक्ये, पल्लव घराण्याची माहिती आहे. समाज, शासन व्यवस्था, राजनिती, धर्म, अर्थव्यवस्था इ. माहिती मिळते. इत्सिंग हा चीनी प्रवासी इ.स. ६७३ मध्ये भारतात आला. त्याने आणि युआन च्वांग याने भारतातील नालंदा, तक्षशिला, विक्रमशिला विद्यापीठांना भेटी दिल्या. त्याच्या प्रवासवर्णनामध्ये राजकीय, सामाजिक, शिक्षण-पद्धत; परीक्षा पद्धत याची माहिती मिळते. हूली - त्याने युआन च्वांगच्या प्रवासवर्णनाच्या आधारे ग्रंथ लिहिला. सुमाचीयन यास चीनी इतिहासाच्या पिता म्हणतात. त्याने प्राचीन भारतीय इतिहासावर लेखन केले आहे.

लामा तारानाथ या तिबेटी इतिहासकाराने 'कंग्यूर आणि तंग्यूर' हे ग्रंथ लिहिले. त्यामध्ये मौर्योत्तर भारतीय इतिहासाची माहिती मिळते. शक, पार्थियन, कुशाण यांची माहिती आहे.

**iii) अरबी प्रवासवृत्तांत :** व्यापाऱ्याच्या निमित्ताने अनेक अरब व्यापारी भारतात येत असत. त्यापैकी अलबेरुणी, अलूमसुदी, सुलेमान इ.नी प्रवासवर्णन लिहून ठेवली आहेत. महंमद गझनी बरोबर अलबेरुणी भारतात आला त्याने 'तहकीक-ए-हिंद' (तारीख-इ-हिंद) हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथामधये भारतीय गणित, भौतिक, खगोल, धर्म, समाज जीवन शिक्षण इ. माहिती आहे. अलविलाहुस, सुलेमान, हसन निजामी, फरिश्ता, निजामुद्दीन इ. अरब लेखकाने इतिवृत्तांत लिहिलेले आहे.

प्राचीन भारतीय समाजातील राजकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक, जीवनाची व संस्थाची माहिती वरील साधनांच्या आधारे मिळते.

**आपली प्रगती तपासा :**

१) परकीय इतिवृत्तांत / प्रवासवर्णनांचा आढावा घ्या.

munotes.in

## १.५ साधनांचे महत्त्व

प्राचीन भारताचा इतिहास समजावून घेण्यासाठी लिखित व अलिखत साधनावर अवलंबून राहावे लागते. त्या आधारे आपणाला प्राचीन काळाची माहिती पुढीलप्रमाणे मिळते म्हणून त्या साधनाचे महत्त्व आहे.

१) प्राचीन काळातील घराण्याचा क्रम, त्यांचा कालखंड, वंशावळ, घराण्यातील राजा, त्यांची धोरणे इ. माहिती आपणास मिळते.
२) प्राचीन काळातील राजकीय परिस्थिती, युद्ध, त्याची कारणे, त्याचे परिणाम इ. माहिती प्राप्त होते.
३) प्राचीन काळातील सामाजिक, आर्थिक, धार्मिक, परिस्थितीची माहिती मिळते.
४) चलनव्यवस्था, वजन, मापे, रस्ते, दळणवळण, बंदरे, आयात-निर्यात इ.
५) साहित्य, शिक्षण, कला, स्थापत्यकला, विज्ञान व तंत्रज्ञान इ.
६) भाषा, लिपी, त्याचे प्रकार आणि विकास इ.
७) परकीय आक्रमण - त्यांचे भारताशी संबंध याची माहिती मिळते.

वरील परिस्थितीची माहिती आपणाला साधनाच्या आधारे प्राप्त होते. जर साधने नसतील तर आपणाला सत्य व योग्य इतिहास मांडता आला नसता. प्राचीन भारताचा अभ्यास करताना आपल्या मनात सतत शंका निर्माण झाल्या असत्या. त्यामुळे असे घडले असावे. कदाचीत असे घडले असावे अशी मांडणी आपणाला नेहमीच करावी लागली असती कारण संशोधन करताना सबळ पुराव्याची गरज असते. तो पुरावा मिळाला नाही तर भाकित केल्या सारखा इतिहास झाला असता. यावरुन इतिहासाचा अभ्यास, संशोधन करताना साधने महत्त्वाची आहेत हे स्पष्ट होते.

## १.६ सारांश

प्राचीन भारतीय इतिहासाच्या अभ्यासासाठी दोन प्राकारचे साहित्य महत्त्वाचे आहेत. लिखित साधनामध्ये भारतीय भाषेतील हिंदू, बौध्द, जैन धर्मीयांनी निर्माण केलेले धार्मिक व लौकिक साहित्य महत्त्वाचे आहे. भारतीया प्रमाणे परकीय साधने ही महत्त्वाची आहेत. लिखित साधना प्रमाणेच अलिखित पुरातत्त्वीय विविध प्रकारचे साधने आहे.

## १.७ प्रश्न

१. प्राचीन भारतीय इतिहासाच्या अभ्यासाची लिखित साधने सांगा.
२. पुरातत्त्वीय साधनांचा आढावा घ्या.
३. प्राचीन भारताच्या इतिहास अभ्यासाच्या परकीय साधनांची माहिती सांगा.

munotes.in

## १.८ संदर्भ


1. Bhattacharya N.N. - Ancient Rituals and their Social Contents, (Delhi, Manohar Publication) 1996
2. Jha D. N. - Ancient India in Historical Outline Motilal Banarasidas, Publishers Pvt. New Delhi.
3. Kulkarni C. M. - Ancient Indian History & Culture Karnataka Publishing House, Mumbai- 1956.
4. Majumdar R. C. - Ancient India, Motilal Banarasidas, Publishers Pvt. Ltd. New Delhi - 1974
5. Mookerjee R. K. - Ancient India, llahabad, Indian Press, 1956

**मराठी संदर्भ ग्रंथ**

१. डॉ. मोरवंचीकर आर.एस. - प्राचीन भारत, कैलास प्रकाशन, औरंगाबाद

२. प्रा. मार्डीकर मदन - प्राचीन भारत, विद्या प्रकाशन, औरंगाबाद

३. प्रा. डॉ. अनिल सिंगारे - दक्षिण भारताचा इतिहास कैलास प्रकाशन, औरंगाबाद

५. डॉ. प्रभाकर देव - प्राचीन भारत, विद्या प्रकाशन, औरंगाबाद

६. डॉ. साहेबराव गाठाळ - प्राचीन भारत, कैलास प्रकाशन, औरंगाबाद

७. डॉ. खाबडे दिनकर - प्राचीन भारत, कैलास प्रकाशन, औरंगाबाद

८. कोसंबी डी.डी. - प्राचीन भारतीय संस्कृती व सभ्यता, डायमंड प्रकाशन, पुणे

**हिन्दी**

१. झा. डी. एन. - प्राचीन भारत का इतिहास - दिल्ली विश्वविद्यालय.

२. थापर रोमिला - भारत का इतिहास, राजकमल प्रकाशन, दिल्ली.

३. शर्मा रामशरण - भारत का प्राचीन इतिहास

४. श्रीवास्तव कृष्णचंद्र - प्राचीन भारत का इतिहास तथा संस्कृती.

५. कोसंबी दामोदर धर्मानदं - प्राचीन भारत की संस्कृती और सभ्यता


❖❖❖❖

munotes.in

# २

# सिंधू संस्कृती

**घटक रचना:**

२.० उद्दिष्ट्ये
२.१ सिंधू संस्कृतीचे सामाजिक जीवन
२.२ सिंधू संस्कृतीचे आर्थिक जीवन
२.३ सिंधू संस्कृताचे धार्मिक जीवन
२.४ सिंधू संस्कृतीची नगररचना
२.५ सिंधू संस्कृतीचा ऱ्हास
२.६ सारांश
२.७ प्रश्न
२.८ संदर्भ

## २.० उद्दिष्ट्ये :

- सिंधू संस्कृतीच्या सामाजिक जीवनाची माहिती जाणून घेणे.
- सिंधू संस्कृतीच्या आर्थिक परिस्थितीची माहिती जाणून घेणे.
- सिंधू संस्कृतीच्या धार्मिक परिस्थितीची माहिती जाणून घेणे.
- सिंधू संस्कृतीच्या नगररचनेची माहिती जाणून घेणे.
- सिंधू संस्कृतीचा ऱ्हास कसा झाला हे समजून घेणे.

## २.१ सिंधू संस्कृतीचे सामाजिक जीवन (SOCIAL LIFE)

मोहेंजोदडो, हडप्पा व अन्य ठिकाणच्या उत्खननातून ज्या वस्तू प्राप्त झाल्या त्याचे विश्लेषण करून सामाजिक जीवनाची माहिती मिळते. सिंधू संस्कृतीमध्ये सामाजिक जीवन शांतता व सहकार्याचे होते. सामाजिक प्रगतीला येथील आर्थिक स्थैर्य प्रामुख्याने जबाबदार होते.

१) **सिंधू संस्कृतीचे लोक / वंश** – भारतातील विविध ठिकाणच्या उत्खनानात सापडलेली हाडे व हाडांचे सापळे यावरून हे लोक **चाल्कोलिथिक** काळातील असावेत असा अंदाज आहे. मानवी वंशशास्त्राच्या आधारे परिक्षण केले असता चार वंशाचे लोक रहात असावेत. ते म्हणजे १) प्रोटो ऑस्ट्रलॉईड २) मेडिटरेनियन ३) मंगोलॉईन्ड ४) अल्पिनॉईड या संस्कृतीचा जमिनीमार्गे व जलमार्गाने बाहेरच्या देशाशी संबंध येत असल्याने, मिश्र वंशाचे लोक असावेत. **शिल्पकृतीवरून** शहरे बहुभाषिक व बहुवांशिक असावीत.

munotes.in

२) **समाजरजना / सामाजिक वर्ग** – उत्खननावरून सिंधू संस्कृतीच्या समाजात निरनिराळे वर्ग असावेत. हे वर्ग **आर्थिक व्यवस्थेवरून** निर्माण झाले असावेत. प्रामुख्याने राज्यकर्त्याचा व व्यापाऱ्यांचा वर्ग प्रभावशाली असावा. दुसरा वर्ग म्हणजे शेतकरी, कारागीर, मजूर यांचा असावा. डॉ. **विमलचंद्र पांडे व डॉ. ए. डी. पुसळकर** यांच्या मते – "सिंधू संस्कृती कालीन समाजात चार वर्ग असून विद्वजनांचा, लढाऊ, व्यापारी व कारागिराचा आणि कामगारांचा वर्ग होय."

**विद्वतजनांच्या वर्गात प्रामुख्याने पुरोहित**, वैश्य, भविष्यवेता, **लढाऊ वर्गामध्ये** शिपाई **व्यापारी व कारागीर वर्गात** विविध लोकांचा समावेश होता. **कामगार वर्गात** नोकर, सफाई कामागर, शेतकरी, मासे पकडणारे इ. लोक होय.

३) **आहार /अन्न** – विस्तीर्ण व सुपीक जमिन आणि मुबलक पाणी यामुळे लोकवस्ती वाढली. नागरी विकास झाला. लोकांच्या अन्नामध्ये शाकाहारी व मांसाहारी अशा दोन्ही प्रकारच्या पदार्थाचा समावेश होता. **शाकाहारी अन्नामध्ये** गहू, तांदूळ, बार्ली, जव, तीळ, वाटाणा, खजूर, दुध व दुधाचे पदार्थ, फळे, भाजीपाला इ. समावेश होता. गहू व बार्ली ही **प्रमुख पिके** होती. **हडप्पा** येथे **तीळ व वाटाणा** सापडला आहे. **मांसाहारामध्ये** कोबंड्या, शेळ्या, बदक, ससा, बैल, डुक्कर, कासव, मेंढे इ. प्राण्याचे मांस असे.

४) **वेशभूषा** – सिंधू संस्कृतीत लोकांच्या वस्त्रांचे प्रत्यक्ष अवशेष प्राप्त झाले नाही. **मूर्ती व चित्रावरून** वस्त्रांच्या स्वरूपाविषयीची माहिती मिळते. स्त्री-पुरुष सामान्यता दोन वस्त्रे परिधान करीत. एक धोतरासारखे वस्त्र कमरे खाली गुंडाळीत व दुसरे उपरण्यासारखे डाव्या खांद्यावरून व उजव्या काखखालून घेत असे. वस्त्र प्रामुख्याने **कापसाचे** व कदाचित **लोकरीचे** असावे. अंगावर घ्यावयाच्या शालीच्या टोकावर **कशिदाकाम** केलेल असे. **स्त्रीया** घागरा व ओढणी व ओढणीसारखे वस्त्र वापरत असे. उत्खननात सुया सापडलेल्या आहेत. त्यावरून वस्त्र **शिवण्याची पध्दत** असावी हे **विणकाम स्त्रीया** करत असाव्यात.

५) **केशभूषा** – उत्खननात प्राप्त झालेल्या मानवी मूर्तीच्या व इतर साधनांच्या आधारे केशभूषाची कल्पना येते. स्त्रियांचे जे पुतळे आहेत. त्यापैकी काहीच्या मस्तकांवर मुकुटाकार अलंकार आहेत. स्त्रिया केसांची निगा ठेवत असे. वेगवेगळ्या पध्दतीने केशरचना करत. त्यासाठी पिना, आकडे यांचा उपयोग करत असे. टोपासारखे सर्व केस डोक्यावर बांधण्याची पध्दत होती.

६) **अलंकार** – सिंधू संस्कृतीतील स्त्रि-पुरुष दोघेही अलंकार वापरत असे. अलंकारासाठी **सोने, रुपे, तांबे, ब्रॉझ** या धातूचा व मौल्यवान रत्नांचा उपयोग करत असत. तसेच शंख, शिंपले, हस्तिदंत, मणी इ. पासून दागिने बनवत. स्त्रिया आपल्या मस्तकांवर पंख्यासारखा दागिना घालीत. कपाळाभोवती सोन्याचा किंवा रूप्याचा पट्टा बांदत. कंठहार, बिंदी, बाजूबंद, बांगड्या, पैंजण, कमरपट्टे, कडी, गळ्यातील हार, अंगठ्या कर्णभूषणे, बाहुभूषणे,साखळी, मेखला, पायातील नुपूर व वाळे इ. अलंकारांचा समावेश होता.

पुरुषांच्या गळ्यात हार, बोटात अंगठ्या, हातात कडी इ. वापरीत असे. **डॉ. जॉन मार्शलच्या मते** – येथील सोन्याचे दागिने इतके सुरेख व कलाकुसर असलेले आहेत की ते सुमारे ५००० वर्षापूर्वीच्या घरापेक्षा लंडनमधील बॉन्ड स्ट्रीट मधील सोनाराकडून ते आले असावेत असे वाटते."

७) **सौंदर्यप्रसाधने** – या काळात स्त्रिया व पुरुष सौंदर्यप्रसाधनात विशेष दक्ष असत. हस्तिदंताच्या, धातूच्या, मातीच्या व दगडाच्या लहान लहान पेट्या / बरण्यांतून व शिंपांच्या डब्यातून निरनिराळे सौंदर्यप्रसाधने सापडलेली आहेत. काजळ, चेहऱ्याला लावण्याची पांढरी पावडर, गालांना व ओठांना लावण्याचे लाल रंग आणि हिरव्या रंगाचे मातीचे गोळे मिळालेले आहेत. **चन्दुदडो** येथे शृंगारपेटी /ओष्ठशलाका मिळाली असून, त्यात आरसा, फणी व सौंदर्यप्रसाधने आहेत. सौंदर्यप्रसाधन करण्यासाठी ड्रेसिंग टेबल व त्यावर ब्रॉझ धातूचे आरसे, हस्तिदंती फण्या व सौंदर्यप्रसाधन साहित्य असे. **हडप्पा** येथील शृंगारपेटीत कान-कोरणे, दात कोरणे, चिमटा इ. वस्तू सापडल्या आहेत.

८) **प्राणी (Animals)** – उत्खननात सापडलेल्या हाडांच्या सापळ्यावरून त्या काळातील प्राण्यांची माहीती मिळते. मोठ्या शिंगाचे बैल, रेडे, मेंढे, बकरे, डुक्कर, हत्ती, गेंडे, उंट, गाय इ. प्राणी होते. घोडा त्यांना माहित होता की नाही याबाबत वाद आहे. चित्रावरून व मातीच्या प्रतिमावरून त्यांना गाय, वाघ, अस्वल, माकड, ससा, गाढव मुंगूस, खार, मोर, पोपट माहित असावा. **शिक्यावरून** प्रामुख्याने बैलाची प्रतिमा असून त्याचे धार्मिक महत्त्व असावे.

९) **घरातील विविध वस्तू** – उत्खननामध्ये माती, दगड, शिंपले, हस्तिदंत व धातू यांची अनेक भांडी व गृहपयोगी उपकरणे सापडली आहे. मातीची अनेक प्रकारची स्वयंपाकाची व जेवणाची भांडी, त्यावर शिंपल्यांच्या झाकण्या, शिंपल्याच्या पळ्या, स्नानगृहातील रांजण आहेत. तसेच सुऱ्या, कुऱ्हाडी, करवत, चाकू, मासे मारण्याचे गळ / फासे सापडले आहेत.

गृहसजावटीमध्ये विविध खुर्च्या, बेडशीट, पलंग, कपाटे, चटया इ. वस्तु सापडल्या आहेत. तांबे, माती, हस्तिदंत या पासून बनवलेले विविध प्रकारचे दिवे सापडतात. लोकांना मेणबत्ती माहित असावी.

१०) **क्रिडा व मनोरंजनाची साधने** – उत्खननामध्ये गोट्या, सोंगट्या, हस्तिदंती किंवा धातूचे फासे, चेंडू इ. खेळांची साधने सापडली आहेत. **फाश्यांचा खेळ** हा लोकप्रिय होता. लहान मुलांच्या खेळण्या विविध प्रकारच्या आहेत. नृत्य, गायन ही करमणूकीची साधने असून, शिकार, कोंबडे किंवा बैलाची झूंज यासारखे खेळ लोकप्रिय होते. **मातीचा लहान गाडा** हा मुलांचा अतिशय आवडता खेळ असावा. नर्तकी, ढोलाच्या तालावर नाचणाऱ्या मूर्ती आहेत. तंतूवाद्य असावे. सामुहिक नृत्याची आवड लोकांना होती, हालत्या मानेचा बैल, झाडावर चढणारे माकड, पशुपक्षांच्या प्रतिमा, शिट्या, वाजंत्री इ. वस्तू मिळालेल्या आहेत.

११) **शस्त्रे / हत्यारे** – सिंधू संस्कृतीतील लोक वेगवेगळे शस्त्रे वापरीत असावे. कुऱ्हाडी, भाले, गदा, जांबिया, गोफण, धनुष्यबाण, परशू, तलवार, चाकू, सुरी, बाणाची टोके इ. शस्त्रे होती. बहुतेक शस्त्रे **तांब्याची किंवा ब्रॉंझची** केलेली असत. काही दुधारी हत्यारे होती. गदा

मातीच्या किंवा चुनखडीच्या किंवा हिरव्या कठीण दगडाचा असे. स्वरंक्षणाकरिता तांब्याचे चिलखत व ढाली यांचा उपयोग करण्यात येत होता.

१२) **औषध** – सिंधू संस्कृतीतील लोकांना अनेक प्रकारची औषधे माहित होती. हे उत्खननावरून सिध्द होते. काळ्या रंगाच्या गोळ्या सापडलेल्या आहेत. शिलाजीत, समुद्रफेन, हरणाची व सांबराची शिंगे सापडलेली आहेत. प्रबाळ/ पोवळी व कडूनिंबाचा उपयोग औषध म्हणून केला जात असे. **डॉ. ए. डी. पुसळकराच्या मते** – "ही सर्व वैशिट्ये आर्युवेदातील औषधात सांगितलेली आहेत. भारतीय प्राचीन औषधी पध्दतीचा उगम हा थेट सिंधूसंस्कृती पर्यंत जाऊन भिडतो."

१३) **स्त्रियांची स्थिती** – सिंधू संस्कृतीमध्ये स्त्रीयांची स्थिती चांगली होती. समाजामध्ये आदर व सन्मानाचे स्थान होते. कारण की मातृदेवताची पूजा केली जात होती. स्त्रीया मुलांचे पालन-पोषण करीत असे. आपल्या कुटुंबाची देखरेख करत असे. सर्व **समाज मातृप्रधान** होता.

## २.२ सिंधू संस्कृतीचे आर्थिक जीवन (ECONOMIC LIFE)

मोहेंजोदडो, हडप्पा, लोथल येथील उत्खननावरून आर्थिक जीवन अतिशय समृध्द आणि प्रगत होते असे दिसून येते. आर्थिक जीवनामध्ये शेती व व्यापार यांना समान महत्त्व होते. **आर्थिक जीवनाच्या वैशिट्यामध्ये** शेती, पशुपालन, व्यवसाय/उद्योगधंदे, व्यापार, शिकार, दळणवळणाची साधने, वजन व मापे, चलनव्यवस्था इ. घटक होय. यांचा सविस्तर विचार पुढील प्रमाणे आहे.

१) **शेती व्यवसाय** – सिंधू संस्कृतीतील लोकांचा **मुख्य व्यवसाय** शेती होता. सिंधू नदीमुळे जमिन सुपीक होती. नदीमुळे शेतीला पाणीपुरवठा होत असे. शेती मधून गहू,तांदूळ, जव, कापूस, बार्ली भात, वाटाणे, तीळ, मोहरी इ. पिके घेतली जात असे. **बनवली** येथे बार्लीचा शोध लागला. **हडप्पा** येथे नारळाच्या सारखे मातीचे भांडे सापडले त्यावरून नारळाची शेती असावी. **लोथल** येथे तांदळाचे कण सापडले आहेत. **मोंहजोदडो व हडप्पा** येथे धान्याचे कोठार सापडले आहे. **मोहेंजदडो** येथे चांदीच्या कलशाला सुती कापड चिकटलेले सापडलेले आहे. **डॉ. ए. डी. पुसळकर यांच्या मते**– "या लोकांच्या शेतीव्यवस्थेबद्दल फारशी माहिती नसली तरी गहू व बार्ली यांच्या नमुन्यावरून हे लोक जंगली प्रकारचे नव्हते. आजही पंजाबमध्ये याच दर्जाच्या गव्हाचे उत्पादन केले जाते."

२) **पशुपालन** – शेतीबरोबर पशुपालनाचा व्यवसाय करत असत. शेतीसाठी बैलाचा उपयोग मोठ्या प्रमाणावर करत असल्याने त्याला देवता मानत असे. **कलीबंगन** येथे नांगरलेल्या शेतीचे अवशेष सापडले आहेत. पशुपालन मध्ये बैल, गाय, म्हैस, शेळी, मेंढी, कुत्रा, रेडा, डुक्कर, उंट इ. **प्राणी पाळत** असावेत. या शिवाय हत्ती, गेंडा, सिंह, वाघ, हरिण, गवा, सांबर इ. **जंगली प्राणी** माहित असावेत. ससा, माकड, पोपट, कोबंडी, मोर, हंस इ. **पक्षी** माहित असावेत. इ.स.पू. २००० च्या दरम्यान **सूरकोतडा** येथे घोड्याचे अवशेष प्राप्त झाले आहेत. **मोहेंजोदडो** येथे हाथीच्या डोक्याचा पिंजरा मिळाला आहे.

३) **व्यवसाय/उद्योगधंदे** – शेती व्यवसायाबरोबर समाजाच्या विविध गरजा भागवण्यासाठी अनेक उद्योगधंदे होते. त्यामध्ये कुंभारकाम, विणकाम, धातूउद्योग, शिल्पउद्योग, अलंकार, भांडी, वस्त्र इ. उद्योगधंदे सुरु होते. कापसापासून सुत कातण्याचा **व्यवसाय मोठा** होता. मातीची भांडी, उपकरणे बनवण्याचे व्यवसाय होते. **चन्हुदडो** हे खेळाच्या उत्पादनाचे केंद्र असावे. सोनाराचा व्यवसाय **लोकप्रिय** होता. पक्क्या विटा तयार करणे, बांधकाम व्यवसाय, शेती अवजारे निर्मिती व्यवसाय, शस्त्रे तयार करणे, जहाज बांधणे व दुरुस्ती व्यवसाय, अशुध्द धातू शुध्द करणे. इ. उद्योगधंदे होते. लोथल येथे मेण तयार करण्याचा उद्योग होता.

४) **दळणवळणाची साधने** – सिंधू संस्कृती मध्ये व्यापार हा **स्थलमार्ग व जलमार्गाने** करत असावेत. **स्थलमार्गाने** प्रवास करण्याकरिता घोडे, गाढव, बैलगाडी यांचा वापर होत असावा. **मोहेंजोदडो** येथे बैलगाडीच्या मातीच्या प्रतिकृती तर **हडप्पा** येथे तांब्याचा बैलगाडीची छोटी प्रतिकृती सापडली आहे. **हडप्पा** येथे ब्रांझचा टांगा (एक्का) उपलब्ध झाला आहे. असाच टांगा **चुन्हदडो** येथे सापडला आहे. आज **सिंध-पंजाबमध्ये** आढळणाऱ्या गाड्यासारखाच आहेत. **जलमार्गाच्या** प्रवास हा जहाज व नौका याने होत असावा कारण मुद्रा व भांड्यावर अशी चित्रे कोरलेली आहेत.

५) **वजन-मापे** – सिंधू संस्कृतीच्या उत्खननामध्ये अनेक प्रकारच्या वजनमापांचे अवशेष प्राप्त झाले आहेत. ही वजने अतिशय अवजड ते अतिशय लहान वजनापर्यंत विविध प्रकारची होती. ही वजने पाषाणाची होती. काही वजने मेसोपोटेमिया वजनासारखी होती. **सर्वात लहान वजन** ८७५० ग्रॅम इतक्या भाराचे असून **सर्वात मोठे वजन** १०,९७० ग्रॅम इतक्या वजनाचे आहे. १३.६४ ग्रॅमचे वजन **सर्वात जास्त प्रचलित** होते. हे वजन सर्वात लहान वजनाच्या **१६पट** आहे. **घनाकृती** वजनमाप अधिक प्रचलित होते. लहान वजनामध्ये **दशमान पध्दत** व मोठ्या वजनामध्ये **दशांश पध्दत** दिसून येते. मोहेंजदडो, हडप्पा, चुन्हुदडो, लोथल, कलिबंगन येथे एकाच प्रकारची मोठ्या प्रमाणात  वजन व मापे मिळालेली आहेत. **तराजूचे अवशेष** सापडले असून, त्यांची दांडी **ब्रॉझ** व पारडी **तांब्याची** होती. मोठे तराजू लाकडी दांडीचे असावेत.

मापनासंबंधीची माहिती निश्चित मिळवणे कठीण आहे. **मोहेंजोदडो** येथे २० सें.मी. (६.६२ इंच) लांबीची व ९ समभाग केलेली **शिंपल्याची** पट्टी सापडली आहे. हडप्पा येथे ४ सेंमी. (१.५ इंच) लांबीची दोन्ही बाजूनी तुटलेली ब्रॉझची कांडी/तुकडा सापडला आहे. तिचे ४ भाग समान केलेले आहेत.

६) **चलन व्यवस्था** – उत्खननात कोठेही तांबे किंवा ब्रॉझची नाणी सापडलेली नाहीत. यावरून आर्थिक व्यवहारासाठी कोणती चलन पध्दत असावी याबाबत निश्चित सांगता येत नाही. तरीपण वस्तुविनिमयाची पध्दत असावीत. व्यवहारासाठी शिक्क्यांना चलन म्हणून उपयोग करीत असावेत.

७) **व्यापार** – सिंधु संस्कृतीतील उत्खननात प्राप्त झालेले शिक्के, लिपी प्रमाणबध्द वजनमापे इ. आधारे व्यापाराची कल्पना येते. या काळात भारतात अंतर्गत व परदेशी व्यापार सुरु होता.

munotes.in

**१) अंतर्गत व्यापार** -सिंधू वासीयांचा अंतर्गत व्यापार **जनावरांच्या पाठीवरुन** (उंट, गाढव) व बैलगाडीतून खुष्किच्या मार्गाने चालत असत. मालाच्या संरक्षणासाठी गाडीला छत असे. अश्या बैलगाडयाचे अवशेष **मोहेंजोदडो व हडप्पा** येथे प्राप्त झाले आहेत. काश्मीर, दक्षिण भारत, राजपुताना, इ. राज्यांशी व्यापार सुरु होता. सिंधू संस्कृतीतील लोक पुढील प्रमाणे विविध राज्यातून मालाची **आयात** करत असे. **सोने** - कोलार, अनंतपूर भागातून, **चांदी** - अफगाणिस्तान, आर्मेनिया, पर्शियाभागातून, **तांबे**-राजपूताना बलुचीस्तान, अफगाणिस्तानमधून, लॅपिस-लॅझली (वैदुर्य)- बदकशानमधून **टर्कोसा किंवा फिरोजा** - इराणमधून, **अमेथेस्ट किंवा नील** - महाराष्ट्रातून, **फार्नेलियन किंवा अकीक व कॅलेसेडॉनी किंवा लसण्या** हे सौराष्ट्र किंवा पश्चिम भारतातून। **जेड किंवा मर्गझ** - मध्यआशियातून आयात केले जात असत.

सिंधू संस्कृतीचे **बाह्य संस्कृतीशी** व्यापारी संबंध होते याचे अनेक पुरावे प्राप्त झाले आहेत. मेसोपोटेमिया येथे अनेक शिक्के सिंधू संस्कृतीतील सापडले आहेत. तसेच साहित्या मध्ये हडप्पा येथील **उरचे व्यापारी** हे तीलमन, मगन, मेलूहा इ. देशाशी व्यापार करीत असल्याचा उल्लेख आलेला आहे.

सिंधू संस्कृतीच्या परिसरात मेसोपोटेमिया येथील शिक्क्यासारखे शिक्के, शृंगारपेटी, वजने, इ.साम्य असणाऱ्या वस्तु सापडलेल्या आहेत. **मेसोपोटेमिया, इजिप्त, कोट** येथील समकालीन संस्कृतीशी व्यापारी संबंध होते.

व्यापार हा **जमिनी व समुद्रमार्गे** चालत असे. उरकिश व इजिप्त यांच्याशी व्यापार करणारे **प्रमुख केंद्र मोहेंजोदडो** हे होते. सिंधू संस्कृतीमध्ये परदेशी व्यापाराचे कार्य पणी हा वर्ग करत असावा. बॅबिलोन (मोसोपोटोमिया) संस्कृतीच्या आलेखात सिंधू संस्कृतीच्या प्रदेशाचा उल्लेख **यनुटा** केलेला आहे. येथील **आसरानी** या व्यापाऱ्याचे नाव आहे. व्यापाऱ्याची **अडतदुकाने** व पेढया असाव्यात कापूस, कापड, गहू, इ. **निर्यात** होत असे. सांबरशिंगे, शिलाजित, देवदार, नीळ, चांदी, जस्त, शिसे, शिंपले, गोमदे, सोने, पाचू इ. **आयात** होत असे. **वस्तुविनिमयाची** पध्दत परदेशी व्यापारात असावी.

## २.३ सिंधू संस्कृतीचे धार्मिक जीवन (RELIGION LIFE)

प्राचीन संस्कृतीमध्ये धर्माला महत्वाचे स्थान असून ही, मोहोजोदडो, हडप्पा येथे उत्खननात धर्म व पंथासंबंधी वास्तू किंवा मंदिर याचे अवशेष प्राप्त झाले नाहीत. त्यामुळे समाजातील धार्मिक आचार, विचार आणि प्राबल्या यासंदर्भात कोणतेही मत मांडता येत नाही. केवळ उपलब्ध झालेल्या अवशेषामध्ये, शिक्के, ताईत, विविध देवदेवतांच्या मातीच्या व धातूच्या मूर्ती याच्या आधारेच **धार्मिक जीवनातील कल्पना व प्रथा** (Religious Ideus and beliefs) या विषयी निष्कर्ष काढता येतात. या निष्कर्षावरुन धार्मिक जीवनात **मातृदेवता, शिवदेवता, लिंग पुजा व योनिपुजा, प्राणीपुजा, निसर्गपुजा, अग्निपुजा, पितृपुजा, धार्मिक आचार, पाणीपुजा, बलिप्रथा, देवतांचे मानवीकरण, अंत्यसंस्कार इत्यादीची** माहिती होते.

१) **मातृदेवता /शक्ति देवता/ स्त्रीदेवता** - सिंधू संस्कृतीतील समाजात मातृदेवतेला धार्मिक जीवनातील अतिशय महत्व होते. **आदिमाता व भ्रमाता** या स्वरुपात पुजा केली जात होती. सर्व **शक्तीमान** परमेश्वर म्हणजे मातृदेवता ही कल्पना करण्यात आली होती. उत्खननामध्ये बऱ्याचशा **लाल व नरम दगडांच्या** शिक्क्यावरील स्त्रीप्रतिमा सापडलेल्या आहेत. त्यापैकी काही पुढील प्रमाणे आहे.

अ) सिंधू संस्कृतीत शिक्क्यावर असलेल्या सर्व स्त्री प्रतिमा अर्धनग्न असून तिच्या कमरेभोवती कमरपट्टा आहे. तिच्या डोक्यापासून सर्व अंगावर वेगवेगळे अलंकार आहेत. डोक्यावर पंखाकृती नागफणा आहे. यावरुन **नागमाता कद्रुचे** हे रुप असावे या स्वरुपाच्या मूर्ती अनेक ठिकाणी सापडल्या त्यावरुन **आदिमातेच्या मूर्ती असून प्रमुख देवता** असावी अशी कल्पना येते.

ब) हडप्पा येथे सापडलेल्या स्त्रीप्रतिमेच्या गर्भाशयातून एक वनस्पती उगवलेली दिसते. तिच्या मागे एक शेतकरी कोयत्याने स्त्रीचा बळी देत असल्याचे दृश्य दिसते यावरुन **भूमाता / पृथ्वी देवतांची प्रतिमा** असावी. अन्नधान्याच्या समृध्दीसाठी बळी समर्पण करीत असावेत.

क) अनेक मातृदेवतांच्या समीप धूपवलयाच्या खुणा आढळतात. त्यावरुन पुजा विधिमध्ये देवासमोर तेल / धूप जाळत असावेत.

ड) मोहेंजोदडो व हडप्पा येथील एका शिक्क्यावर पिंपळाच्या पानातून प्रकट झालेली **वृक्षदेवता/भूमातेची** प्रतिमा असून, तिच्या पुढे एक भक्त बसलेला आहे. खालील जागेवर भक्तांच्या एकसारख्याच सात प्रतिमा आहेत. भूमाता नग्न असून तिच्या डोक्यावर पानांचे/पिसाचे तुरे असलेली शिंग आढळतात.

इ) एका शिक्क्यावर दुभंगलेल्या पिंपळाच्या झाडामध्ये एक नग्न स्त्री उभी असलेली दाखवलेली आहे. तिच्या समोर बकरा उभा आहे व बाजूला बरीच माणसे आहेत. देवाला **बळी देण्याची प्रथा** असावी. बळी प्रथेच्या आधारे देवतेला प्रसन्न करण्याची परंपरा होती.

२) **शिवदेवता / शिवपुजा / पुरुष देवता पुजा** - मातृदेवतेच्या बरोबर **हडप्पा संस्कृतीतील** नागरीक पुरुष देवतांची ही पुजा करत होते. १९३० मध्ये **डॉ. जे. एच मॅके** यांना मोहेंजोदडो येथे ४२० क्रमांकाचा शिक्का सापडला. या शिक्क्यामध्ये उच्यासनावर तीन मुखे असलेली एक नग्न पुरुष पदयासन घालून बसलेला आहे. त्याच्या डोक्यावर शिंगासारखे एक शिरोभूषण आहे. त्याच्या भोवती हत्ती, रेडा, गेंडा, वाघ याची चित्रे आहेत. त्याच्या आसनाखाली हरीण दाखवलेली आहे. या मुर्तीच्या हातात बरीच कंकणे आहेत. व छातीवर आच्छादन आहे. ही मूर्ती **पशुपती, त्रिमुखी** किंवा **योगीश्वर (शिव)** देवाची असावी. "हे शिवाचे मुळ स्वरुप किंवा अश्वत्थ-निवासी देवाचे असावे" असे मत **जॉन मार्शल** यांनी मांडले. या प्रतिमेच्या वरच्या बाजुस **सात अक्षरांचा एक लेख** आहे. नंतरच्या काळातील शिव या देवतेशी निगडित त्रिमुख, पशुपती, योगेश्वर, महायोगी या सारख्या कल्पना निर्माण झाल्या.

शिवाच्या आणखी दोन प्रतिमा सापडल्या आहेत. एका प्रतिमेतील मूर्तीला तीन मुखे असून, ती ठेंगण्या आसनावर बसली आहे. दुसऱ्या मुर्तीच्या चेहऱ्याची फक्त एकच बाजु दाखवलेली आहे. दोन्ही प्रतिमेतील मूर्ती नग्न असून डोक्यावर शिंगे असलेला टोप आहे. त्या शिंगाच्या मध्ये लहानशी झाडाची फांदी उगवलेली दिसते. यावरुन ही देवता **सर्जन शक्तीची / निसर्गाची सर्जन** क्षमतेचे प्रतिक मानले जाते.

वल्कले नेसलेल्या एका धनुर्धारी वीराची एक प्रतिमा सापडली आहे. या मूर्तीच्या मस्तकावर देखील शिंगे आहेत. कदाचित **किरातरुपी शंकराचे** हे प्राचीन रुप असल्याचा संभव आहे. एक मुर्तीचे डोके शिंगधारी रेडयाचे आणि हातपाय गोमेच असून पायाच्या जागी दोन सर्प आहेत. त्याच्या अंगावर वाघाचे कातडे आहे. हे **संहारक रुद्राचे** प्रतिक आहे. रेडा हे यमाचे वाहन तर उष्ण प्रदेशात गोम व सर्प हे मृत्यूचे दूत असतात. विश्वनिर्मितीचे श्रेष्ठ सामर्थ्य असल्याने शिवाची पुजा रुढ झाली.

३) **लिंग पुजा व योनीपुजा** -

उत्खनना मध्ये अनेक लिंग प्राप्त झालेली आहेत. यावरुन लोक लिंगपुजा करत असावेत. शिव पशुपतीची आराधना केवळ मूर्तीच्या स्वरुपातच नव्हेतर लिंग स्वरुपातही होत असे **शंकू व दंड गोलाकार** आकाराच्या लिंगाच्या आकृत्या सापडल्या आहेत. कदाचित ते प्रजनन शक्तीचे प्रतिक अनेक ऋग्वेदात लिंगपुजकांचा **शिस्नदेवा** सारख्या तिरस्कारयुक्त शब्दांनी उल्लेख केलेला आढळतो. काही गोल आकाराच्या दगडी आकृत्या सापडल्या आहेत. यावरुन स्त्री प्रतिक म्हणून **योनीपुजा** देखील प्रचलित असावी. परंतु लिंगा इतके मोठया प्रमाणात योनीपुजा नसावी.

४) **प्राणिदेवता पुजा** - सिंधू संस्कृती मधील धर्मामध्ये प्राणीपुजेला महत्व असावे असे अनेक मुद्रांवरील प्राण्यावरुन वाटते. मुद्रा, शिक्के, दगडी मूर्ती यावरील प्राण्याच्या आकृतीवरुन तीन गट केले आहेत.

**अ) काल्पनिक प्राणी** - अर्धा मानव व अर्धा प्राणी किंवा अनेक डोकी असलेला एक प्राणी .

**ब) विचित्र स्वरुपाचा प्राणी** - संदिग्ध स्वरुपाचा प्राणी म्हणजे वराह किंवा एक शिंग असलेला प्राणी बहुधा **ग्रामदेवता** म्हणून या प्राण्याला महत्व असावे.

**क) प्रत्यक्षात असणारे प्राणी** - गेंडा, वाघ, हत्ती, रेडा, बैल, इ. प्राणी होय.

संस्कृतीच्या प्रगतीबरोबर पशुदेवता, देवताची वाहने म्हणून काही प्राण्यात येत. अनेक मुद्रावर उंच वशिंडाच्या व लोंबते पोळ असलेल्या बैलाचे चित्र आहे हेच कोठेही आढळत नसली तरी शिवलिंग मात्र अनेक आढळतात.

५) **निसर्ग पुजा** - निसर्ग पुजामध्ये वृक्षापुजा, जलपुजा, अग्नीपुजा, सूर्यपुजा, नागपुजा, इत्यादी देवी देवताचे रुप देऊन, त्यांचे पुजन करण्याची पध्दत सिंधू लोकाच्यात आढळते. यावरुन लोकांच्या जीवनात त्याना अतिशय महत्व होते.

अ) **वृक्षपुजा** - हडप्पा संस्कृतीतील मुद्रावर अनेक वृक्षाच्या आकृत्या कोरल्या आहेत. त्यावरुन वृक्षाला धार्मिक जीवनात महत्व होते असे वाटते. **पिंपळाला** अतिशय महत्वाचे स्थान होते. मातृदेवता या वृक्षा भोवताली किंवा वृक्षावर आढळतात. हडप्पा येथील झाडाच्या चित्राभोवती भिंत किंवा कुंपणासारखे चित्र दिसते. मोहेजोंदडो येथील शिक्क्यावर पिंपळाच्या पानावर अनेक डोके असलेले शरीर आहे. मुंद्रावर कडूलिंब, बाभूळ, खजूर यांची चित्रे कोरलेली आहेत. आजही वटसावित्रीला होणारी पुजा सिंधू संस्कृतीच्या परंपरेची साक्ष देते.

munotes.in

ब) **जलपुजा** - मोहेंजोदडो येथे सापडलेले महास्नानगृह हे नदी देवतेचे मंदिर असावे असाही अंदाज करण्यात येतो. **मगर** हा जलचर प्राणी सिंधू नदीचे प्रतीक मानला जात असावा. महास्नानगृह व घरोघरी स्नानगृहामुळे धर्माचारामध्ये स्नानाला महत्व असावे.

क) **अग्नीपुजा** - उत्खननामध्ये यज्ञकुंडाप्रमाणे काही चौकोन आढळतात. याचा उपयोग बहुधा अग्नी प्रज्वलित करुन बळी प्रथेबरोबरच आहुती देण्याकरीता होत असावा. यज्ञ प्रथा अस्तित्वात असल्याचे पुरावे सिंधू संस्कृतीत मिळत नाही.

ड) **सूर्यपुजा** - अनेक प्राचीन संस्कृतीमध्ये सुर्याला देवता मानत असत. सिंधू संस्कृतीत सूर्यपुजा होती की नाही हे निश्चितपणे सांगता येत नाही. उत्खननात सापडलेल्या काही शिक्क्यावर **स्वास्तिक व चक्र** याच्या आकृती कोरल्या आहेत. ही सूर्याची प्रतिके मानून त्याची पुजा केली जात असावी.

इ) **नागपुजा** - काही मुद्रांवर नागाचे चित्र असल्याने नागपुजेचे संकेत मिळतात. एका मुद्रेवर एक बसलेली देवता त्याच्या दोन बाजूस भक्त आणि त्याच्या डोक्यावर नगाचा फणा असा देखावा आहे. यावरुन नागदेवतेची पुजा रुढ असावी.

६) **देवी-देवताचे मानवीकरण :-** अनेक मुद्रावर पुरुष व मातृदेवताचे चित्र साधारण मनुष्याच्या रुपात कोरलेल्या आहेत. देवांची माणसाच्या रुपात कल्पना करुन, त्याची पुजा करणे याचा अर्थ मनुष्य आणि देवता यांचा जवळचा संबंध आहे.

७) **बहुदेवतावाद** - उत्खननात सापडलेल्या वस्तुंच्या पुराव्यावरुन सिंधू संस्कृतीत एकेश्वर वाद नसून बहुदेवतावाद प्राथमिक स्वरुपात असावा. त्याही **मातृदेवता व शिव** यांना विशेष महत्व असावे. तसेच स्थानिक स्वरुपांच्या अनेक देवता आणि समाईक अशा निसर्ग देवता यांचेही प्राबल्य असावे असे म्हणता येईल.

८) **धार्मिक आचार / आराधान पध्दत** - सिंधू संस्कृतीतील देवदेवताच्या विषयी माहिती मिळते परंतु त्याच्या / पुजाविधी संबंध माहिती मिळत नाही. सिंधू नागरीक मूर्तीपुजक होते. विविध देवदेवतांच्या मूर्ती करुन त्याची आराधना करत असत. असे अनेक शिक्क्यावरील आकृतीने स्पष्ट होते. शिक्क्यांवर आढळणाऱ्या धुराच्या डागावरुन देवासमोर दिवा लावणे, धुप जाळणे आणि पुजा करणे. प्राण्यांना बळी देण्याची प्रथा असावी. वैयक्तिक व सार्वजनिक स्वरुपात देवदेवतांची पुजा कशी केली जात हे निश्चित सांगता येत नाही.

९) **पितृपुजा** - घरातील मृतव्यक्तीचे आशिर्वाद मिळावेत या हेतूने सिंधू संस्कृतीत पितृ पुजा रुढ झाली असावी. मृत व्यक्तीच्या काही वस्तूचे जतन केले जात असावे. त्या स्वरुपात पितृपुजा केली जात असावी.

१०) **सिंधू संस्कृतीतील अंत्यसंस्कार पध्दत :-** सिंधू संस्कृतीमधील लोकांचा मरणोत्तर जीवनावर विश्वास होता असे त्याच्या अंत्यसंस्काराच्या पध्दतीवरुन दिसून येते. प्रत्येक शहरात दफनभूमी ही शहराच्या बाहेर असे. मोहेंजोदडो पेक्षा हडप्पा येथे जास्त पुरावे मिळाले आहेत. परंतु ते उत्तर काळातील असावेत. मोहेंजोदडो येथील अवशेषात प्रेत दफनाच्या तीन पध्दती आढळतात.

१) **पुर्ण दफन पध्दत** - एका खोल खड्डयात मृतदेहाचे डोके उत्तरेकडे तर पाय दक्षिणेकडे ठेवले जात. **हडप्पा** येथे देवदारी शवपेटी सापडली. त्यावरुन त्यात दफन केले जात असत. ३० व्यक्तीचे दफन केलेले मृतदेह **मोहेंजोदडो** येथे सापडले आहेत. मृतदेहाबरोबर अन्नपदार्थ, अलंकार, आयुधे, भांडी यांचे ही दफन केले जात असे. **लोथल** स्त्री-पुरुष याचे एकत्र सांगाडे सापडलेले आहेत. यावरुन सहगमनाची पध्दत अस्तित्वात असावी असे दिसते.

२) **अंशदफन पध्दत** - मृत शरीर प्रथम पशुपक्षाना खाण्यास देत. नंतर अस्थि गोळा करुन पुरुन ठेवीत याच्यासोबत अनेक वस्तुही प्राप्त झाल्या आहेत.

३) **दहनोत्तर दफन** - मृत शरीराचे दहन करुन अस्थि एका मातीच्या भांड्यात पुरत असत. रक्षा नदीत पात्रात विसर्जन करीत. काही भांडयात प्राणी, पक्षी, मासे यांच्या अस्थिही आढळतात.

## २.४ सिंधू संस्कृतीची नगररचना (Town planning):

जगातील कोणत्याही ज्ञात संस्कृतीपेक्षा रेखीव नगररचना हे सिंधू संस्कृतीचे खास वैशिट्ये होय. पुरातत्वीय साधनांच्या आधारे या संस्कृतीचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे इ. स. ५००० वर्षापूर्वीची सुनियोजित नगररचना असणारी सिंधू संस्कृतीची माहिती झाली. हडप्पा, मोहेंजोदडो, रोपड, कालीबंगज, लोथल इ. ठिकाणी सुनियोजित नगररचना आढळते. **सुनियोजित नगररचनेचे विभाग पुढीलप्रमाणे** –

अ) मैदानातील नगररचना –

ब) प्रचंड इमारत बांधकाम –

अ) <u>**नगररचना**</u> **(Town Planning)** – सिंधू संस्कृतीमध्ये नगररचनेत तटबंदी, रस्ते, घराचे बांधकाम, सांडपाणी व्यवस्था, विहीर, दिवाबत्तीची सोय, कामगार वस्त्या, पाणीपुरवठा इ. विभागात केलेली होती. शहराची व्यवस्थीतपणे व योजनापूर्वक आखणी करून नंतर शहरे वसवली आहेत. नगररचनेमध्ये पुढील बाबींचा विचार करण्यात आलेला आहे.

१) **तटबंदी** – मोहेंजोदडो येथे तटबंदीचे अवशेष **डॉ. जॉन मार्शल** यांना न मिळाल्याने या संस्कृतीचे लोक शांतताप्रिय होते असे मत व्यक्त केले. हडप्पा शहराच्या एका घराभोवती, कालीबंगन व लोथल येथे कही शहराभोवती तटबंदीचे अवशेष मिळालेले आहेत. तटबंदीचा पाया सामान्यतः **१८ मीटर रूंद** असून वरच्या बाजूला निमूळता होता. याचे बांधकाम प्रथम मातीचे, नंतर मातीच्या विटांचे व भाजलेल्या पक्क्या विटांचे केलेले दिसते. तटावर बुरुज असून त्यावर मातीचे लहान गोळे असावेत.

२) **रस्ते** – मोहेंजोदडो, हडप्पा, लोथल इ. ठिकाणच्या उत्खननातून रस्त्याची माहीती मिळते. मोहंजदडो, हडप्पा येथे **७ वेळा** नवीन वस्ती झाल्याचे दिसून येते. या नगराची रचना पूर्वनियोजित आरोग्यविषयक काळजी घेतली जात असे. मोहेंजदडो या शहराचा **मुख्य रस्ता** बरोबर मध्य भागातून **दक्षिणोत्तर** असून हा ३३ फूट रूंदीचा आहे. या रस्त्याला छेदून जाणारे रस्ते पूर्व-पश्चिम असून ते ५ ते ११ मीटर रूंदीचे आहेत. सर्व महत्त्वाचे रस्ते शहराच्या परिघाला

मिळणारे आहेत. रस्त्याची रूंदी १४ फुटापासून ३३ फुटापर्यंत लांबी व सरळ अर्धा मैलापर्यंत होते. सर्व रस्ते एकमेकांना **काटकोनांत** छेदणारे असल्यामुळे शहरांचे चौकोनी विभाग झाले. काही ठिकाणी कचरा एकत्र केलेला दिसतो. त्यावरून रस्ते स्वच्छतेकडे लक्ष दिले जात असावे. **मॅके यांच्या मते** वाऱ्याची दिशा लक्षात घेऊन रस्त्यांची आखणी केलेली असल्यामुळे येथील वातावरण मोकळे स्वच्छ राहत होते व रस्तेही स्वच्छ होत असावेत ?

३) **दिवाबत्तीची सोय** – सिंधू संस्कृतीकालीन रस्त्यावर अनेक ठिकाणी दिव्यांचे खांब विशिष्ट अंतरावर होते, असे उत्खननात दिसून आले. रस्त्यावरील दिवायोजनेकरिता व वाहतूकीच्या सोयीकरीता या दिवाबत्या असाव्यात.

४) **गृहरचना/घरबांधणी** – मोहेंजोदडो व हडप्पा येथील अनेक घरे दुमजली व तिमजली होती. साधारणपणे प्रत्येक घरात मध्यभागी एक चौक व त्याच्या सभोवती राहण्याच्या खोल्या असत. वरच्या मजल्यावर जाण्यासाठी बाहेरून उंच व अरूंद जीना असे. प्रत्येक घरामध्ये एक स्नानगृह व मोरी असे. मधल्या चौकोनात विहिर असे. प्रत्येक मजल्यावर स्वतंत्र कुटुंब असावे.

घराचे व इतर इमारतीचे बांधकाम प्रामुख्याने **भाजलेल्या विटाने** केलेली आहे. बांधकामासाठी **चिकणमाती, चुना, पांढरीमाती** यांचा वापर करण्यात येई. घराची बांधणी साधी परंतु भक्कम असे. प्रत्येक दोन घरामध्ये अंतर असे. या बोळाच्या दोन्ही बाजूस उंच बांधकाम केलेले असे. घराचे प्रवेशद्वार व खिडक्या मुख्य रस्त्याच्या विरूध्द बाजूच्या गल्लीच्या दिशेस असे. कारण रस्त्यावरील धुळ व चोर, दरोडेखोर यांच्यापासून सरंक्षण व्हावे.

बहुतेक घरे **धाब्याची** असून गच्चीवरील पावसाचे पाणी वाहून नेण्यासाठी मातीचे पन्हळ असे. प्रत्येक घरातील मोरी व स्नानगृह रस्त्याच्या बाजूस असे. स्नानगृहाचे बांधकाम पक्के असून अर्ध्या भिंतीपर्यंत पक्की चुनेबंदी करून त्यावर डांबराचा थर देत असे. स्नानगृह व मोरीतील पाणी मातीच्या नळावाटे रस्त्याच्या गटारात सोडलेले असे. उंचवटा किंवा गढीतील घरे सर्वसामान्य नागरीकांच्या घरापेक्षा जास्त प्रशस्त व जास्त खोल्यांची होती. तळमजल्याचा उपयोग **स्वयंपाकगृह** म्हणून व वरच्या मजल्याचा उपयोग **शयनगृह** म्हणून केला जात असावा.

५) **कामगार वस्त्या** – मोहेंजोदडो व हडप्पा या ठिकाणी कामगार वस्त्यांचे अवशेष आढळतात. या वस्त्यातील घरे दोन खोल्यांची व ३०' x २७' या आकाराची असत. ही घरे औद्योगिक कामगारांच्या चाळीसारखी वाटतात. हडप्पा येथील कामगार वस्ती जवळ विटांनी बांधलेले **उखळ** सापडले आहे. मोठया मुसळानी धान्य कांडून त्याचे पिठ करीत.

किल्ल्यावर राहणारे सरकारी अधिकारी व अन्य सेवक यांना अन्नधान्याचा पुरवठा करण्याचे काम कामगार करत असावेत. या उखळा जवळ १५०' x २००' आकाराचे धान्याचे कोठार आहे. पाण्यासाठी लहान लहान व मोठ्या विहिरी असे.

६) **सांडपाण्याची व्यवस्था** – सिंधू संस्कृतीतील सांडपाण्याची व्यवस्था ही तत्कालीन जगातील **क्रीटबेट** वगळता अन्य कोणत्याही संस्कृतीमध्ये आढळत नाही. शहराचे आरोग्य व स्वास्थ टिकून राहणेसाठी सांडपाण्याची तंत्रशुध्द, नियोजीत व्यवस्था हडप्पा, मोहेंजदडो येथे

आढळून येते. घरातील सांडपाणी, सार्वजनिक स्नानगृहातील पाणी, रस्त्यावरील पाणी, पावसाचे पाणी इत्यादी ठिकाणचे पाणी गावाबाहेर वाहून नेण्यासाठी **मोठ्या भुयारी गटारांची व्यवस्था** होती. शहरातील गटारी रस्त्याशी समांतर असून त्या पक्क्या विटांनी व चुनखडीने गटारे बांधलेली असे. या गटाराची रूंदी ९ इंच असून उंची १२ इंच आहे. गटारे साफ करण्यासाठी ठिकठिकाणी मोकळी जागा असे. त्यावर **दगडी झाकणी** असे या गटारातील पाणी गावाच्या बाहेर नदीच्या पात्रात सोडले जात असे.

सांडपाणाच्या व्यवस्थेमध्ये **एक त्रुटी** आढळते ती म्हणजे सांडपाण्याचा नाला हा बहुधा विहिरीजवळ असे. यातून पाणी साठण्याचा धोका जाणवतो तरी पण, लोकांच्या हितांच्या विचार करता व स्वच्छतेच्या दृष्टीने ही नियोजन व्यवस्थीत होते. **सर जॉन मार्शलच्या मते** – "सांडपाण्याची इतकी सुव्यवस्थीत योजना तत्कालीन कोणत्याही संस्कृती अंतर्गत नव्हती". **डॉ. ए. एल बाशम** – "प्राचीन कोणत्याही संस्कृतीत व रोमन संस्कृतीच्या पूर्वी या प्रकाराची भूयारी गटारांची व्यवस्था नव्हती."

७) **मुबलक पाणीपुरवठा/विहीर** – काही विशाल घरांमध्ये असलेल्या **वैयक्तिक विहीर** व दोन घरामध्ये एक **सार्वजनिक विहिर** या व्यवस्थेमुळे शहरांना मुबलक पाणी पुरवठा होत असे. उत्खननात चौरसाकृती, अंडाकृती विहिरी प्राप्त झाल्या आहेत. विहीरीमधून दोराने पाणी काढण्याच्या खूणा अद्यापी दिसतात. ३ फूट रूंदीच्या विहिरी असे. **मोहेंजोदडोच्या तुलनेने हडप्पा येथे कमी प्रमाणात** विहिरी आहेत.

ब) **प्रचंड इमारती बांधकाम** – सिंधू संस्कृतीच्या ठिकिठकाणच्या उत्खननात प्रचंड इमारतीचे अवशेष प्राप्त झालेले आहेत. या इमारती रेखीव नगररचनेप्रमाणे प्रचंड इमारतींची निर्मिती हे वैशिट्ये या संस्कृतीचे होय. मोहेंजोदडो व हडप्पा येथे या इमारती आढळतात. या प्रचंड बांधकामात रेखीवता, प्रमाणबध्दता, सौंदर्यवादी दृष्टीकोन व लोकोपयुक्त इ. घटकांचा समावेश केलेला आहे. उत्खननातील काही उल्लेखनीय वास्तुंविषयी पुढीलप्रमाणे माहिती मिळते.

१) **महास्नानगृह** – सिंधू संस्कृतीमधील सर्वात भव्य व आश्चर्यकारक वास्तू म्हणजे मोहेंजोदडो येथील महास्नानगृह होय. हे महास्नानगृह **दक्षिणोत्तर** सुमारे ६० मीटर (१०८० फुट) लांब व **पूर्व पश्चिम** रूंदी ३६ मीटर (१०८ फूट) आणि २.४३ मीटर **खोल** आहे. बाजूच्या भिंती भव्य असून तळाशी ७ ते ८ फूट रूंद आहेत. बाजूला पाण्याच्या तळापर्यंत पायऱ्या आहेत. महास्नानगृहाच्या **मध्यभागी पोहण्याचा तलाव** १३ मीटर (३९ फुट) लांब, ८ मीटर (२३ फुट) रूंद व ३ मीटर (८ फुट) खोल आहे. तलावाच्या भिंती २ ते ३ मीटर रूंद आहेत.

तलावाच्या चारही बाजूला व्हरांडे आहेत. त्यामध्ये दक्षिणेला खोल्या असून त्याचा उपयोग कपडे बदलण्याकरिता होत असावा. **पूर्वेला** पाणीपुरवठयासाठी विहिर आहे. विहिरीद्वारेच तलावात सतत स्वच्छ पाण्याचा पुरवा होत असावा. तलावातील पाणी बाहेर काढण्यासाठी मोऱ्यांचे बांधकाम केलेले आहे. तलाव बांधताना पाणी झिरपू नये व बाहेरचे पाणी तलावात येऊ नये याची विशेष काळजी घेतलेली होती.

या महास्नानगृहाचा उपयोग दैनंदिन लौकिक स्नानासाठी होता की, धार्मिक कार्यासाठी होता हे सांगता येत नाही. स्नानगृहाच्या **आग्नेयेच्या बाजूस** उघड्यावर

munotes.in

सूर्यस्नानाची व्यवस्था होती**. डॉ. मॅके यांच्या मते** – "या स्नानगृहातला धार्मिक महत्त्व असावे". **कार्लटनच्या मते** – "समुद्रकिनाऱ्यावरील अद्यावत हॉटेल असावे."

२) **सभागृह** – मोहेंजोदडो येथे महास्नानगृहाच्या शेजारी सुमारे २५ मी. लांब (८० फूट) व २५ मी. (८० फूट) रूंदीच्या सभागृह इमारतीचे अवशेष मिळालेले आहेत. मध्यभागी प्रमुख आसन आहे. या इमारतीला महाविद्यालयीन इमारत किंवा विहार असे नाव इतिहासकारांनी दिले आहे. परंतु तिचा उपयोग शैक्षणिक, प्रशासकीय, धार्मिक या पैकी कोणत्या कामासाठी वापरला जाई ते सांगता येत नाही.

३) **धान्याचे कोठार** – मोहेंजोदडो व हडप्पा येथे विशाल धान्याच्या कोठाराचे अवशेष मिळालेले आहेत. **मोहेंजोदडोचे कोठार** गढीच्या विभागात असून ते ४५.७१ मीटर लांब व २२.५० मीटर रूंद आहे. त्याचे दोन विभाग करून धान्य साठवण्यासाठी खोल्या केलेल्या आहेत. **हडप्पा येथील धान्याचे कोठार** दक्षिणोत्तर ५६ मीटर लांब व पूर्व-पश्चिम ४५ मीटर रूंद आहे. यामध्ये ८ मीटर रूंदीचा रस्ता आहे. प्रत्येक विभागात ६ खोल्या असून दोन खोल्यामध्ये २ मीटर रूंदीचा रस्ता आहे. कोठाराच्या जवळ धान्य उतरवण्यासाठी कट्टे बांधलेले आहेत. भिंतीना समोरासमोर खिडक्या आहेत. ही इमारत सार्वजनिक महत्त्वाची होती. कराच्या रूपाने गोळा केलेले धान्य साठवले जाई. शेजारीच **उखळ** आहे. त्याचा उपयोग धान्य कुंटण्यासाठी केला जात असावा. हडप्पा येथे कोठारा शेजारी मजुरांची वसतिगृहे सापडलेली आहेत.

४) **जहाजाची गोदी** – गुजराथमध्ये सापडलेल्या शिक्क्यावरून लोथल व रंगपूर येथून बॅबिलोनियाबरोबर समुद्रमार्गे व्यापार सुरु होता हे स्पष्ट होते. **श्री आर. एन. भटाचार्य** यांनी रंगपूरमधील शिक्क्याच्या आधारे कुंटासी, धोलाविरा, लोथल, रंगपूर ही परदेशाशी व्यापार करणारी बंदरे होती असे मत मांडले. जहाज बांधणी व दुरूस्ती करण्यासाठी **लोथल** येथे पक्क्या विटांनी बांधलेली गोदी होती. ही गोदी सुमारे **उत्तर-दक्षिण** २३५ मीटर लांब व **पूर्व-पश्चिम** ४० मीटर रूंद आणि १४ फूट उंचीच्या भिंती आहेत. समुद्राच्या भरतीच्या लाटेबरोबर पाणी व जहाज आत येईल व ओहोटीच्या वेळी हे पाणी बाहेर जाणार नाही अशी व्यवस्था केलेली होती यावरून समुद्र प्रवासाचे, जहाज बांधणीचे, भरती-ओहोटीचे ज्ञान लोकांना होते असे दिसून येते.

५) **शासन केंद्र** – सिंधू संस्कृतीच्या एक इमारतीत एका बाजूस प्रमुखास बसण्यासाठी जागा आहे. त्याच्या भोवती काही जणांना बसण्यासाठी जागा आहे. या इमारतीचा उपयोग प्रामुख्याने शासन केंद्र किंवा शिक्षण म्हणून केलेला असावा पण निश्चित सांगता येत नाही.

६) **बांधकामाचे साहित्य** – सिंधू संस्कृतीतील बांधकामाचा विचार केल्यास या बांधकामात प्रथम भाजलेल्या विटांचा उल्लेख करावा लागेल या विटा भक्कम व लाल रंगाच्या आहेत. या विटामध्ये **कमाल आकाराच्या विटा** २०१/२'' x १०१/२'' x ३१/२'' **मध्य आकाराच्या विटा** १०१/२'' x ५'' x २१/४'', **किमान आकाराच्या विटा** २१/२'' x ४'' x २'' इतक्या आहेत. याशिवाय मानी, जिप्सम मॉर्टर इ. वापर केला जात असे. मजबूतीसाठी मातीत चून्याचे मिश्रण केले जात असे. पर्वता जवळील बांधकामात २ ते ३ फूटांचे दगडाचा पाया असे. विविध कामासाठी लाकूड वापरत.

वरील सर्व बांधकामामध्ये मोठ्या प्रमाणात पक्क्या विटांचा उपयोग केलेला असे. आखीव नगररचना, आरोग्य रक्षण करणारी भूयारी गटारांची व्यवस्था व प्रचंड इमारती हे खास वैशिट्ये दिसून येतात.

## २.५ सिंधू संस्कृतीचा ऱ्हास :

सिंधू संस्कृतीचा उदय व निर्माता याबाबत जसे वाद आहेत तसेच तिच्या विनाशाबाबतही वाद आहे. एवढया प्रगत, प्रगल्भ व भरभराटीस गेलेल्या सिंधू संस्कृतीचा नाश होणे ही खेदाची बाब आहे ही संस्कृती सुमारे इ.स.पू १७५० ते इ.स.पू. १५०० च्या दरम्यान नष्ट झाली असावी याबाबत इतिहासकारांमध्ये एकमत नाही सिंधू संस्कृतीच्या विनाशाबाबत पुढील प्रमाणे कारणे / सिध्दांत माडले जातात.

१) **परकीयांचे आक्रमण** - संरक्षण तटबदी किंवा संरक्षणाच्या अन्य साधनाचा व शस्त्रास्त्राचा अभाव होता. यावरुन सिंधू संस्कृतीतील लोक शांतता प्रिय असावेत. तेथील संपन्न, सखवस्तू पंरतू संरक्षणास सिध्द नसलेल्या रहिवाशावर परचक्राचे म्हणजे युयुत्सूचे संकट आले असावे. त्यापुढे त्याच निभाव न लागल्याने संस्कृतीच ऱ्हास झाला असावा.

२) **आर्यानी सिंधू संस्कृती नष्ट केली** - सर जॉन मार्शल यांना मोहेजोदडो येथे काही मानवी हाडाचे सांगाडे मिळाले त्याच्या आधारे **मॉर्टिमर व्हीलरने** मत मांडलेली, "आर्यानी या संस्कृतीचा विनाश केला असावा. अनार्यांची शहरे व तटबदी उदध्वस्त करणारा म्हणून इंद्राला पुरंदर म्हटले गेलेले असावे असे मत मांडले परंतु हे अयोग्य वाटते. कारण आर्य हे **लोहयुगात भारतात** आले. सिंधू संस्कृती ही ताम्रयुगातील आहे.

३) **कायदा व सुव्यवस्था उध्वस्त** - मोहेंजोदाडो येथे रस्त्यावर अतिक्रमणे सुरु झाली. जड जवाहर व अन्य मौल्यवान वस्तू पुरुन ठेवण्याची पध्दत वाढू लागली. यावरुन शहरात निर्वासिताची गर्दी वाढून कायदा सुव्यवस्था नष्ट झाली होती. त्याच वेळी परकीयानी आक्रमण केल्याने लोकांनी घरेदारे सोडून पळून गेले. जे मागे राहिले त्यांची कत्तल केली. त्यामुळे या संस्कृतीचा विनाश झाला.

४) **व्यापाराचा ऱ्हास** - सिंधू संस्कृतीचा व्यापार परदेशात मोठया प्रमाणात सुरु होता. तेव्हा ही संस्कृती समृध्द व सधन होती. परंतु अखेरच्या टप्प्यात व्यापार बंद झाल्याने, सर्व क्षेत्रावर दुष्परिणाम झाला. त्यामुळे संस्कृतीचा नाश झाला.

५) **लोकसंख्या वाढ व मलेरियाचा प्रभाव** - सिंधू संस्कृती मध्ये प्रचंड लोकसंख्येची वाढ झाल्याने त्याचा परिणाम सामाजिक व आर्थिक जीवनावर झाला. तसेच मलेरिया रोगाचा प्रभाव वाढल्याने पूर्ण गावे नष्ट झाली त्यामुळे सिंधू संस्कृतीचा ऱ्हास झाला.

६) **तंत्रज्ञानावरील मक्तेदारी संपली** - विविध नैसर्गिक कारणामुळे खेडी ओस पडली नगरांना अवकळा प्राप्त झाली. व्यापारी, कारागीरांनी स्थलांतर केले असावे. त्यामुळे नगरांची तत्कालीन तंत्रज्ञानावरची मक्तेदारी संपून त्याचा इतरत्र फौलाव झाला असावा त्यामुळे सिंधू संस्कृतीचा ऱ्हास झाला असावा.

७) **नैसर्गिक संकटामुळे संस्कृतीचा नाश** - उत्खनित पुराव्याच्या आधारे सिंधूचा नाश क्रमशःन होता अचानक झाल्याने जाणवते आणि हा अपघात नैसर्गिक आपत्तीतून उदभवल्याचे स्पष्ट होते नैसर्गिक संकटामध्ये विविध कारणे मांडली आहेत.

**अ) नदी प्रवाहाचे मार्ग बदल** - आधुनिक काळात पुरावे प्राप्त झाले आहेत की सिंधू नदीने आपला प्रवाह बदलला होता. माधो स्वरुप वत्सने हडप्पा नगराच्या विनाशाला रावी नदीने मार्ग बदलला हे कारण मानले आहे. पाण्याचे पात्र दुर गेल्याने समृध्दीवर परिणाम झाला काही वेळा भूकंपामुळे नदीने प्रवाह मार्ग बदलला त्याचा परिणाम व्यापारावर झाला. संस्कृती नष्ट झाली.

**ब) महापुरामुळे संस्कृतीचा नाश** - हिमालयातील बर्फ वितळून सिंधूत तिच्या उपनदयाना आलेला महापूर या महापूराने प्रथम मोठी नगरे उध्वस्त झाली नतंर खेडी नाश झाली या पुरामुळे मोंहजोदडो ओसाड पडले असावे त्यामुळे संस्कृतीचा नाश झाला.

**क) भूकंपामुळे संस्कृतीचा विनाश** - मोहेंजोदडो शहराच्या विनाशाला भूकंप कारणीभूत असावा. हा भूकंप मोहेंजोदडो पासून १६० किमी अंतरावर झाला असावा. त्यामुळे पाण्याची पातळी वाढली व वसाहतीला धोका निर्माण झाला.

**ड) वाळवंटी प्रदेशात रुपातर** - सिंधू नदीच्या खोऱ्यातील दक्षिणेच्या प्रदेशाचे झपाट्याने होणारे शुष्क वाळवंटात रुपांतर, लोथल येथील बंदर समुद्राच्या तळाची उंची वाढून काही काळानंतर गाळाने भरुन गेले. त्यामुळे लोथलचा व्यापार बंद झाला. तसेच यामुळे विस्थापनेस प्रारंभ झाला. सिंधूसंस्कृतीचा नाश झाला.

**इ) दुष्काळ निर्माण झाला** - प्रारंभीच्या काळात पावसाचे प्रमाण जास्त असल्याने शेतीचे उत्पादन वाढले. लोकांचे जीवन सुख-समृध्द झाले. या जीवनासाठी लोकांनी जंगले नष्ट केली. उपयोगी असलेली सृष्टी नष्ट झाली त्यामुळे पावसाचे प्रमाण कमी झाले. परिणामी लोकांनी स्थलांतर केले. कालिबंगन हे शहर यामुळे उद्ध्वस्त झाले.

वरील विविध कारणामुळे सिंधू संस्कृतीचा ऱ्हास झाला. या काळात गुजराथ, राजस्थान, महाराष्ट, मध्यप्रदेश येथे ताम्र-पाषाण युगीन ग्रामीण संस्कृती उदयास येत होती त्यामुळे या संस्कृतीवर सिंधू संस्कृतीचा प्रभाव जाणवतो. सिंधू संस्कृती नष्ट झाली की विनाश केला की स्थलांतरीत झाली, याबाबत अद्यापही निश्चित सांगता येत नाही.

## २.६ सारांश :

सिंधू संस्कृतीचा १९२२ मध्ये शोध लागल्यामुळे प्राचीन काळातील प्रगत संस्कृतीची माहिती झाली. उत्खननामध्ये प्राप्त झालेल्या अवशेषावरून त्याकाळातील सामाजीक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतीक जीवनाची ओळख झाली. त्याच्या आधारे जागातील अतिप्राचीन व नागरी संस्कृती सिंधू संस्कृती होती हे सिध्द झालेले दिसून येते. प्राचीन काळात जगाशी व्यापारी संबंध असल्याचे आढळून आलेले आहे.

## २.७ प्रश्न :

१. सिंधू संस्कृतीच्या सामाजिक जीवनाची माहिती स्पष्ट करा.
२. सिंधू संस्कृतीच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घ्या.
३. सिंधू संस्कृतीच्या धार्मिक परिस्थितीवर भाष्य करा.
४. सिंधू संस्कृतीच्या नगररचनेची वैशिष्ट्ये सांगा.
५. सिंधू संस्कृतीच्या ऱ्हासास जबाबदार ठरलेल्या घटकांची माहिती लिहा.

## २.८ संदर्भ :


1. Bhattacharya N.N. - Ancient Rituals and their Social Contents, (Delhi, Manohar Publication) 1996
2. Jha D. N. - Ancient India in Historical Outline Motilal Banarasidas, Publishers Pvt. New Delhi.
3. Kulkarni C. M. - Ancient Indian History & Culture Karnataka Publishing House, Mumbai- 1956.
4. Majumdar R. C. - Ancient India, Motilal Banarasidas, Publishers Pvt. Ltd. New Delhi - 1974
5. Mookerjee R. K. - Ancient India, llahabad, Indian Press, 1956

**मराठी संदर्भ ग्रंथ**

१. डॉ. मोरवंचीकर आर.एस. - प्राचीन भारत, कैलास प्रकाशन, औरंगाबाद
२. प्रा. मार्डीकर मदन - प्राचीन भारत, विद्या प्रकाशन, औरंगाबाद
३. प्रा. डॉ. अनिल सिंगारे - दक्षिण भारताचा इतिहास कैलास प्रकाशन, औरंगाबाद
५. डॉ. प्रभाकर देव - प्राचीन भारत, विद्या प्रकाशन, औरंगाबाद
६. डॉ. साहेबराव गाठाळ - प्राचीन भारत, कैलास प्रकाशन, औरंगाबाद
७. डॉ. खाबडे दिनकर - प्राचीन भारत, कैलास प्रकाशन, औरंगाबाद
८. कोसंबी डी.डी. - प्राचीन भारतीय संस्कृती व सभ्यता, डायमंड प्रकाशन, पुणे

**हिन्दी**

१. झा. डी. एन. - प्राचीन भारत का इतिहास - दिल्ली विश्वविद्यालय.
२. थापर रोमिला - भारत का इतिहास, राजकमल प्रकाशन, दिल्ली.
३. शर्मा रामशरण - भारत का प्राचीन इतिहास
४. श्रीवास्तव कृष्णचंद्र - प्राचीन भारत का इतिहास तथा संस्कृती.
५. कोसंबी दामोदर धर्मानदं - प्राचीन भारत की संस्कृती और सभ्यता


❖❖❖❖

# ३

# वैदिक कालखंड

**घटक रचना:**


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रस्तावना.

३.२ आर्यांच्या मुळ वस्तीस्थानाबद्दलचे सिद्धांत

३.३ जनपदाबाबतची माहिती

३.४ वैदिक कालखंडातील सामाजिक परिस्थिती

३.५ वैदिक कालखंडातील आर्थिक परिस्थिती

३.६ वैदिक कालखंडातील धार्मिक परिस्थिती

३.७ सारांश

३.८ प्रश्न

३.९ संदर्भ


## ३.० उद्दिष्ट्ये :

- आर्यांचे आगमन व वस्तीस्थानाबद्दलची माहिती जाणून घेणे.
- जनपदांबद्दलची माहिती जाणून घेणे.
- वैदिक कालखंडातील सामाजिक परिस्थितीची माहिती जाणून घेणे.
- वैदिक कालखंडातील धार्मिक परिस्थितीची माहिती जाणून घेणे.
- वैदिक कालखंडातील आर्थिक परिस्थितीची माहिती जाणून घेणे.

## ३.१ प्रस्तावना :

प्राचीन कालखंडातील एक महत्त्वपूर्ण संस्कृती म्हणून वैदिक संस्कृतीकडे पाहिले जाते. या संस्कृतीतील लोक स्वतःला आर्य असे समजत होते. म्हणूनच या संस्कृतीला आर्य संस्कृती असे म्हटले जाते. वेदातून प्रतीत होणारी ही संस्कृती असल्या कारणे या संस्कृतीला वैदिक संस्कृती असे ही म्हटले जाते. या संस्कृतीने भारतीयांना वर्ण, आश्रम, संस्कार, विवाह प्रकार व एकत्र कुटुंब व्यवस्थेची जडण-घडण दिल्याने भारतीय इतिहास अभ्यासाच्या दृष्टीने या संस्कृतीला अनन्य साधारण महत्त्व आहे.

## ३.३ आर्यांच्या मुळ वसतिस्थानाबद्दलचे सिध्दांत

आर्यांचा मुळ प्रदेश/मुळस्थान भारत की युरोप किंवा मध्य आशिया असावा यावर मतभेद आहेत. युरोपीय इतिहासकारांच्या मते, आर्य युरोपातून एशिया मार्गे भारतात आणि इराणमध्ये गेले तर भारतीय इतिहासकारांच्या मते आर्य हे मुळचे भारतातील असून ते येथूनच जगात अनेक ठिकाणी गेले. या संदर्भात पुढीलप्रमाणे सिध्दांत मांडले आहेत.

**अ) आर्यांचे मुळ वसतिस्थान-भारत** - सर्वात प्राचीन ग्रंथ म्हणजे ऋग्वेद होय. तो ग्रंथ आर्यांचा आहे. या ग्रंथात **सप्त सिंधूचा** उल्लेख आहे. कोणीही आपला मुळ प्रदेश विसरत नाही. या ग्रंथात आर्यांनी मुळ प्रदेशाचा उल्ल्ेख कोठेही केला नाही या संदर्भात इतिहासकारांची मते.

**१) डॉ. अविनाशचंद्र दास** - आर्यांचे मुळ स्थान म्हणजे **सप्तसिंधू नदयांचा** (सिंधू, झेलम, रावी, बियाझ, चिनाब, सतलज, सरस्वती) प्रदेश होय. **उत्तरेला** - काश्मीर, **पश्चिमेकडे**-गांधार, **दक्षिणेकडे**-राजस्थान, **पूर्वेला** गंगेचे खोर होय. गांधार-काबूल असा जोडणारा प्रदेश आणि येथूनच आर्यांच्या अनेक टोळ्या एशिया, युरोपकडे गेल्या. त्यांच्या मताला **संपूर्णानंद, लक्ष्मीधर झा** यांनी पाठींबा दिला.

**डॉ.डी.एस.त्रिवेदी** - आर्यांचा मुळ प्रदेश मुलतान प्रंतातील **देविका नदीच्या** परिसरात होता हा विचार ऋग्वेदाच्या आधारे मांडला आहे. **पंडित गंगानाथ** झा यांच्यामते, ब्रहर्षि देश हा मुळप्रदेश असून। भारत हीच आर्यांची मातृभूमी, धर्मभूमी होय. **श्रीयुत एल.डी.कल्लाच्या मते** - काश्मीर किंवा हिमालय प्रदेश आर्यांचा मुळ प्रदेश असावा. वैदिक साहित्यात हिमालयातील वनस्पतीचे वर्णन आलेले आहे. त्यावरुन हे मत मांडले आहे.

**डॉ. राजबली पांडेच्या मते** - आर्यांचा मुळ प्रदेश **मध्यप्रदेश** असावा. संपूर्ण भारतीय साहित्यात, परंपरागत कथा, काव्यात आर्य बाहेरुन आले असा उल्लेख नाही. आर्यांचा मुळ प्रदेश मध्यप्रदेश असावा. हा मुळ प्रदेश सोडून **पंजाबमध्ये** गेल्यानंतर **ऋग्वेदाची रचना** केली. पंजाबमधून पश्चिम भारत, मध्य आशिया, पश्चिम आशियात आर्य गेले. स्वामी दयानंद सरस्वती, पार्जीटरच्या मते आर्य हे मुळचे **तिबेटमधील** असावेत.

अनेक भारतीय विचारवंतांनी आर्यांची मूळ भूमी भारत आहे असे सांगितले. आर्यांच्या ऋग्वेदात केवळ पंजाब व आसपासच्या प्रदेशाचे वर्णन केले आहे. उत्तर पंजाबात असलेली मंजान पर्वतश्रेणी, यज्ञयागाची वाढ होणारा प्रदेश, इंडो-युरोपीय भाषांचे मुळ वर्णोचार हे संस्कृत व तत्सम भाषांशी जुळतात. त्यामुळे भाषा वैज्ञानिक आधारे आर्य हे मुळचे भारतीय होते. हे सिध्द करण्याचा प्रयत्न केला आहे.

आर्यांचा मुळ प्रदेश भारत नाही असे मत मांडणाऱ्यांनी काही तर्क मांडले आहेत. आर्य जर मुळ भारतीय होते तर, त्यांनी संपूर्ण भारताचे आर्यीकरण का केले नाही. केवळ उत्तरभारताचे आर्यीकरण केले. दक्षिण भारतात द्रविड भाषा बोलतात म्हणून, भारत हा मुळ द्रविड संस्कृतीचे केंद्र होता. आर्यांनी **पश्चिमोत्तर संस्कृतीचा** प्रसार केला. कोणी भारतीय बाहेर जाऊन

munotes.in

बसलेला नाही. उलट बाहेरचे भारतात आलेले आहेत. ऋग्वेदात वाद्याचा, तांदळाचा, मिठाचा उल्लेख नाही यावरुन ते परकीय असावेत.

**ब) आर्यांचा मुळ प्रदेश - उत्तर ध्रुव - लोकमान्य टिळकांचा सिध्दांत -**

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी **"आर्क्टिक होम इन द वेदाज"** या आपल्या ग्रंथात आर्यांचे मुळस्थान उत्तर ध्रुवाचा प्रदेश असावा असा सिध्दांत मांडला. ऋग्वेदातील इंद्र व वृत्तसुराचे युध्द, बर्फाळ प्रदेशाचे वर्णन, दीर्घकालीन रात्र व दिवस, उषःकालाचे वर्णन अग्निउपासनेचे अग्निहोम इ. पुराव्यांच्या आधारे आर्यांचा उत्तरध्रुव हा मुळवसतिस्थान असावेत. तेथूनच ते इराण व भारतात सप्त सिंधूच्या परिसरात आले असावेत.

अनेक विव्दांनानी लोकमान्य टिळकांचे मत अमान्य केलेले आहे. कारण जर आर्यांचा मुळ प्रदेश उत्तर ध्रुव मानला तर आर्य सप्तसिंधू प्रदेशाला कधीही **देवकृतयोनि** म्हणणार नाहीत. त्यांचा तो प्रदेश असता तर, त्यांनी उत्तरध्रुवाचे स्पष्ट वर्णन केले असते. परंतु तसे त्यांनी केलेले नाही त्यामुळे तो मुळप्रदेश आर्यांचा नसावा.

**क) आर्यांचा मुळ प्रदेश -** युरोप :- भारतीय इतिहासात आर्यांचा मूळ वसतिस्थान हा एक वादाचा प्रश्न आहे. हा प्रश्न १६व्या शतकात प्रथम निर्माण झाला. **फिलिपो सासेटी** नावाच्या इटालियन व्यापाऱ्याचे १५५३-८८ या काळात गोव्यात वास्तव्य होते. त्याने प्रथम संस्कृत व युरोपातील काही भाषा यांच्यात साम्य असल्याचे निदर्शनास आणून दिले. याचे कारण या भाषांचे मूळ एक असावे असे १७८६ मध्ये सर विल्यम जोन्स याने मत मांडले. ग्रीक, लॅटिन, गोथिक, संस्कृत इ भाषांना विव्दानानी **इंडो-युरोपीयन** किंवा **इंडोजॅर्मनीक** नाव दिले. त्यातून तौलनिक भाषाशास्त्राच्या अभ्यासाला चालना मिळाली. या भाषांमधील मातृ-पितृ वाचक शब्दांमध्ये मोठ्या प्रमाणात साम्य आढळते. युरोपातील प्रचलित भाषांपैकी **लिथुआनियम** या भाषेचे संस्कृत भाषेशी खूपच साम्य आहे. त्यामुळे आर्यांचे मुळ वसतिस्थान भारताबाहेर असावे, असे विव्दानांचे मत आहे.

**डॉ.पी.गाईल्स** याने सर्वप्रथम भाषाशास्त्राच्या आधारे आपले मत मांडले ऑस्ट्रीया-हंगेरीचा गवताळ मैदानी प्रदेश किंवा डेन्यूब नदीकाठचा प्रदेश आर्याचा मुळप्रदेश असावा. त्याने काही भौगोलिक निष्कर्ष काढले. ते म्हणजे आर्यांचा व्दीपसमुह व समुद्रकाठाचा संबंध नाही. नदीचा डोंगराळ प्रदेश मुळप्रदेश असावा. आर्य गहू व जव अन्न म्हणून वापरत. गाय, बैल, कुत्रा, हरीण, भेड, घोडा, माकड इ. प्राणी परिचीत असून, हत्ती, वाग, गाढव हे प्राणी माहित नसावेत या प्रदेशातून एशिया मायनर, मेसोपोटानिया, इराण, आणि भारत या प्रदेशात आर्य आले असावेत. **रॅप्सनच्या** मते आर्य मूळचे ईशान्य युरापातील असावेत. **जर्मन पंडित पेन्का** याने अनेक स्पष्टीकरणाच्या आधारे जर्मनीचा प्रदेश हा आर्यांचे मूळस्थान असावे. **हर्टच्यामते** आर्याचे मुळवस्तीस्थान युरोपातील असून काही टोळ्या इराण व भारतात स्थलांतरित झाल्या. **नेहरिंगच्या मते** - दक्षिण रशियातील गवताळ प्रदेशाला आर्यांचे मुळस्थान कल्पिले आहे. युक्रेनमध्ये इ.स.पू.३०० मधील सापडलेल्या मातीच्या भांड्याच्या आधारे मत मांडले ऋग्वेदात वर्णन केलेल्या भौगोलिक आणि वनस्पतीच्या विषयी वैशिष्ट्यांच्या अभावे आर्यांचा मुळप्रदेश युरोप नसावा.

munotes.in

मॅक्समुलर यांच्या मते - मध्य आशियातील बैक्ट्रिया हे आर्यांचे मुळ वसतिस्थान होते. मॅक्समुलरने याचा उल्लेख 'लेक्चर्स ऑन द सायन्स ऑफ लैंग्वेजेस' मध्ये केला आहे.

**आपली प्रगती तपासा**

१. आर्यांच्या मुळ वसतिस्थानाबद्दल आपले मत सांगा.

## ३.३ जनपदाबाबतची माहिती

जनपद जनराज्याशी संबंधीत असून जनपदाचा अर्थ जनावरी सत्ता अथवा लोकांवरील सत्ता असा होतो. या पद्धतीमध्ये आपल्या कुलबांधवापैकी एका व्यक्तीची जनपदावर नियुक्ती केली जात होती व त्या व्यक्तीला शासन करण्याचे अधिकार प्राप्त होत होते. जनपद कर्त्याचे स्थान सामान्य लोकांपेक्षा श्रेष्ठ दर्जाचे होते. जनपदाच्या कालखंडात जनकुल व राज्य समरुप समजली जात होती.

### १) जनपदाच्या उदयाची पार्श्वभूमी :

सुरुवातीच्या कालखंडात मानव अर्थभटक्या अवस्थेत होता. शेती पेक्षा त्याचे पशुपालन हे उदरनिर्वाहाचे मुख्य साधन होते. त्यामुळे मानव आपल्या गायींसह एकाच गोठ्यात राहत होता. मात्र असे गाईंच्या गोठ्यात राहणारे सर्वच लोक आपल्याला एकाच वंशातील व समगोत्री मानत नसत. परिणामी या लोकात द्वेशभावना निर्माण होत असे व यातूनच संघर्ष उद्‌भवत होते. तसेच गोधनावरुनही या लोकांमध्ये संघर्ष उद्‌भवत होते. परिणामी या लोकांना मोठे स्थीर राज्य निर्माण करता आली नाही. उलट या लोकांनी छोटी छोटी जनराज्य निर्माण केली व यातून जनपदाचा उदय झाला.

### २) पूर्व वैदिक जनकुलीय रचना :

पूर्व वैदिक सामाजिक रचनेतील जनकुलीय जीवनाचे वर्चस्व जन व विश या ऋग्वेदात वापरलेल्या शब्दांवरुन दिसून येते. वैदिक जन हा सर्वात मोठा समाजाचा भाग मानला जातो. या कालखंडात सप्तसिंधूने व्यापलेल्या पंजाब आणि उत्तर प्रदेशाच्या पश्चिम भागात छोटी जनकुलीय राज्य निर्माण झाली होती. ही राज्य गोधनासाठी राज्य करत होती. पूर्व वैदिक कालखंडात राजपद ही प्रामुख्याने जनकुलीय संख्या होती. तो आपल्या लोकांवर राज्य करतो म्हणून त्याला त्या कालखंडात रक्षणकर्ता म्हटले जात होते. सभा आणि समितीमुळे या पदाला मोठ्या मर्यादा होत्या.

munotes.in

### ३) उत्तर वैदिक जनकुलीय रचनेतील फरक :

उत्तर वैदिक कालखंडात आर्याची कर्मभूमी उत्तर प्रदेशाच्या पश्चिम भागापर्यंत पोहचली होती. लोखंडी शस्त्रांच्या वापरामुळे त्यांचा हा विस्तार सुलभ झाला होता. उत्तर वैदिक कालखंडात छोटी छोटी जनकुले मोठ-मोठ्या विभागात रूपांतरीत झाली होती. या कालखंडात किवी व पुर हे एकत्र येवून त्यांनी त्यांचे जनकुल निर्माण केले होते व त्यांनी उत्तर प्रदेशचा पूर्ण भाग आपल्या ताब्यात आणला होता. टप्प्या टप्प्याने जनकुलामध्य प्रादेशिक प्रवृत्ती बळावली होती. जनपद या संकल्पनेला महत्त्व प्राप्त होवू लागले.

### ४) जनपदाकडे वाटचाल :

प्रादेशिक प्रवृत्तीमध्ये झालेली वाढ व लोखंडाचा वाढलेला वापर यामुळे पुढे मोठी राज्य निर्माण झाली. ही राज्य पुढे लष्करी व आर्थिकदृष्ट्या समृद्ध बनली. या राज्यामध्ये क्षत्रीयांची भूमिका महत्त्वाची ठरु लागली. राजगीरी, राजघाट, चिरंद, व कौसंबी या ठिकाणी नागरी वसाहती निर्माण झाल्या. उजैन, कोसल व मगध यांचाही विस्तार झाला. या विकास व विस्तारामुळे जनकुला ऐवजी जनपदाची निर्मिती झाली.

### आपली प्रगती तपासा

१. जनपदाबद्दलची माहिती सांगा.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

## ३.४ वैदिक कालखंडातील सामाजिक परिस्थिती

### पूर्व वैदिक कालखंडातील सामाजिक परिस्थिती :

आर्य सिंधू परिसरात स्थायिक झाले. तेव्हापासून सामुदायिक पध्दतीने जीवन जगत होते. तेथेच शेती व्यवसायाला प्ररंभ केला. उत्पादन वाढताच श्रम विभागणी क्रमप्राप्त झाली. आर्याचे सामाजिक जीवन जसजसे विकसित होऊ लागले तसतसे नवनवीन व्यवसाय सुरु झाले. आर्यांची सामाजिक परिस्थिती पुढीलप्रमाणे दिसून येते.

**१) आर्यांची कुटूंबसंस्था** - आर्यांनी भटकंती जीवनाचा त्याग करुन स्थिर झाले. सामाजिक स्वास्थ्याच्या जीवनाचा आधार म्हणजे कुटूंब होय. आर्यांची एकत्र कुटूंब पध्दत असून साधारण तीन पिढ्या एकत्र राहात होत्या. कुटूंबाला **कुल किंवा गृह** म्हणत असे, त्याच्या प्रमुखाला **गृहपती/पिता/दम्पति** म्हणत असे. कुटूंब पध्दत **पितृ सत्ताक** होते आई-वडिलांना लाडाने **नना व तत** ही नावे होती. आदरातिथ्य हे कुटूंबाचे वैशिष्ट्ये होते. गृहपती आपल्या पत्नीबरोबर सर्व प्रकारचे धार्मिक विधी करत असे. कुटुंबामध्ये पिता, मुलगा, मुलगी बहिण, भाऊ, आजा-आजी इ. असे. मुला-मुलींच्या लग्नात वडिलांची महत्वाची भूमिका असे. वडिलांच्या नंतर मोठा

मुलगा प्रमुख असे. त्या वडिलांची संपत्ती वारसाला मिळत असे. मुलगा नसेल तर मुलीला प्राप्त होत असे. कुटूंब प्रमुखास अपत्य नसल्यास त्यास दत्तक घेण्याचा अधिकार होता.

**२) आर्यांची वर्णव्यवस्था** - आर्याची समाजरचना ही सामाजिक समुहांची बनलेली होती. या सामाजिक समुहांना **वर्ण** असे म्हणत. हे वर्ण त्यांच्या कामावरुन पडलेले होते. परंतु ते पुढे वंश परंपरेने ठरले जाऊ लागले. ऋग्वेदातील **पुरुषसुक्त** नावाच्या दहाव्या मंडळांत चातुर्वर्ण पध्दतीचा **प्रथम उल्लेख** मिळतो. परंतु या काळात जाति संस्थेचे अस्तित्वही नव्हते. समाजाच्या गरजा वाढल्या त्या भागवण्यासाठी स्वतंत्र व्यवसाय करणारी वर्णव्यवस्था निर्माण झाली. प्रारंभी तीन वर्ण म्हणजे ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य हे होय. ऋग्वेदात जे सामाजिक जीवनप्रतिबिंबित झाले आहे त्यामुळे वर्ण व जाती असा उल्लेख नाही. यावेळी युध्द, अध्ययन, शेत- व्यापार व उद्योग हे प्रमुख व्यवसाय होते त्यावरुन हे तीन वर्ण निर्माण झाले असावेत. **ब्राम्हण**-वेद, विद्या, अध्ययन, धर्मविधी, मंत्रतंत्र व अन्य बौध्दिक कामे या वर्गाकडे दिली. समाजातील अतिशय प्रतिष्ठा व समाजपररुषांचे मुख समजल्या जाऊ लागला. **क्षत्रिय** जे धाडसी, धडधाकट, लढाऊ वृत्तीचे होते त्यांच्याकडे समाजाच्या संरक्षणाची जबाबदारी दिली, ते क्षत्रिय होय. समाजपुरुषाचे बाहू क्षत्रिय ठरले. **वैश्य** - जे शेती, व्यापार व इतर उद्योग करीत असत त्यांचा वैश्य वर्ण तयार झाला. या तीन वर्णाची रचना जन्माधिष्ठित नसून **गुणकर्मावर आधरित** होते. गुणानुसार कोणताही वर्ण निवडण्याचे स्वातंत्र्य प्रत्येकाला होते. त्यांच्या रोटी-बेटीचे व्यवहार चालत असत. **दास/शुद्र**-आर्यांनी अनार्यांचा पराभव केल्यानंतर आर्यांच्या दृष्टीने अनार्य दास (गुलाम) ठरलेत. त्यामुळे त्यांना अतिशय हीन वागणूक दिली. निकृष्ट दर्जाची कामे करावी लागत. ते आर्यांच्या दृष्टीने अस्पृश्य ठरले. या वर्गाला **शुद्र** म्हणण्यात येऊ लागले ते समाज पुरुषाचे पाय होते.

**३) वर्ण संकर** - प्रारंभीच्या काळात एका वर्णातून दुसऱ्या वर्णामध्ये जाता येते. उदा. विश्वामित्र हा क्षत्रिय नंतर ब्राम्हण झाला. अखेरच्या काळात वर्णभेद झाले. वर्ण शुध्दता राखण्याचा प्रयत्न केला परंतु पुढच्या काळात उच्च वर व कनिष्ठ वधू यांच्यात विवाह होऊ लागले. त्यास **अनुलोम विवाह** म्हणतात. कनिष्ठ पुरुष व वरिष्ठ स्त्री यांचा विवाह प्रतिलोम विवाह म्हणतात. प्रतिलोम विवाहीत संततीला समाजात मान नव्हता. शुद्र पुरुष व ब्राम्हण स्त्री यांच्या संततीला **चांडाळ** समजतात. क्षत्रिय पुरुष व ब्राम्हण स्त्री यांच्या संततीला **सूत** म्हणतात. वैश्य पुरुष व क्षत्रिय स्त्री यांच्या संततीला **मागध** म्हणतात. यातूनच वर्ण संकर होऊ लागले. त्यामुळे अनेक जाती पुढच्या काळात निर्माण झाल्या.

**४) स्त्री जीवन** - ऋग्वेद काळातील समाज पुरुषप्रधान संस्कृतीवर आधारलेला असूनही स्त्रीयांना समाजात मानाचे स्थान होते. मुलाप्रमाणे शिक्षण व संगोपन केले जात असे. आवडीनुसार जोडिदार निवडण्याचे स्वातंत्र्य होते. पुरुषाबरोबर बौध्दिक, आध्यात्मिक, सामाजिक, धार्मिक अधिकार स्त्रीयांना होते. स्त्री म्हणजे घराचे सर्वस्वच (जाया इदू अतम) असे विश्वामित्र सांगतात. मेजवान्या, नृत्य, धार्मिक कार्यक्रम यामध्ये स्त्रीया सहभागी होत असे. आध्यात्मिक उन्नतीसाठी आजन्म अविवाहित राहू शकत असे. **विश्ववारा, घोसा, अपाला, इन्द्राणी, लोपामुद्रा, सिकता, निनावसी इ. सुक्तकर्त्या** (ऋचा रचना) विदूषी ऋग्वेदात आढळतात. **बालहत्या, सती पध्दत, पडदा पध्दत इ.पध्दती ऋग्वेद काळात नव्हती.** **विष्पला** नावाची स्त्री **युध्दावर** गेल्याचा उल्लेख मिळतो. ती घायाळ झाली तेव्हा, आश्विनीने

सेवा केली. बालविवाह पध्दत नव्हती. मुलीचा उपनयन संस्कार केला जात असे. एकपत्नीत्व व बहुपत्नीत्व विवाह पध्दत आणि विधवा विवाह पध्दत होती. पुत्र नसलेल्या विधवा स्त्रीला आपल्या दीराशी **नियोग पध्दतीने** पुत्रप्राप्ती करता येत असे. काहीवेळा प्रेमविवाह होत असे. स्त्रीयांना पिता, पती यांच्या मालमत्तेत वारसाहक्क नव्हता. सभा-समितीमध्ये प्रवेश करुन राज्यकारभार करता येत नसे. **जनक** राजाच्या सभेत **ब्रम्हावादिनी** स्त्रियांचे दल असून, त्याची प्रमुख **गार्गी** होती. घरातील मुलगी गाईचे दूध काढण्याचे काम करत असल्याने तिला **दुहिती (दुहित्री)** असे म्हटले होते.

**५) विवाह संस्कार** - ऋग्वेद काळात विवाह संस्था विकसित झाली होती. विवाह हा एक धार्मिक समस्कार समजला जाई. ऋग्वेदामधील **विवाहसुक्तात** विवाहाबद्दल माहिती दिलेली आहे. साधारणपणे एकपत्नी विवाह प्रथा होती. परंतु राजे व श्रीमंत लोक अनेक विवाह करत असे. **दस्यू किंवा शत्रूशी विवाह** संबंध निषिध मानल्या जात. **अग्नी** देवतेला साक्ष मानून विवाह केला जात असे. **स्वयंवर विवाह** पध्दत होती. स्त्रीला पती निवडण्याचा अधिकार होता. अविवाहित मुलीला **अमाजू** म्हणत. चर्म रोगामुळे घोषा हिने फार उशीरा विवाह केला. असा ऋग्वेदात उल्लेख आहे. विवाह विधी बहुधा **वधुगृही** होत असत. बालविवाह, सगोत्र विवाह प्रचलित नव्हता. मुलीचे वय १६ ते २० वर्षाचे असताना विवाह होत असे. विवाहाच्या वेळी हुंडा देण्याची प्रथा होती. तो गायीच्या स्वरुपात दिला जात असे. सवर्ण, सगोत्र आणि निकट संबंधीत विवाह होत नसे. अविवाहित असलेल्या मुली आपल्या वडिलांच्या घरी राहून त्यांच्या कुटुंबाची सेवा करत असे. पुत्रहीन विधवेला पुत्रप्राप्तीपर्यंत आपल्या दीराशी शरीरसंबंध ठेवता येत असे. ही प्रथा **नियोग प्रथा** म्हणून ओळखतात.

**६) भोजन** - ऋग्वेदातील उल्लेखावरुन समाजाच्या आहारात शाकाहार व मांसाहार होता. त्यांच्या आहारात गहू, तांदूळ, तीळ, जव, सातू या धान्याचा उपयोग केला जाई. दुध, दुधाचे पदार्थ, फळे, भाजीपाला यांचाही उपयोग होता. **मांसाहारामध्ये** बकरी, मेंढ्या, बैल, मासे यांचा उपयोग केला जाई. **अश्वमेधाच्या वेळी** घोड्याचे मांस खाण्याची प्रथा होती. लग्न, उत्सव, यज्ञ इ. प्रसंगी मांस व मद्य सेवन करत. **सोमरस** हा लोकप्रिय असून यज्ञ व युध्द प्रसंगी प्राशन केला जाई. त्यामुळे क्षत्रियवृत्ती वाढते असा समज होता. **बैल** व **गोऱ्हा** यांचे मांस लोकप्रिय हेते. मद्य धान्यापासून बनवीत. मद्यपान हे दुर्व्यसन समजले जाई. **किकाटो** प्रदेश व **मूजवत्** पर्वतावर सोमवल्ली मोठ्या प्रमाणावर उगवत असे. **गहू व यव** हे प्रमुख अन्न होते.

**७) वेशभूषा** - आर्याच्या पोशाखात बहुधा दोन किंवा तीन वस्त्रे असत. **कापूस, लोकर, हरीणीची कातडी** यांच्यापासून बनविलेली व विविध रंगांची असत. कमरेभोवती गुंडाळलेली निवि, अंगात घातलेले वस्त्र म्हणजेच **अधोवस्त्र** म्हणजे **वासस** किंवा **परिधान** होय. ओढणीसारखे परिधान केलेले वस्त्र **अधिवास (उत्तरीय)** होय त्यास अल्क किंवा दुपी म्हणतात. साधारणपणे आकाशातील ताऱ्यांचे त्यावर कशिद काढलेले असे. **ब्रम्हचारी** हरणाची कातडी वापरत यज्ञाच्या वेळी **तर्प्य (रेशमी अन्तर्वस्त्र)** वापरत असत. स्त्री पुरुष दोघेही **पगडी** वापरत असत. पुरुष धोतर, कुर्ता, पगडी तर स्त्रिया चोळी, ओढणी वापरत असे. **पेशस्कारी** नावाच्या स्त्रीया सुईने कशिदे वस्त्रावर करत असत.

**८) केशभूषा** - स्त्री व पुरुष दोघेही डोक्यावर केस राखत असत. दोघेही केसाची चांगली निगा ठेवत. स्त्रिया केसाच्या २,३,४ वेण्या घालत. तेल लावून केस विंचरायची प्रथा होती. पुरुष केसाचा चुडा डोक्यावर बांधत. पुरुष दाढी व मिशा राखत असत.

**९) अलंकार** - स्त्री पुरुष दोघेही अलंकार वापरत असत. त्यामध्ये कर्णफुले, कंठे, बांगड्या, मोत्यांचे हार, केसात कुरीर, तोडे, गळ्यात निस्क, सर्व रत्नांचे मणी, नुपूर, बाजूबंद, अंगठी इ. अलंकार होते. सोने, चांदी, रत्न, मणी इ. अलंकार असे.

**१०) प्रसाधने** - आर्यांना साज शृंगारात विशेष आवड असत. स्त्रीया भांगात सिंदूर भरत असत. शरीरशुध्दीसाठी चंदनाचा वापर करत असत. काजळ, पावडर, लाली, सुगंधीद्रव्ये फुलांच्या माळा वापरत. ओठ, गाल, नखे, पाय रंगवित. चुडाकर्मन (जावळ काढणे) व गोदा (शेंडी राखणे) असे दोन वेळा केस कापण्याचे विधी होत.

**११) मनोरंजनाची साधने** - रथस्पर्धा, घोड्यांची स्पर्धा, पासे (धुत), नृत्य, गायन, शिकार, संगीत, मुष्टियुध्द ही आर्यांची प्रमुख मनोरंजनाची साधने होती. द्यूतात भांडणे, कर्जबाजारीपणा, जननिंदा, सर्वनाश इ. अनर्थ ओढवतात याची जाणीव होती. स्पर्धा यासाठी **आजि** शब्द होता. स्पर्धाच्या मैदानात **काष्ठा/सप्त्य** म्हणत **विश्पला** नावाच्या जलद धावणाऱ्या घोड्याचा उल्लेख आहे. **संगीतामध्ये** नृत्य गायन, वाद्य यांचा समावेश होता. वाद्यामध्ये ढोल, बासरी, सारंगी, वीणा, शंख, झाँझ मृदंग व दुन्दुभी हे महत्वाचे होते. **आनंदोत्सावाच्या** प्रसंगी स्त्री पुरुष नृत्य करत. **वीर पुरुषांना शिकारीचा** नाद होता. शिकारीसाठी धनुष्यबाण, पिंजरे, जाळी, भाला, परशू यांचा उपयोग केला जात असे.

**१२) आश्रम व्यवस्था** - ऋग्वेदाच्या शेवटच्या कालखंडात जीवन जगण्याच्या उद्देशाने आश्रमव्यवस्था स्थापन झाली. परंतु याचा उल्लेख मिळत नाही. आश्रम व्यवस्थेचे चार भाग असून प्रथम तीन वर्णांच्या (ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य) लोकांना प्रवेश होता. शुद्रांना यांमध्ये प्रवेश नव्हता.

**१३) गृहव्यवस्था** - भारतात आल्यावर आर्य स्थायिक झाले. त्यांची घरे, लाकूड, बांबू, वेत यांनी बनवलेली असत. प्रत्येक घरात **अग्निशाळा** असे. त्यामध्ये सतत अग्निजवळ असत. त्यांच्या भोवती बसण्याउठण्याची खोली असत. घराजवळच गुरांसाठी गोठा असत.

**१४) आर्यांची कला** - आर्यांना विविध प्रकारच्या कलेमध्ये रुची होती. कलेसंदर्भात आर्य जागृत असून कलेच्या विकासासाठी प्रयत्नशील होते. या काळात भटकतींचे जीवन संपून ते स्थिर झाले होते. त्यांच्याकडे वेळ होता. त्यांना ज्या ज्या गरजा निर्माण झाल्या त्या सोडवण्याच्या प्रयत्नातून त्यांच्या कलेचा किंवा सांस्कृतिक विकास झाला.

**१) काव्य कला** - आर्यांनी काव्य कलेमध्ये खूप प्रगती केली होती. त्याचे उदाहरण म्हणजे ऋग्वेद ग्रंथ होय. ऋग्वेदातील काव्य संगीतमय व विविध भावनांचे तरंग दाखवणारे होते. निसर्गदृष्यांचे देवतीकरण केले. त्यांची आराधना करण्यासाठी काव्य रचना केली. गृत्समद,



munotes.in

विश्वामित्र, वामदेव, अत्रि, भरव्दाज, वसिष्ठ, कण्व या कवींच्या कित्येक पिढ्यांत कवित्व होते. उषा देवतेवरील कवने म्हणजे भावगीतातील टपोरे मोतीच होय. **वरुण सुक्ते** भक्तिरस परिपूर्ण आहेत.

**२) लेखनकला** - ऋग्वेदातील लेखनकला माहित होती की नाही. हे सांगणे कठीण आहे. कारण त्याचा उपयोग करीत असत किंवा नसत याबाबत माहिती कोठेही नाही. वेदमंत्र गुरुकडून शिष्याने घ्यावेत व मुखोद्गत कारावयाचे असल्यामुळे लेखनकलेला फारसे महत्व नसावे.

**३) स्थापत्य कला** - ऋग्वेदात **पुर** शब्दांचा उल्लेख मोठ्या **भवनांसाठी** केलेला असतो. या काळात गृह, राजमहल, नगर याचे ज्ञान आर्यांना होते. हर्म्य शब्द राज प्रासाद यासाठी वापरला जात. आर्यांनी **इंद्राच्या** भव्य प्रासादाचे वर्णन साहस्त्र खांबांचे व अनेक प्रवेशव्दारांचे निवास स्थान असे केले. त्यामुळे ती कला आर्यांना अवगत होती. ऋग्वेदात दुर्ग, आयस, अश्चमय, सुदृढभवन या शब्दांचा उल्लेख येतो. त्यावरुन त्यांना ही कला अवगत होती.

**४) वाद्य- नृत्यकला** - आर्यांनी वेगवेगळी वाद्य निर्माण केली होती. विशेष कार्यक्रम उत्सवाच्या वेळी नृत्य केले जात असे. त्यावरुन वाद्य-नृत्यकला ज्ञात होती.

५) विविध धातूचे अलंकार बनवण्याची कला होती.

६) कापड विणणे, शिवणे आणि रंग देण्याची कला ही माहीत होती

७) विविध धातूची साहित्य बनवण्याची कला - भांडी, शिकारीचे साहित्य, आयुध्दे, इ.

**१५) आर्यांचे विज्ञान** - ऋग्वेदकालीन आर्यांनी वैधक, काव्य, ज्योतिष इ. शास्त्रामध्ये मोठी प्रगती केली. विशेषतः आर्यांनी वैद्यकशास्त्रात मोठी प्रगती केली. काही रोगासंबंधी माहिती होती. **यक्षमा** म्हणजे क्षयरोग हा फार भयंकर समजण्यात येई. कावीळ व अति मद्यपानामुळे होणारे रोग याची माहिती ऋग्वेदात आहे. कामला, ज्वर या रोगाची माहिती व औषधी वनस्पतीची दिली आहे. ऋग्वेदात **देवांचा वैद्य** म्हणून **अश्विनीकुमारचा** उल्लेख केला आहे. अश्विनीकुमार आंधळ्याला दृष्टी देतो, तुटलेला पाय पुन्हा जोडतो. माणसाला शक्तीमान बनवितो असा उल्लेख **अश्विन सुक्तात** सापडतो. दुषित पाण्यापासून होणारा रोग म्हणजे **श्लीपद** होय, याची माहिती आर्यांना होती. प्रार्थना व मंत्रविद्या याचा हा उपयोग केला जात असे. मंत्रांचा उपयोग विषबाधेपासून मुक्तता, वाईट स्वप्नांचा व अपशकुनांचा परिणाम टाळण्यासाठी करीत. अश्विनीकुमार एक कुशल चिकित्सक म्हणून त्याचा उल्लेख आहे. त्याने **विशप्ल**ा हिचा तुटलेला पाय जोडलेला उल्लेख आहे. प्रसिध्द विदुषी घोषा ही कुष्ठरोग चिकित्सा करत असत. ऋग्वेदात परार्धापर्यंतच्या सर्व संख्या, गुणाकार, भागाकार, बेरीज, वजाबाकी यांचा उल्लेख आहे. यावरुन आर्यांनी **गणित शास्त्रात** ही मोठी प्रगती केली होती. आर्यांनी **ज्योतिषशास्त्रातही** खूप प्रगती केली त्यांनी वर्षाची विभागणी १२ महिन्यात केली. प्रत्येक महिना ३० दिवसाचा होता. १३ वा अधिक महिन्याचा उल्लेख योतो. सूर्य ग्रहणासंबंधीचा उल्लेख **पाचव्या मंडलात** आहे. **स्वर्भानू** नावाच्या राक्षसाने सूर्यास झाकून टाकले, तेव्हा अत्रि ऋषींनी मंत्र म्हणून सूर्याची सुटका केली. हे सूर्यग्रहण इ.स. पू. ३९२८ या वर्षी झाले असावे असे **डॉ. सेनगुप्ता** याने गणितशास्त्राच्या आधारे मांडले. वसंत, ग्रीष्म, शरद या ऋतुंचा उल्लेख **पुरुषसुक्तात** आढळतो.

**१६) आर्यांची शिक्षण पध्दत** - ऋग्वेद काळात आचार्यांचे घर म्हणजे शाळा होती. तेथे सर्व विद्यार्थी शिक्षणासाठी येत असत. या गुरुकुल शिक्षण पध्दतीत गुरुने शिष्य समुहाला अध्यायनाची संथा देण्याचा उल्लेख आढळतो. उपनयन संस्कारानंतर विद्यार्थी गुरुगृही जात वैदिक ग्रंथांचा अभ्यास जीवनविषयक शिक्षण असे. ब्राम्हणांना ब्राम्हविद्या, क्षत्रियांना युध्दविधा वैश्यांना व्यवसायोपयोगी शिक्षण दिले जात. विद्यार्थी गुरुदक्षिणा अर्पण करत. ऋग्वेदात संघ नावाची उच्च शिक्षण संस्थांचे वर्णन आढळते. वैदिकज्ञान व इतर सर्वज्ञान मौखिक स्वरुपात दिले जात. कला व विद्याचे आर्य उपासक असून ऋग्वेदातील **१० मंडळातील ९७ व्या सुक्तात** याची माहिती प्राप्त होते.

**उत्तर वैदिक कालखंडातील सामाजिक परिस्थिती :**

उत्तर वैदिक कालखंडात समाज जीवनाचे सुसंघटीत नियमन आर्यांने केल्याने या कालखंडातील सामाजिक परिस्थिती अत्यंत चांगली होती. वर्णव्यवस्था, आश्रमव्यवस्था, संस्कार, विवाह पद्धती आदी समाज जीवनाशी संबंधित असणाऱ्या संकल्पना पूर्ण विकसित अवस्थेला पोहोचल्या होत्या. पुढील घटकांच्या आधारे आपण ब्राह्मण कालखंडातील सामाजिक परिस्थिती स्पष्ट करणार आहोत.

१) **वर्णव्यवस्थेचे जातीव्यवस्थेत रुपांतर :-** उत्तर वैदिक कालखंडात जातीव्यवस्था दृढ झाली होती. कारण वर्णव्यवस्थेचे रुपांतर जातीव्यवस्थेमध्ये झाले होते. ज्या वर्णात जन्म होत असे त्या अनुसार कामे करणे बंधनकारक होऊ लागल्याने जन्मानुसार जातीचे विभाजन होऊ लागले. ब्राह्मण कालखंडात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व क्षुद्र अशा प्रमुख चार जाती प्रचलित होत्या. मूळ चार वर्णाच्या संकरापासून पुढे आणखी १२ जाती निर्माण झाल्या. पुढे दोन पिढ्यातच या १२ जातीपासून संकर प्रक्रियेतून २०४ जाती पुढे उदयाला आल्या.

वर्णव्यवस्थेनुसार कर्म करावे लागल्याने प्रत्येक वर्णीयांची कामे विभागली गेली होती. या ठिकाणी आपण त्यांच्या कामाची माहिती पाहणार आहोत.

अ) **ब्राह्मण :-** ब्राह्मण हा समाजातील प्रतिष्ठीत वर्ण होता. या वर्णातील लोक अध्ययन, अध्यापन, यज्ञ करणे आदी कामे करत होता. या वर्गाकडे वेदपठण करुन त्याचे जतन करण्याचे कामही होते. हे लोक चरितार्थ चालविण्यासाठी प्रसंगी दान घेत होते. तर प्रसंगी स्वतः दान करीत होते.

ब) **क्षत्रिय :-** क्षत्रिय हा समाजातील प्रतिष्ठित वर्ण होता. प्रजापालन, प्रजारक्षण व युद्ध करणे ही त्यांची प्रमुख कामे होती. अध्ययन व यज्ञ करणे ही त्यांची प्रमुख कर्तव्य होती.

क) **वैश्य :-** 'वैश्य' हा शब्द व्यापारी अर्थाने रुढ झाला असून व्यापार करणारे ते वैश्य असे त्या कालखंडात समीकरण बनले होते. शेती, व्यापार, उद्योगव्यवसाय, पशुपालन ही या वर्गाची कामे होती. धार्मिक विधी, संस्कार हे या वर्गाचे हक्क होते. ब्राह्मण, क्षत्रियांपेक्षा या वर्गाचा दर्जा कमी होता.

**ड) क्षुद्र :-** दास, दस्यू, गुलाम, सेवक या नावाने हा वर्ण ओळखला जात होता. हा अनार्यांचा वंश होता. वरील तीन वर्णीयांची सेवा करणे हे या वर्गाचे काम होते. या वर्णास विवाह, मालमत्ता, संस्कार, धार्मिक विधी या बाबींचे अधिकार नव्हते.

**२) आश्रम व्यवस्था :-** उत्तर वैदिक कालखंडातील सामाजिक जीवनाचे नियमन करण्यासाठी उदय व विकास पावलेली सामाजिक संस्था म्हणजे आश्रम व्यवस्था होय. मानवाच्या वैयक्तिक आयुष्याला वळण लावण्यासाठी आर्यांनी आश्रम व्यवस्थेची योजना केली होती. "बालवयात शिक्षण, तरुण वयात कुटुंब व्यवस्था, उतार वयात समाजसेवा व शेवटी सर्वसंग परित्याग करुन परमेश्वराचे चिंतन असेच सामान्य व्यक्तीचे जीवन असावे असे ठरवून आर्यांनी जे जीवनाचे रेखीव स्वरुप तयार केले होते या स्वरुपालाच आश्रमव्यवस्था असे म्हणतात." मानवाचे आयुष्य रेखीव, सुसंघटीत व सुरळीत चालून त्याला ऐहिक व पारमार्थिक जीवनाचा आनंद लुटता यावा हा या आश्रम व्यवस्थेचा प्रमुख उद्देश होता.

आश्रम म्हणजे 'श्रम करण्याची जागा' होय. मानवी जीवनाची ध्येय साध्य करण्यासाठी जेथे श्रम केले जाते अशी जीवनसंस्था म्हणजे आश्रमव्यवस्था होय. आश्रमव्यवस्थेसाठी मनुष्याच्या आयुष्याचे चार भाग सांगून प्रत्येक भागात मनुष्याने कोणते कर्म करावे हे ठरवून दिले आहे. ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम, सन्यासाश्रम असे हे आश्रमांचे चार भाग आहेत.

**१) ब्रह्मचर्याश्रम :-** उत्तर वैदिक कालखंडात मनुष्याच्या बौद्धिक व शिक्षित आयुष्यासाठी ब्रह्मचर्याश्रम होता. मुलांच्या उपनयन संस्कारानंतर या आश्रमाची सुरुवात होत असे. धर्मशास्त्र या ग्रहसूत्रातील माहितीनुसार या आश्रमातील ब्राह्मण मुलांच्या शिक्षणाची सुरुवात वयाच्या आठव्या वर्षी होत असे तर क्षत्रिय मुलांच्या शिक्षणाची सुरुवात वयाच्या अकराव्या वर्षी व वैश्य मुलांच्या शिक्षणाची सुरुवात वयाच्या तेराव्या वर्षी होत असे. सर्वच मुलांना वयाच्या विसाव्या वर्षापर्यंत गुरुगृही शिक्षणासाठी रहावे लागत होते.

या आश्रमात ब्राह्मण शिष्यांना वेदाभ्यासाशिवाय ज्योतिष, वैद्यक आदी विद्या शिकविल्या जात होत्या. क्षत्रिय शिष्यांना वेदाभ्यासाबरोबरच धनुर्विद्या, राजनिती व दंडनितीचे शिक्षण दिले जात होते. तर वैश्य शिष्यांना वेदाभ्यासाबरोबरच शेती व व्यापारविषयक शिक्षण दिले जात होते.

ब्रह्मचर्याश्रमात शिष्यांसाठी खालील नियम होते.

१) आश्रमात प्रवेश घेतलेल्या शिष्याने गुरु, गुरुपत्नी व गुरुच्या घरातील इतर माणसांचा आदर करावा.

२) आश्रमातील शिष्याने आहार व निद्रेबाबत संयम पाळावा.

३) आश्रमातील शिष्याने सूर्योदयापूर्वी उठावे, स्नान करावे व नित्याच्या धार्मिक विधी पूर्ण कराव्यात.

४) आश्रमातील शिष्याने मद्य, मांस, स्त्रिया, गायन, वादन, नृत्य, सुगंधी द्रव्य यापासून दूर रहावे.

५) आश्रमातील शिष्याने अहिंसा तत्त्वाचा अंगीकार करावा.

६) आश्रमातील शिष्याने कामक्रोध भावनांपासून दूर रहावे.

७) आश्रमातील शिष्यांने संयमी, नियमित व साधे जीवन जगावे.

८) आश्रमातील शिष्याने ३ वेळा स्नान करुन सूर्य, अग्नी व इतर देवतांची पूजा करावी.

ब्रह्मचर्याश्रमातील शिक्षण पूर्ण झाल्यानंतर आश्रमात समावर्तन समारंभाचे आयोजन करण्यात येत असे. या समारंभात गुरु शिष्यांना त्यांच्या भावी आयुष्याबद्ल मार्गदर्शन करत असे समारंभ संपल्यानंतर शिष्य गुरुना गुरुदक्षिणा देऊन आपल्या स्वगृही परतत असे. साधारणतः आठ ते पंचवीस वर्ष असा या आश्रमाचा कालखंड मानला जात होता.

**२) गृहस्थाश्रम :-** उत्तर वैदिक कालखंडात मनुष्याच्या सांसारीक जीवनासाठी गृहस्थाश्रम होता. ब्रह्मचर्याश्रमातील शिक्षण पूर्ण केल्यानंतर व समावर्तनाची प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर मनुष्याला या आश्रमात प्रवेश करावा लागत असे. विवाह केल्याने मनुष्याचा या आश्रमात आपोआपच प्रवेश होत असे.

मनुने या आश्रमाला महत्व दिले आहे. मनुने असे म्हटले आहे की, ज्याप्रमाणे प्राणवायूच्या मदतीने सर्व जीव जगतात. त्याचप्रमाणे गृहस्थाश्रमाच्या मदतीने सर्व मानव आपला उदरनिर्वाह करतात. गृहस्थाश्रमाच्या मदतीने मानवाला धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार पुरुषार्थांची खऱ्या अर्थाने प्राप्ती होते. धर्मसुत्र व स्मृतीग्रंथांनी या आश्रमव्यवस्थेला महत्त्व दिले आहे.

या आश्रमात प्रवेश करणाऱ्या मानवाला स्मृतीकार व धर्मशास्त्रकारांनी काही सूचना केल्या आहेत. या सूचना खाली नमूद करण्यात आल्या आहेत.

१) गृहस्थाश्रमात प्रवेश करणाऱ्या मानवाने कुटुंबाचे पालनपोषण करावे.

२) गृहस्थाश्रमात प्रवेश करणाऱ्या मानवाने प्रजोत्पादन करुन वंशवेल वाढवावी.

३) गृहस्थाश्रमात प्रवेश करणाऱ्या मानवाने मन, शरीर व वाणी पवित्र ठेवावी.

४) गृहस्थाश्रमात प्रवेश करणाऱ्या मानवानी परस्त्रीची अभिलाषा करु नये.

५) गृहस्थाश्रमात प्रवेश करणाऱ्या व्यक्तीनी ब्रह्मचारी, सन्याशी यांना अन्नदान करावे, यथाशक्ती दान करावे.

६) गृहस्थाश्रमात प्रवेश करणाऱ्या मनुष्याने दिवसा, पूर्वरात्री किंवा उत्तररात्री झोपू नये.

७) गृहस्थाश्रमात प्रवेश केलेल्या मनुष्याने शेवटच्या वर्षात आपल्या प्रपंचाची जबाबदारी आपल्या पुत्रांवर टाकून आपल्या प्रपंचातून मुक्त व्हावे.

मनुष्याच्या सांसारीक जीवनाशी या आश्रमाचा संबंध असल्याने या आश्रमाला जास्त महत्त्व होते. साधारणतः २५ ते ५० वर्ष असा या आश्रमाचा कालखंड होता.

**३) वानप्रस्थाश्रम :-** उत्तर वैदिक कालखंडात मनुष्याच्या सन्यासाश्रमाच्या पूर्व तयारीसाठी वानप्रस्थाश्रम निर्माण करण्यात आला होता. गृहस्थाश्रमातील सर्व कर्तव्य पूर्ण केल्यानंतर मनुष्य या आश्रमात प्रवेश करतो. या बाबत मनुस्मृतीचा कर्ता मनू म्हणतो "केस पांढरे होणे यासारखी वृद्धत्वाची लक्षणे दिसू लागल्यानंतर व मुलांना मुले झाल्यानंतर मनुष्य वानप्रस्थाश्रमाच्या योग्य होतो." या आश्रमात प्रवेश केलेल्या मनुष्याने सत्ता, संपत्ती, संसार, मुले, घरदार, इत्यादींचा मोह टाळून वानप्रस्थाचे नियम पाळावेत.

वानप्रस्थाश्रमाचा जो आचारधर्म सांगितला आहे तो असा आहे –

१) वानप्रस्थाश्रम स्विकारणाऱ्या मनुष्याने आपल्या इंद्रियांवर नियंत्रण ठेवावा.

२) वानप्रस्थाश्रम स्विकारणाऱ्या मनुष्याने शरीर व मन यांच्या वृद्धीसाठी उपवास करावेत, व्रतवैकल्य करावेत.

३) वानप्रस्थाश्रम स्विकारणाऱ्या मनुष्याने प्राणीमात्रांवर प्रेम करावे.

४) वानप्रस्थाश्रम स्विकारणाऱ्या मनुष्याने अध्ययन, मनन व चिंतन यात वेळ घालवावा.

५) वानप्रस्थाश्रम स्विकारणाऱ्या व्यक्तीने एकाकीपणाने राहण्याची तयारी करावी.

या आश्रमातील मनुष्याचे जीवन क्लेशदायक असते. क्लेश सोसत असताना या आश्रमात मनुष्याचा मृत्यू आला तर व्यक्तीला ब्रह्मलोकाची प्राप्ती होते असे मनुने म्हटले आहे. मात्र क्लेश सोसून जर मनुष्य जिवंत रहात असेल तर तो पुढील सन्यासाश्रमासाठी पात्र ठरतो.

'वानप्रस्थ' म्हणजे वनात प्रस्थापित झालेल्या मनुष्याचा जीवनक्रम होय. मनुष्याच्या जीवनातील ५० ते ६० वर्ष असा या आश्रमाचा कालखंड मानला जातो.

**४) सन्यासाश्रम :-** उत्तर वैदिक कालखंडातील आश्रमव्यवस्थेतील शेवटचा आश्रम म्हणजे सन्यासाश्रम होय. सर्वसंगपरित्याग हे या आश्रमाचे लक्षण आहे. सुरुवातीला हा आश्रम आर्यांच्या त्रैवर्णिकांसाठी होता. पुढे तो फक्त ब्राह्मणवर्गापुरताच मर्यादित राहिला. सन्यासाश्रम स्विकारणाऱ्या मनुष्याने घर, पत्नी, मुले-मुली, नातेवाईक, मित्र, समाज या सर्वांपासून दूर रहावे. भगवी वस्त्रे, मुंडण, त्रिदंडधारण व कमंडलू ही जी सन्याशांची बाह्यांगे आहेत याचा स्विकार करावा.

सन्यासाश्रम स्विकारणाऱ्या मनुष्यांसाठी या आश्रमाच्या ज्या आचारसंहिता निर्माण करण्यात आल्या होत्या त्या अत्यंत महत्त्वाच्या होत्या. त्याचे पालन जर मनुष्याने काटेकोरपणे केले तर मनुष्याला मोक्षप्राप्तीपर्यंत जात येत असे, असे धर्मसूत्रकारांनी व स्मृतीकाराने सांगितले आहे. या आचारसंहिता पुढीलप्रमाणे आहेत.

१) सन्यासाश्रम स्विकारणाऱ्या मनुष्याने सहृदयतेने वागावे.

२) सन्यासाश्रम स्विकारणाऱ्या मनुष्याने आपल्या इंद्रियांवर ताबा ठेवावा.

३) सन्यासाश्रम स्विकारणाऱ्या मनुष्याने एका ठिकाणी एकच दिवस मुक्काम करावा.

४) सन्यासाश्रम स्विकारणाऱ्या मनुष्याने गतगोष्टीबद्दल शोक करु नये.

५) सन्यासाश्रम स्विकारणाऱ्या मनुष्याने कोणास उपदेशही करु नये.

६) सन्यासाश्रम स्विकारणाऱ्या व्यक्तीनी अरण्यात, नदीकाठी, वृक्षाखाली रहावे.

७) सन्यासाश्रम स्विकारणाऱ्या व्यक्तीनी कोणाचाही द्वेश करु नये, तसेच कोणाच्याही संदर्भात चहाडी करु नये.

८) सन्यासाश्रम स्विकारणाऱ्या व्यक्तीने ब्रह्मचर्य, सत्य, अहिंसा यांचे काटेकोरपणे पालन करावे.

munotes.in

या आश्रमातील आचारसंहितेच्या पालनासाठी मनोनिग्रहाची गरज असे. ज्या मनुष्याचा मनोनिग्रह अढळ असे तो या कर्मकृत्यावर मात करत असे. मात्र ही आचारसंहिता खडतर असल्याने पुढे ही आश्रमव्यवस्था मोडकळीस आली. या आश्रम व्यवस्थेचा कालखंड वय वर्ष ६० ते पुढे मनुष्याच्या मृत्यूपर्यंतचा होता.

उत्तर वैदिक कालखंडात निर्माण झालेली आश्रमव्यवस्था एक आदर्श अशी समाजरचना होती. जगातील कोणत्याही मानव समाजात अशा प्रकारची मानवी समाजाच्या नियमनासाठी संस्था निर्माण झाली नाही. म्हणूनच या आश्रमसंस्थेला महत्त्व आहे.

**आपली प्रगती तपासा**

१. ब्राम्हण कालखंडातील आश्रम व्यवस्था कशी होती.

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

**३) संस्कार :-** उत्तर वैदिक कालखंडात वर्णधर्म व आश्रमधर्माने मनुष्याच्या जीवनाचे नियमन झाले होते. मनुष्याच्या जीवनाला सुसंगती प्राप्त झाली होती. मात्र खऱ्या अर्थाने मानवी जीवन खुलविण्यासाठी संस्कारांची गरज होती. यातूनच संस्कार ही संकल्पना उदयास आली.
"ज्या क्रियेने व्यक्तीच्या ठिकाणी गुण निर्माण होतात व दोष नष्ट होऊन ती व्यक्ती विशिष्ट कार्यास लायक केली जाते त्या क्रियेस संस्कार असे म्हटले जाते."

"संस्कार या शब्दाचा अर्थ शुद्धता अथवा पवित्रता होय."

संस्कारांच्या संख्येबद्दल मतभेद आहेत.

- गौतमधर्मसूत्रात ४० संस्कार सांगितले आहेत.
- वेदव्यास स्मृतीत १६ संस्कार सांगितले आहेत.
- वैखानसच्या मते संस्कारांची संख्या १८ आहे.
- धर्मशास्त्रकारांच्या मते संस्कारांची संख्या १६ आहे.

उत्तर वैदिक कालखंडात मनुष्यांच्या व्यक्तीमत्त्व विकासासाठी, उन्नतीसाठी संस्कारांचे नियमित आयोजन केले जात होते.

संस्कारांमुळे व्यक्तीचे जीवन उन्नत, परिकृत व सुसंस्कृत बनत असे.
ब्राह्मण कालखंडात प्रचलीत असणारे सोळा संस्कार पुढील प्रमाणे आहेत.

१) **गर्भदान :-** शुद्ध संतती होण्यासाठी माता-पित्यांवर जो संस्कार केला जातो त्या संस्कारास गर्भदान संस्कार असे म्हटले जाते.

munotes.in

२) **पुसंवन :-** पुत्र व्हावा यासाठी गर्भधारणेनंतर दोन किंवा चार महिन्यात गर्भवती स्त्रीवर जो संस्कार केला जात होता त्या संस्कारास पुसंवन असे म्हटले जाते.

३) **सीमंतोन्नयन :-** गर्भवती स्त्रीला शारिरीक स्वास्थ्य व मानसिक प्रसन्नता मिळावी यासाठी जो संस्कार केला जातो त्या संस्काराला सीमंतोन्नयन संस्कार असे म्हटले जाते.

४) **जातकर्म :-** स्त्री प्रसुतीनंतर नवजात बालक तेजस्वी व्हावे यासाठी जो संस्कार केला जातो त्या संस्काराला जातकर्म संस्कार असे म्हटले जाते.

५) **नामकर्म :-** अपत्याच्या जन्मानंतर बाराव्या दिवशी त्याचे समारंभपूर्वक बारसे करुन त्याचे नांव ठेवण्यासाठी जो संस्कार केला जातो त्या संस्काराला नामकर्म संस्कार असे म्हटले जाते.

६) **निष्कर्मण :-** अपत्याच्या जन्मानंतर त्याला प्रथमच घराबाहेर नेण्यासाठी जो संस्कार केला जातो त्या संस्काराला निष्क्रमण संस्कार असे म्हटले जाते.

७) **अन्नप्राशन :-** अपत्यास सहा महिन्यानंतर अन्न देण्याची सुरुवात करण्यासाठी जो संस्कार केला जातो त्या संस्कारास अन्नप्राशन संस्कार असे म्हटले जाते. यास उष्टावण असेसुद्धा म्हटले जाते.

८) **वपणक्रिया :-** अपत्याचे वयाच्या चौथ्या वर्षी जावळ काढून शेंडी ठेवण्यासाठी जो संस्कार केला जातो त्या संस्काराला वपणक्रिया संस्कार असे म्हटले जाते. या संस्काराला चूडाकरण संस्कार, मुण्डन संस्कार, चौल संस्कार ही इतर नांवे आहेत.

९) **कर्णवेध :-** अपत्याचे नवव्या किंवा दहाव्या महिन्यात कान टोचण्यासाठी जो संस्कार केला जातो त्या संस्काराला कर्णवेध संस्कार असे म्हटले जाते.

१०) **उपनयन :-** अपत्यास आठ वर्ष पूर्ण झाल्यानंतर त्याला ब्रह्मचर्य आश्रमात पाठविण्यासाठी जो संस्कार केला जात होता त्या संस्काराला उपनयन संस्कार असे म्हटले जाते. या संस्कारास व्रतादेश संस्कार तसेच मौजीबंधन संस्कार असेही म्हटल जाते.

११) **वेदारंभ :-** अपत्याच्या वेदअभ्यास आरंभापूर्वी अपत्यावर गुरुकुलात जो संस्कार केला जातो त्या संस्कारास वेदारंभ संस्कार असे म्हटले जाते.

१२) **केशांत :-** अपत्याची सोळा वर्ष पूर्ण झाल्यानंतर प्रथम अपत्याला दाढी करण्याची संधी प्राप्त होते अशा प्रसंगी त्याच्यावर जो संस्कार केला जातो त्याला केशांत संस्कार असे म्हटले जाते.

१३) **समावर्तन :-** अपत्याने ब्रह्मचर्याश्रमात विद्या पूर्ण केल्यानंतर त्याच्या गृहस्थाश्रमातील प्रवेशासाठी जो विधीवत संस्कार केला जात होता त्या सस्काराला सभावर्तन संस्कार असे म्हटले जाते. याचे स्नान संस्कार असेही नांव आहे.

१४) **विवाह :-** अपल्याला प्रपंच बंधनात अडकविण्यासाठी तसेच त्यांच्या गृहस्थाश्रम प्रवेशासाठी विवाहाचा जो विधीवत संस्कार केला जात होता. त्याला विवाह संस्कार असे म्हटले जाते.

१५) **अग्नीपरिग्रहण :-** अपत्याच्या विवाहानंतर अग्नी देवतेच्या स्थापनेसाठी जो विधीवत संस्कार केला जातो त्या संस्काराला अग्नीपरिग्रहण संस्कार असे म्हटले जाते.

**१६) अंत्येष्टी :-** मनुष्याच्या मृत्यूनंतर मनुष्याच्या देहावर जो अग्नीसंस्कार केला जातो त्या संस्काराला अंत्येष्टी असे म्हटले जाते. या संस्कारास त्रेताग्निसंग्रह संस्कार असेही म्हटले जाते.

उत्तर वैदिक कालखंडातील संस्काराने मानवी जीवन सुसंस्कृत झाले होते. मानवी जीवनामध्ये शिस्त निर्माण झाली होती. मानवी समाजामध्ये श्रद्धा निर्माण झाली होती. मानवी समाजात एकजिनसीपणा निर्माण झाला होता.

**आपली प्रगती तपासा**

१. ब्राम्हण कालखंडातील संस्काराची माहिती सांगा.

---

---

---

---

---

**४) विवाह :-** उत्तर वैदिक कालखंडात विवाह संस्थेत बदलत्या परिस्थितीनुसार परिवर्तन होऊन विवाहाचे आठ प्रकार प्रचलित झाले होते. त्यापैकी पहिले चार प्रकार समाजमान्य होते तर उर्वरित चार प्रकार समाजमान्य नव्हते.

**समाज मान्य विवाहप्रकार :-**

**१) ब्रम्ह विवाह :-** या विवाह प्रकारात पिता आपल्या कन्येसाठी विद्वान, सदाचारी व सर्वार्थाने अनुरुप वर शोधतो व आपल्या कन्येचा विवाह विधीवत पद्धतीने पूर्ण करतो. या विवाह प्रकाराला ब्रम्ह विवाह असे म्हटले जाते.

**२) दैव विवाह :-** या विवाह प्रकारात पिता आपल्या कन्येच्या विवाहासाठी यज्ञाचे आयोजन करत असे. यज्ञप्रसंगी पौरोहित्य करण्यासाठी अनेक तरुण ब्राह्मण येत असत. या अनेक ब्राह्मण तरुणांपैकी पिता एका विद्वान ब्राह्मण तरुणाची निवड करत असे व या तरुण ब्राह्मणाला आपली कन्या दान करुन तिचा विवाह त्याच्याबरोबर लावत असे. हा विवाह प्रकार ब्राह्मणवर्गापुरताच मर्यादित होता.

**३) आर्ष विवाह :-** या विवाह प्रकारात पिता वराकडून गाय-बैलाची एक जोडी किंवा दोन जोड्या घेऊन आपली कन्या वराला देऊन तिचा विधीवत विवाह करीत असे. प्राचीन काळातील कन्याविक्रयाचे हे एक रुप आहे.

**४) प्रजापत्य विवाह :-** या विवाह प्रकारात वधू-वर पिता एकमेकांकडून कोणत्याही प्रकारी विवाह शुल्क न घेता एकमेकांच्या संमतीने आपल्या अपत्यांचे विवाह करीत होते.

munotes.in

**समाज अमान्य विवाहप्रकार :-**

१) **असुर विवाह :-** या विवाह प्रकारात वर वधू पित्यास पैसे देऊन वधू मिळवत असे. विवाहासाठी वधूच्या मर्जीचा विचार होत नव्हता. या विवाह प्रकाराला कन्या विक्रयाचा प्रकार मानले जाते.

२) **गांधर्व विवाह :-** या विवाह प्रकारात वधू-वर आपल्या पसंतीने विवाह करीत होते. या विवाहास आई-वडिलांच्या पूर्वसंमतीची गरज नव्हती.

३) **राक्षस विवाह :-** या विवाह प्रकारात वर वधूला तिची इच्छा नसतांना जबरदस्तीने पळवून नेऊन तिच्याशी आपला विवाह लावतो. विशेषतः ही पद्धत क्षत्रियात रुढ होती.

४) **पिशाच्च विवाह :-** या विवाह प्रकारात एखाद्या स्त्रिच्या मजबूरीचा फायदा घेतला जातो. एखादी स्त्री जर एकांतात भेटली तर तिला दारु पाजून नंतर तिचे शील भ्रष्ट केले जाते व नंतर तिच्याबरोबर विवाह केला जातो.

५) **पितृसत्ताक कुटुंबपद्धती :-** उत्तर वैदिक कालखंडात सामाजिक जीवनात कुटुंब हा घटक सर्वात महत्त्वाचा होता. या काळात पितृसत्ताक कुटुंबपद्धती होती. कुटुंबावर कुटुंब प्रमुख म्हणून गृहपतीची अनियंत्रीत सत्ता चालत असे.

- कुटुंबाचे पालनपोषण करणे
- कुटुंबाला शिस्त लावणे
- कुटुंबाची प्रतिष्ठा वाढविणे
- कुटुंबातील लग्नकार्य करणे
- कुटुंबाचे आर्थिक व्यवहार सांभाळणे
- कुटुंबातील धार्मिक कार्य करणे

ही कामे कुटुंब प्रमुखाला करावी लागत होती.

६) **एकत्र कुटुंबपद्धती :-** उत्तर वैदिक ब्राह्मण कालखंडात एकत्र कुटुंबपद्धती प्रचलित होती. तीन-तीन पिढ्यांचे लोक एकत्र राहत असत. कुटुंबावर सर्वात वडील मुलाचा अधिकार चालत असे. वडील मुलाला पित्याच्या धनातील जास्त हिस्सा मिळत असे. वडील मुलाला कुटुंबात मानाचे स्थान होते.

- अर्थार्जन पाहाणे
- अतिथी सत्काराकडे लक्ष देणे
- धर्मविधी पार पाडणे
- कुटुंबाची सर्वांगीण जबाबदारी पाहणे

ही त्याची मुख्य कामे होती.

munotes.in

**७) घरे :-** उत्तर वैदिक ब्राह्मण कालखंडात आर्यांनी भटक्या जीवनाचा त्याग केला होता. त्यामुळे त्यांनी निवासी घरे बांधण्यास प्रारंभ केला होता. आर्यांची घरे लाकूड, बांबू व वेतापासून बनविलेली असत. घरात ३ तळखोल्या असत व एक अग्नीशाळा असे.

**८) स्त्रियांचा दर्जा :-** पूर्व वैदिक कालखंडाच्या तुलनेने उत्तर वैदिक ब्राह्मण कालखंडात स्त्रियांचा दर्जा खालावला होता. अपत्य संगोपन व गृहकृत्य हीच स्त्रियांची प्रमुख कर्तव्ये राहिली होती. स्त्रियांचा पती निवडण्याचा अधिकार नष्ट झाला होता. बालविवाह पद्धती समाजात रुढ झाली होती. स्त्रियांचा पुर्नविवाहाचा अधिकार नष्ट झाला होता. एकपत्नीत्वा बरोबर बहुपत्नीत्व पद्धती रुढ झाली होती. पडदा पद्धत, नियोग पद्धत या स्त्रियांच्या प्रतिष्ठेला बाधा पोहोचविणाऱ्या पद्धती सुरु झाल्या होत्या. स्त्रियांचा धार्मिक कार्यक्रमातील अधिकार काढून घेण्यात आला होता. मुलगी जन्माला येणे ही दुःखदायक घटना मानली जात होती.

**९) अन्न :-** उत्तर वैदिक कालखंडातील लोक अन्न म्हणून दूध व दूधापासून बनवलेले पदार्थ, फळे, भाजीपाला तसेच गहू, जव, तीळ, तांदूळ या तृणधान्यांचा वापर करीत होते. मांसाहारामध्ये गाय, बैल, घोडा, बकरी, मेंढ्या, मासे त्यादींचा समावेश होता. यज्ञ किंवा लग्न उत्सव प्रसंगी मांसाहार व मद्यपान करत असत. उत्तर वैदिक काळात गायींची प्रचंड प्रमाणात कत्तल झाली होती. गाय कापणाऱ्याला 'गोहन' असे म्हटले जाई;

**१०) वेशभूषा :-** उत्तर वैदिक कालखंडातील लोक वेशभूषेसाठी सूती कपडे वापरत होते. स्त्रि-पुरुष कमरेभोवती जे वस्त्र गुंडाळत त्यास 'नीवी' असे म्हणत. तर अंगावर चढविलेल्या कपड्याला 'वासन' असे म्हणत व डोक्यावर परिधान केलेल्या कपड्याला 'अधिवासन' असे म्हणत. सुताव्यतिरिक्त लोकर, कातडी यांची वस्त्रेसुद्धा वापरली जात होती. वैदिक वाङःमयात अल्क, पेशस, द्रापी या वस्त्रांचा उल्लेखसुद्धा आहे. सर्वसाधारणपणे लोक पांढरी वस्त्र वापरत होती.

**११) केशभूषा :-** उत्तर वैदिक कालखंडातील लोक केशभूषा करीत होते याचा उल्लेख ऋग्वेदात आहे. पुरुष केस कापत तसेच दाढी ठेवत होते. कधीकधी पुरुष केसांचा चुडा डोक्यावर बांधत तर स्त्रिया केसांचे चार कर्पद बांधत.

**१२) अलंकार :-** उत्तर वैदिक कालखंडातील लोक अलंकारप्रिय होते. सर्वसाधारणपणे कर्णफुले, कंठमाळ, अंगठ्या, कंकण, बाजूबंद, पैंजण, नथणी, कंबरपट्टे हे अलंकार स्त्रिया वापरत होत्या. अलंकार बनविण्यासाठी सोने, चांदी या धातूंचा वापर केला जात असे.

**१३) मनोरंजनाची साधने :-** उत्तर वैदिक कालखंडातील द्यूत, नृत्य, रथस्पर्धा, शिकार, घोड्यांच्या शर्यती, गायन, वादन, मृदुंग, वीणा, बासरी ही मनोरंजनाची साधने होती.

**१४) वैद्यकशास्त्र :-** उत्तर वैदिक कालखंडात वैद्यकशास्त्र अस्तित्त्वात होते. क्षय, काविळ या रोगांबद्दल माहिती होती.

munotes.in

**आपली प्रगती तपासा**

१. ऋग्वेद काळातील सामाजिक परिस्थिती सांगा.

## ३.५ वैदिक कालखंडातील आर्थिक परिस्थिती

ऋग्वेद व इतर वेद आणि ब्राम्हणे, उपनिषद या ग्रंथावरुन आर्यांच्या आर्थिक जीवनाची माहिती मिळते. ऋग्वेद काळात आर्यांच्या जीवनातला सप्त सिंधूच्या खोऱ्यात प्रारंभ व स्थैर्य प्राप्त झाले. वरील साधनांच्या आधारे आर्यांच्या आर्थिक प्रगतीची माहिती मिळते. त्यामध्ये शेती, पशुपालन, शिकार व युध्द, गृहउद्योग, व्यापार, चलन, दळणवळण इ. ची माहिती मिळते.

**१) कृषी** - आर्यांची **ग्रामीण संस्कृती** असल्याने त्यांच्या जीवनात शेतीला पार महत्व होते. त्यांचा **प्रमुख व्यवसाय** शेती होता. शेतीजवळच त्यांचे घर असे. ते माती व लाकूड यांनी तयार केलेले असे. त्यातूनच अनेक लहान लहान गावे तयार झाली. बैलाच्या मदतीने शेती मशागत करत असत. गहू, (गोधूमा) धान (ब्रीह) यव (जौ) मूग (मुद्ग), उदद (माप) जंगली धान (नीवार) तीळ, चना, कापूस इ. उल्लेख सापडतो. **तैतरीय संहितामध्ये** तीन प्रकारच्या धनाचा उल्लेख आहे. शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी **विहिरीचा** व **कालव्यांचा** उपयोग केला जात असे. शेतीला खत देण्याची पध्दत होती. दुष्काळ, अतिवृष्टी, टोळधाड, किटक इ. **शेतीचे शत्रू** समजण्यात येत असत. **उर्वरा व खिल्या** हे दोन प्रकार जमिनीचे होते.

**२) पशुपालन** - आर्यांचा दुसरा प्रमुख व्यवसाय म्हणजे पशुपालन होय. पशुपालनामुळे शेतीसाठी जनावरे व खत मिळत असे. तसेच दुध, मांस, कातडी, लोकर ही प्राप्त होत असे. या काळात **बैल, गाय, घोडे, मेंढी, शेळी, कुत्रा, गाढव, हाती, उंट इ.** प्राण्यांचे पालन करत असे. ऋग्वेदामध्ये अवि (भेड) आणि अजा (बकरी) चा उल्लेख आला. **गाईला** प्रतिष्ठा होती. **पशुधन** हेच माणसाच्या श्रीमंताचे मुख्य साधन होते. जनावरांना चरण्यासाठी विस्तृत कुरणे असे. त्याला **घोषा** म्हणत तर गुराख्याला **गोपाल** म्हणत असे. **गोधन** चोरीवरुन युध्द होत असे. घोड्याचा उपयोग रथ व लष्करी कामासाठी केला जात. शेळ्या मेंढ्यापासून कातडी व लेकर मिळत होती. **गांधार** प्रदेशाची **लोकर** प्रसिध्द होती.

**३) गृहउद्योग** -ऋग्वेदकालीन उद्योग व व्यवसाय हे **शेतीवर आधारीत** होते. सुती व गरम कापड विणणे त्यावर नक्षीकाम करणे, प्राण्यांच्या कातड्यापासून निरनिराळ्या वस्तु तयार करणे. गवत व वेतापासून चटया व बैठका तयार करीत. **लोहार** लोखंड व तांब्याची हत्यारे बनवत. ऋग्वेदात **अयस** नावाच्या धातूचा उल्लेख केला तो बहुधा लोखंड असावा. लोखंडापासून

शेतीची अवजारे, युध्द साहित्य व इतर घरगुती साहित्य बनवले जात. **लाकडाच्याही** विविध वस्तू **सुतार** बनवत. **सोनार** विविध अलंकार सोने, चांदीचे बनवत असे. सोनार, कुंभार, चांभार, लोहार, विणकर, सुतार कारागीर वर्ग या काळात असावा.

४) **विनिमयाचे साधन** - गाई किंवा बैल पैशाच्या रुपात मानून विनिमयाचे साधन म्हणून मान्य केले. ऋग्वेदात **निष्कचा** उल्लेख आहे त्याला काही नाणी तर काही अलंकार मानतात.

५) **शिकार युध्द** - आर्य शिकार करीत असत. भक्ष्य शोधणे, पशुपक्ष्यांचे मांस मिळवणे. क्रूर प्राणी नष्ट करणे व मनोरंजन करणे हा शिकारी मागील **खरा उद्देश** होता. शिकार करण्यासाठी लोखंडाची व तांब्याची हत्यारे व अवजारे बनवीत. शिकार हे **युध्दप्रशिक्षणाचे** प्रात्यक्षिक समजले जात असे. राज्यकर्त्या वर्गामध्ये शिकार विशेष लोकप्रिय होती. युध्दात मिळालेली लुट राज्याच्या उत्पन्नाचे एक प्रमुख साधन होते. शत्रूचे पशुधन लुटून आणण्याची पध्दती प्रचलित होती.

६) **व्यापार** -ऋग्वेदात व्यापाऱ्यांना **पणि** म्हणत. हे अनार्य जमातीचे असून व्यापारावर त्यांचे प्रभुत्व होते. तो अतिशय श्रीमंत वर्ग होता. व्यापार **वस्तुविनिमयाच्या** स्वरुपाचा होता. त्यासाठी गाईचा उपयोग केला जात असे. निष्क नावाचा सोन्याचा तुकडा किंवा अलंकार याचा विनिमय साधन म्हणून उपयोग केला जात असे. व्यापार हा खुष्कीच्या व नदया, समुद्र मार्गे केला जात असावा. ऋग्वेदात रुंद रस्ते देण्याबद्दल **'पुषन'** नावाच्या देवाची प्रार्थना केलेली होती. अंतर्गत व्यापारातील वाहतुकीचे **मुख्य साधन अनस्** नावाच्या गाड्या व रथ होते. अनस् यास बैल किंवा घोडा जोडत असे.

७) **वाहतुकीची साधने** - जमिनीवरुन रथ व बैलगाडीतून आणि नदी व समुद्रातून जहाजामधून व मलाची वाहतूक केली जात असे. बैलगाडी, रथ, बैल,घोडे, गाढव ही वाहतुकीचे साधने होती.

८) **व्यवसायिक संघ** - ऋग्वेदातील **गण** आणि **व्रात** शब्दांचा अर्थ इतिहासकाराने व्यवसायिक संघाशी संबंधीत जोडला आहे. त्यांच्या विचारानुसार काही व्यवसायिक संघ होते. त्यांच्या कार्यपध्दती विषयी आपणाला काही माहिती मिळत नाही.

९) **गुलामांचा व्यवसाय** - ऋग्वेद काळात गुलाम प्रथा प्रचलित होती. ऋग्वेदाच्या अनेक मंत्रामध्ये गुलाम प्रप्तीची प्रार्थना केली आहे. काही लोक दुसऱ्याच्या घरी काम करुन जीवन जगत होते. गुलामाला कुटुंबातील एक सदस्य मानत असे. त्याच्याशी प्रेमाने वागत असे. ऋग्वेदामध्ये गुलामाच्या कल्याणासाठी प्रार्थना केलेली आहे.

१०) **उत्पादनाची साधने** - युध्दात मिळालेली लुट हे प्रमुख उत्पादनाचे साधन होते. व्यक्तीगत जीवनात हुंडा व वधुला दिलेला नजराणा होय. स्थावर मालमत्तेची देवाण-घेवाण, खरेदी-विक्री व दानपत्रे यांच्या साहाय्याने होई. जमिनी खरेदी-विक्री व्यवहार फारसा होत नसे. व्यापार, व्यवसाय, शिकार इ. च्या माध्यमातून उत्पादन मिळत असे.

munotes.in

**११) तंत्रज्ञान प्रगती** - अर्यांची जीवन पध्दती ग्रामीण होती. दगड, लाकूड, ब्राँझ, सोने, लोखंड, चांदी, लोहार, कोळी, रंगारी, न्हावी, नर्तक इ. व्यावसायिक तंत्रज्ञानांचा वर्ग अस्तित्वात होता. वास्तुकला, शिल्पकाम यांत प्रगती केली. नीलमण्याचे काम करणाऱ्यांना **'कामरि'** असे म्हणतात. निलमण्याला निष्का असा संस्कृत शब्द आहे. निष्काच्या माळा वसिष्ठ व कण्व यांच्या कुटूंबाचा व्यवसाय होता. शुलबसुत्रामध्ये विटा व यज्ञकुंडाची माहिती सांगितली.

**आपली प्रगती तपासा**

१. आर्यांची आर्थिक परिस्थिती सांगा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**उत्तर वैदिक कालखंडातील आर्थिक परिस्थिती :**

उत्तर वैदिक कालखंडात ज्याप्रमाणे राजकीय, सामाजिक परिवर्तन घडून आले त्याचप्रमाणे आर्थिक परिवर्तन घडून आल्याचेही स्पष्ट झाले आहे. या कालखंडात आर्थिक प्रणालीशी संबंधित असणाऱ्या शेती, व्यापार, दळणवळण, चलन, करपद्धती, उद्योग व्यवसाय या सर्वच घटकांचा विकास झाला होता. अशी ही ब्राह्मण कालखंडातील आर्थिक परिस्थिती पुढीलप्रमाणे :-

१) **शेती :-** उत्तर वैदिक कालखंडात शेती हा आर्यांचा प्रमुख व्यवसाय होता. शेतीमधून गहू, जव, तांदूळ, तीळ, वाटाणे, तेलबीया, कापूस, ऊस, फळे व भाज्या ही महत्त्वाची पिके घेतली जात होती. शेतीसाठी शेणखताचा वापर केला जात होता. तर मशागतीसाठी ४, ८, १६, २४ नांगरी बैलांचा वापर केला जात होता. शेतीतून निघणारे उत्पादन मुबलक होते. अन्नधान्य गरजेपेक्षा जास्त होते.

२) **पशूपालन, गोपालन :-** उत्तर वैदिक कालखंडात शेतीस जोड व्यवसाय म्हणून पशुपालन व्यवसाय विकसीत झाला होता. त्याचबरोबर ब्राह्मण कालखंडात गोधनाच्या वृद्धीसाठी गोपालन व्यवसाय विकसीत झाला होता. ब्राह्मण युगात गाईला महत्त्व होते. म्हणूनच हा व्यवसाय विकसीत झाला असावा.

३) **उद्योग-व्यवसाय :-** उत्तर वैदिक कालखंडात जे निरनिराळे साहित्य लिहिले गेले आहे त्या साहित्यावरुन या कालखंडात वेगवेगळे उद्योग-व्यवसाय प्रचलित होते हे स्पष्ट झाले आहे. रथकाम करणारे, धातूकाम करणारे, धोबी, दोऱ्या वळणारे, रंगारी, विणकर, कुंभार, कोळी, संदेशवाहक, सावकार यांचे व्यवसाय प्रचलित परिस्थितीला अनुरुप भरभराटीस आले होते.

munotes.in

४) **व्यापार :-** या कालखंडात जे व्यापार करणारे होते त्यांचा एक संघ होता. संघावरचा जो अधिकारी होता त्याला 'श्रेष्ठीन' असे म्हणत. ब्राह्मण कालखंडातील व्यापार जमीन व समुद्रमार्गे चालत असे. या कालखंडातील व्यापाराची माहिती पाणिनीच्या सुत्रामध्ये आहे. व्यापारातील भेसळ, लबाडी, अतिरिक्त नफा यावर शासनाची कडक नजर असे. एकंदरीत विचार केला तर ब्राह्मण कालखंडातील व्यापार सुनियोजित होता.

५) **दळणवळण :-** उत्तर वैदिक कालखंडातील दळणवळणाचे मार्ग म्हणून रस्ते, नद्या, समुद्र यांचा वापर होत असे. रस्ते चांगले होते. तसेच वाईट होते. सूत्रकाळातील माहितीनुसार वाहतूकीसाठी रथ हे मुख्य वाहन वापरले जात असे. तसेच घोडे व हत्ती यांचा वापरसुद्धा माल वाहतूकीसाठी केला जात होता. इतर प्राण्यांचा उपयोग काही ठिकाणी वाहतूकीसाठी झाला आहे असा उल्लेख आहे.

६) **चलन पद्धती :-** उत्तर वैदिक कालखंडात वैदिक कालखंडातील चलन पद्धती प्रचलित नव्हती. या पद्धतीमध्ये बदल झाला होता. काही विशिष्ट नाणी या कालखंडात प्रचलित झाली होती. या काळात 'निष्क' हे नाणे विशिष्ट किंमतीचे प्रमाण म्हणून जास्त प्रमाणात वापरण्यात येऊ लागले होते. 'पाण', 'कर्षापण', 'पाद' इत्यादी नाण्यांचा उल्लेखही पाणिनीच्या सूत्रात आढळतो. या माहितीवरुन असे स्पष्ट होते की, ब्राह्मणकालखंडात चलनपद्धतीमध्ये बदल झाला होता.

७) **कर पद्धती :-** उत्तर वैदिक कालखंडात राज्यकारभाराचा खर्च भागविण्यासाठी प्रजेकडून धान्य रुपात कर घेतला जात होता. ब्राह्मण व क्षत्रियांना कर माफ होता. शेती व्यवसाय करणारे तसेच वैश्य व्यापार, उद्योग-व्यवसाय करणारे यांच्यावर कर आकारला जात होता. एकूण लोकसंख्येत वैश्यांचे प्रमाण जास्त असल्याने शासनाला कर रुपाने मिळणारा पैसा जास्त होता.

**आपली प्रगती तपासा**

१. उत्तर वैदिक कालखंडातील आर्थिक परिस्थिती कशी होती.

## ३.६ वैदिक कालखंडातील धार्मिक परिस्थिती

ऋग्वेद काळातील आर्यांचा धर्म व त्यांच्या धार्मिक कल्पना, तत्वज्ञान यांची माहिती प्रथम ऋग्वेदात येते. ऋग्वेदातील **प्रथम, व्दितीय आणि सातवे** मंडलामध्ये आर्यांच्या धार्मिक जीवनाची माहिती मिळते. **सृष्टीगीताच्या** स्वरुपातच ऋग्वेदातील धर्माची सुरुवात होते. मनुष्य जीवनाचा जसजसा विकास होत गेला. तसतशा धार्मिक कल्पना व तत्वज्ञानाचा विकास होऊ

लागला. वैदिक धर्मकल्पना व धर्म ठराविक साचेबंद स्वरुपाचा व सर्वकाळ स्थिर असा नव्हता. आर्यांचा धर्म सरळ व सहज स्वरुपाचा होता.

**१) आर्यांच्या आरंभीच्या विविध निसर्ग देवता** - सभोवताली पसरलेल्या निसर्गातील विविध घटनांनी आर्यांच्या मनावर मोठा प्रभाव पाडला. निसर्गातील चमत्कृतींच्या बुडाशी चेतनाशक्ती असली पाहिजे. त्या चेतना शक्तींनाच त्यांनी हात, पाय इत्यादींनी युक्त अशा देवतांचे रुप दिले. सभोवताली विस्तृत भूमीस **पृथ्वीदेवता** समजले. डोक्यावर पसरलेल्या नभोवितानाच्या आधारावर त्यांना **द्यौ :** या देवतेची कल्पना केली. स्पर्शाने कळणाऱ्या वाऱ्याच्या आधारावर **वात देवता**, अनेक कार्यात उपयोगी पडणाऱ्या विस्तवाच्या आधारावर **आग्निदेवता**, भूमीस शीतलता प्राप्त करुन देऊन तिला सस्यश्यामला करणाऱ्या पावसाच्या आधारावर **पर्जन्य देवता**, अशी सृष्टीतील घटनांवर आधिष्ठित अनेक देवतांची कल्पना आर्यांनी केली. आडथळा उत्पन्न करणाऱ्या, गैरसोयीच्या होणाऱ्या अशा घटनांच्या आधारावर राक्षस, तायु, द्रुहः अशा अनिष्ठ चेतनांचीही त्यांनी कल्पना केली. देव हवे हवेसे तर राक्षसही अप्रिय होते. सूर्य हा अग्निचेच रुप आहे व अग्नी हा प्रति दिवशी सूर्यरुपानेच जन्माला येत असतो असे विचार **वसिष्ठ ऋषींनी** मांडला आहे. वैदिक देवता संघ **पुरुषप्रधान** आहे. ऋग्वेदात **पृथ्वी, अदिति, उषस्, रात्री** या स्त्री देवता असून त्यांना यज्ञ संस्थेत स्थान नव्हते. आर्यांच्या **प्रमुख निसर्गदेवता** म्हणजे वरुण, इंद्र, पृथ्वी, अग्नी, उषा, सूर्य, यम होय. या शिवाय सोम, श्रध्दा, रुद्र, बहुस्पती, पर्जन्य, मरुत, अश्विन, इ.देवतांचा उल्लेख आहे. **देवता मंडळात प्रमुख देवता म्हणजे** वरुण, इंद्र व सूर्य हे होय.

**२) ऋग्वेदकालीन देवदेवतांचे वर्गीकरण किंवा वास्तव्य** - आर्यांनी सृष्टीचे त्रिविधा त्रिलोकात्मक स्वरुप कल्पिले. ते म्हणजे पृथ्वी, अंतराळ आणि आकाश व त्यामध्ये प्रत्येक विभागात ११ कोटी देवता म्हणजे तिन्ही लोक मिळून ३३ कोटी (प्रकार) देवता आहेत. पूर्व वैदिक काळातील देवदेवतांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केले आहे.

**अ) देवतांच्या स्थळानुसार वर्गीकरण** - आर्यांच्या देवतांचे स्थळ कोठे आहे. त्यानुसार त्याचे तीन स्थळात वर्गीकरण केले आहे. हे स्थळ म्हणजे -

**१) पृथ्वी स्थानीय देवता** - पृथ्वी, अग्नी, सोम, बृहस्पती,नदया. २) **अंतराळ देवता** - इंद्र, वायू, मारुत, पर्जन्य, रुद्र, यम,इ. ११ देवता. **३) आकाशातील/स्वर्गातील देवता** - सूर्य, उषा, सावित्री, विष्णू, चंद्र, वरुण, मित्र, विवस्वत, आदित्य, आश्विन, पूषन, इ. ११ प्रकारचे देव होते. तीन लोकातील ३३ प्रकारचे देव होते.

**ब) ऐतिहासिक विभागणीनुसार** - ऐतिहासिक विभागणीनुसार देवतांच्या निर्मितीचा कालखंड विचारात घेतला जातो. त्यानुसार - **इंडो -युरोपियन देवता** व **भारतीय देवता** असे विभाग केले जातात. परंतु ही विभागणी करणे योग्य नाही. कारण त्यास पुरावा प्राप्त होत नाही.

**क) देवदेवतांच्या स्वरुपानुसार** - आर्यकाळातील देवदेवतांच्या स्वरुपानुसार देवतांचे वर्गीकरण केले जाते, ते म्हणजे प्रागैतिहासिक, पारदर्शक, मितपारदर्शक, अपारदर्शक, अव्यक्त किंवा प्रतिकात्मक देवदेवता असे विभाजन काही सिध्दांतनुसार करतात.

**ड) देवतांच्या महत्वानुसार** - देवदेवतांचे जास्त महत्वाचे व कमी महत्वाचे असेही काहीजण वर्गीकरण करतात. परंतु असे वर्गीकरण करणे अयोग्य आहे. अग्नि किंवा सवित् त्यांच्या कृपेमुळे व सोमरसपानामुळे देवांना अमरत्व प्राप्त झाले असे मानले जाते. देव आकाशामार्गे रथातून संचार करतात. देवांचे **सोम** हे आवडते पेय आहे. देवदेवता वैश्विक नियमांचे /ऋतू तत्वांचे पालन करतात असे मानले जाते. या शिवाय **सौरदेवतामध्ये** - मित्र, सूर्य, सवित्, **भावात्मक देवतामध्ये** प्रजापति, विश्वकर्मत्, मन्यू, श्रध्दा, **पर्जन्यवातासारखी देवता** युग्मे - मित्र-वरुण, घावा-पृथिवी, इंद्र-सोमा, सूर्याचंद्रमसा, उषारात्री, इंद्राग्नी, **देवतासंघ**, - मारुतांचा, आदित्याचा, **कनिष्ठ देवतामध्ये**- ऋभु, अप्सरा, गंधर्व, इ. ऋग्वेदातील देवतांचे वर्गीकरण करता येईल.

**३)आर्यांच्या विविध देवदेवता आणि त्यांचे महत्व** - आर्यांचे देवदेवता त्रिविध म्हणजे तीन ठिकाणी वास्तव्य करणारे आहेत ते पुढीलप्रमाणे

**अ) स्वर्गातील/आकाशातील देवदेवता** -

**१) सूर्य** - आकाशस्य तेजागोल हा सूर्यदेव होय. तो धौस व अदिती यांचा **पुत्र** असून चराचर जगाचा **आत्मा** आहे. वरुण, मित्र व अग्नी यांचा डोळा आहे. ऋग्वेदात सूर्याच्या **रथाचे व सात घोड्यांचे** वर्णन आढळते. उषाच्या मागून प्रियकराप्रमाणे सूर्य जातो असे वर्णन केलेले दिसते. **दीर्घायुष्य, निरोगी जीवन, शक्ती, संपत्ती,** सूर्याच्या कृपेनेच मानवाला लाभतात. सूर्य हे अग्नीचेच रुप असून देवांनी सूर्याला आकाशात ठेवले अशी कल्पना ऋग्वेदात मांडलेली आहे. मित्र, सविता, विष्णू, पुषन, भग, इ. देवता सूर्याची रुपे मानतात.

**२) वरुण** - स्वर्गातील देवतामध्ये सर्वात **महत्वाची** व **प्रमुख देवता** म्हणजे वरुण होय. तो विश्वाचा **सम्राट** व आपला पिता आहे. वरुण संदर्भात फक्त **१२ सुक्ते** ऋग्वेदात आहेत. वरुण नीतिसंरक्षक असून निसर्गाच्या कायद्याची अंमलबजावणी करतो. पृथ्वी व आकाश त्यानेच निर्माण केले. त्याच्यामुळेच सूर्य, चंद्र, तारे चमकतात. नदया वाहतात. ऋग्वेदात नीतितत्वांना **ऋतू** तत्व मानलेले होते. वरुणदेवता **पर्शु-भारतीय** (इराणी भारतीय) काळातील आर्यांचा वारसा असावा. उत्तरकाळात वरुण केवळ **जलाधिपती दिक्पाल** (पर्जन्याची/सागराची देवता) बनला.

**३) उषस्** - आर्यांच्या सौंदर्यवादी दृष्टिकोनाचे व निसर्गप्रेमाचे प्रतीक म्हणजे उषस् देवता होय. ही उषःकालाची देवता असून ऋग्वेद काळातील स्त्री देवता होय. ऋग्वेदात उषा देवतेची **२० सुक्ते** आहेत. उषस् ही आकाशाची मुलगी, रात्रीची बहिण, अश्विनाची मैत्रीण, सूर्याची प्रिया व जगाची तेजस्वी सम्राज्ञी असून ती सुवर्ण रथातून येते. दुष्ट स्वप्नांचे निरसन करुन भूताखेरीज पळवून लावते व सर्व मानवांना जागृत करते.

**४) विष्णू** - आपल्या त्रिविक्रमणाने त्रैलोक्य व्यापणारा विष्णूत्रिकाल दिसणाऱ्या सूर्याचे स्वरुप होय. विष्णूच्या उच्चस्थानी मधूर अमृताचा झरा आहे. ऋग्वेदात **३-४ सुक्ते** आहे. **मॅक्समुल्लरच्या** मते तीन पावले म्हणजे सूर्याच्या उदय, मध्यान्ह, अस्त होय **डॉ.रा.ना.दांडेकराच्या मते.** ऋग्वेदात विष्णू लावलेल्या **शिपिविष्ट** या विशेषणावरुन विष्णू ही अनार्यांचा किंवा आर्यची बहुजनवर्गाची लैंगिक देवता असावी. इंद्र-वृत्र युध्दात तो इंद्राचा साहाय्यक असून, भक्तांना जवळचा वाटतो. आर्य संघापैकी एक महान जमातीची ती सर्वश्रेष्ठ देवता असावी.

**५) अश्विनौ** -ही ऋग्वेदात **युग्मदेवता वैद्य** म्हणून प्रसिध्द आहे. दोन अश्वीन् देवतांचा समुह म्हणजे अश्विनौ होय. अशक्ताला सशक्त, वृध्दाला तारुण्य, आंधळ्याला दृष्टी लाभ, बुडाल्याला वाचविणे इ.अनेक कथा त्याच्या संदर्भात आहेत. पहाटे व सायंकाळी दिसणारा शुक्रतारा किंवा संधिप्रकाश याचे प्रतिक असावे. सूर्यकन्या सूर्या ही त्याची पात्नी असून, ते त्रिचक्र रथातून विश्वसंचार करतात. मधाचे औषधी उपयोग व अश्वाचा शीघ्र वाहतूकीसाठी उपयोग या अश्विनौ **देवाच्या देणग्या** आहेत.

या शिवाय वरुणाच्या ऋतरक्षणाचे साहाय्यक **मित्रदेवता** ही सूर्याच्या हितकारी तेजाचे प्रतिक आहे. सोनेरी वर्णाचा उगवता सूर्य म्हणजे जगाला प्रेरणा व चेतना देणारा **सविता** होय. मेंढपाळांचा मार्गदर्शक **पूषन** हा सूर्याचेच स्वरुप होय. तो कळपांचे रक्षण करतो. हरवलेले पशु सापडवून देतो. सर्व सुखांचा दाता **भग** हाही आदित्य स्वरुपच आहे. वैवाहिक बंधनांचे रक्षण व नियमन करणारा **अर्यमन** आर्यांच्या समाजाची धारणा करणारा **आदित्य** आहे.

**ब) अंतराळ देवता** - ऋग्वेदात ११ देवदेवतांचा उल्लेख अंतराळ देवता म्हणून केलेला आहे.

**१) इंद्र** - ऋग्वेदातील **२५० सुक्तामधून** या अतिशय महत्वाच्या व सामर्थ्यवान पराक्रमी देवाचे वर्णन केलेले आहे. त्याला **वज्रदेही/वज्रबाहू** असे म्हटलेले आहे. देवाच्या गायी व पाणी अडवून ठेवणाऱ्या **वृत्त** राक्षसास ठार मारले. प्रचंड प्रमाणावर सोमरसाचे प्राशन हे इंद्राचे वैशिष्ट्यं होते. इंद्र ही आर्याची आवडती **राष्ट्रीय देवता** होय. **वादळ-तुफानांचा** देव असा इंद्राचा प्रामुख्याने उल्लेख केला जातो. ऋग्वेदीय दैवतशास्त्र इंद्र प्रधान आहे. इंद्र हा कश्यप-अदितीचा **पुत्र** व मरुद्रणांचा **नेता** आहे. तो प्राचीन, तरुण, सर्वशक्तिमान, युध्दप्रिय, सर्वविजेता विव्दान व अप्रतिहात शक्ती आहे. इंद्राचे **अमरकृत्य** म्हणजे दानव वृत्तसुराचा वध होय. वृत्रखेरीज शंबर, नमुची,शुष्ण इ अनेक असूरांचा नाश केला. दाशराज युध्दात सुदास शत्रू **चायमान** यास ठार मारले. तर अन्यत्र श्रुतकवष, दुह्यू, देवक यांचा वध केला. पणीचा पराभव केला. शत्रूंची पुरे उध्वस्त करुन **पुरंदर** पदवी मिळविली.

**२) पर्जन्य** - ऋग्वेदातील कनिष्ठ देवतांपैकी ही एक देवता आहे. ऋग्वेदात **३ सुक्ते** आहेत. 'पर्जन्य' या शब्दाचा शब्दशः अर्थ **'पावसाचा ढग'** असून त्यावर मानवी गुण अध्यारोपित केले आहेत. त्याला **वृषभ** असेही म्हणतात. पाऊस पाडणे हे मुख्य कार्य होय. तो उदकाची गाडी घेऊन सर्वत्र फिरत असतो. विद्युत व गडगडाट याच्याशी त्याचा संबंध जोडलेला असतो. वनस्पतीचे उत्पादन व वर्धन करतो त्याला **पिता** असेही संबोधिले आहे. तो स्वर्गाचा **पुत्र** असून पृथ्वीचा **पति** आहे.

**३) यम** - ऋग्वेदात **३ सुक्ते** आहेत. यम हा पितरांचा राजा आहे. यम हा मृतांचा अधिपती, आदिमानव, सर्वप्रथम मृत झालेला मानव आणि पितृलोकाचा अध्यक्ष आहे. पुण्यवान लोकांना तो श्रेष्ठ स्थळी पोहोचवितो. तो सर्वांचे पापपुण्य जाणतो. त्याला यज्ञात येऊन बसण्याचे आमंत्रण दिले जाते, अग्नि हा त्याचा **दुत** होय. त्याचे दोन कुत्रे लोकांवर लक्ष ठेवीत फिरत असत.

**४) रुद्र** - ही उग्र देवता आहे. जटाधारी त्रिनेत्र रुद्राच्या हातात त्रिशूळ व धनुष्यबाण आहेत. रागीट रुद्राचे बाण, रोगराई व मरण आणतात. उपासकाला त्याची भीतीच वाटे व त्याच्या शस्त्रापासून आपणांस मुक्तता मिळावी अशीच उपासकाची प्रार्थना असते. संतुष्ट झालेला रुद्र शिवस्वरुपीही बने व भक्तांना रोगमुक्त करणारा श्रेष्ठ वैद्यराज बने. रुद्र ही आर्यांची पूर्वीच्या लोकांकडून किंवा सिंधू संस्कृतीच्या समाजाकडून घेतलेली देवता असावी. रुद्राला **वादळीदेवता** मानतात. ऋग्वेदात ३ सुक्तामधून रुद्रांची प्रार्थना केलेली आहे.

**क)भू देवता/पृथ्वीदेवता** - ऋग्वेदात ११ भूदेवतांचा उल्लेख झालेला आहे.

**१) अग्नि** - अग्नि ही पृथ्वीवरील **सर्वश्रेष्ठ संस्कार देवता** होय. ऋग्वेदात **२०० सुक्ते** आहेत. देव व मानव यांच्यातील प्रमुख दुवा म्हणून आर्यांनी अग्नी प्रमाणभूत मानला आहे. अग्नीला आपला सुखकर्ता व दु:खहर्ता मानले आहे. दैनंदिन जीवनात व यज्ञ कार्यात अग्नीला अतिशय महत्वाचे स्थान आहे. अग्नी हा यज्ञामध्ये पुरोहित, घरामध्ये गृहपती, समाजात विश्पती आहे. यज्ञातील हवीर्भाग देवांना पोहचवतो. समिधा, धृत, वा स्तोत्रव्दारा जे अग्नीची उपासना करतात ते शतायुषी, संपत्तिमान, कीर्तीमान होतात. अग्नी प्राचीन असून सदैव तरुण आहे. अग्नीला तीन मुखे, तीन दिहा, तीन पाय व असंख्य नेत्र आहेत. अग्नीची **पाठ** तुपाची, **केश** ज्वालांचे व दाढी तपकिरी रंगाची आहे. बैलाप्रमाणे ओरडतो, धुराने खांबाप्रमाणे आकाशाला आधार देतो. अग्नि जन्मतो तेव्हा त्याला **वत्स** म्हणतात. तो जलपक्षी आहे. त्याचे **मुख्य भक्ष्य** म्हणजे काष्ठ आणि त्याचे **मुख्य पेय** म्हणजे नवनीत. तो दिवसांत ३ वेळा जेवतो. अग्निला गृहपती म्हणतात. अग्निला मनुष्याचा नातेवाईक, मित्र, पिता, पुत्र, माता, बंधू असे मानतात.

**२) सोम** - सोम ही देखील **संस्कार देवता** आहे. ऋग्वेदात **१२० सुक्ते** आहेत. अग्नीनंतर महत्वाची देवता म्हणजे सोम होय. सोमदेव हा ऋग्वेदातील प्रमुख देव आहे. सोम वनस्पतीचा रस काढून यज्ञप्रसंगी तो देवाला दिला जाई. सोमरस हे **इंद्राचे आवडते पेय** आहे. सोम संज्ञा पर्शुभारतीय असावी. कारण **अवेस्तामध्ये** हओमाचा उल्लेख येतो. सोम हा औषधीचा राजा व जीवनदाता मानला गेला. सर्व सोम सुक्ते एकत्र करुन ऋग्वेदाचे **नवम मंडळ** बनविले गेले. सोमरसाला **मधु किंवा इंदू** म्हणत. याचा रंग पिवळा, लाल पिंगट किंवा तपकिरी असतो. सोम हे उत्साहवर्धक पीयुष आणि सोमरसाने ताकद वाढते, अमरता प्राप्त होते. सोम वाचा देतो म्हणून त्याला **वाचस्पति** अथवा वाचेचा नायक म्हटले आहे. सोम हा **बुध्दिवान ऋषि** आहे. सोम हा इंद्राचा आत्मा, परमपावन मित्र होय. सोम ही सर्वात महत्वाची बनली असल्यामुळे त्याला **लसाचा पति** असे म्हणतात. त्याला **वनस्पति** असेही म्हणतात.

**ड) आर्यांच्या देवदेवतांची वैशिष्ट्ये** -

१) निसर्ग शक्तीतून किंवा चैतन्यातून निर्माण झाल्या. २) पुढील काळात पशुंना देवतांचे स्वरुप दिले. ३) देवतांना मानवाप्रमाणे अवयव भावना आहेत असे मानलेले होते. ४) देवदेवताच्या

संकल्पनेत साचेबंदपणा नाही. ५) श्रेष्ठ व कनिष्ठ असे देवतांचे प्रकार पाडले नव्हते. ६) सर्व देवदेवता एकाच श्रेष्ठतत्वाची किंवा परमेश्वराची रुपे आहेत असे मानलेले होते. ७) सर्व देवता दयाळू व कृपा करणारे आहेत. ८) पुरोहिताची देवतांच्या पुजनासाठी निर्मिती झाली. ९) पुरुष देवतांना प्राधान्य दिले होते. १०) देवतांची कोठेही मंदिरे नाहीत. ११) मूर्तिपूजा नाही. १२) निसर्गवाद आहे. १३) अनेक देवता मानल्या आहेत. १४) पृथ्वीस्थानीय, अंतरीक्ष स्थानिय, घुस्थानीय असे वर्गीकरण केलेले होते. १५)सोमरसामुळे देवांना अमरत्व प्राप्त होते असे मानलेले होते. १६) देवदेवता आकाशमार्गे संचार करतात. १७)देवांचे आहुती हे अन्न तर सोम हे आवडते पेय होय.

### ४) ऋग्वेद काळातील धार्मिक आचार व कल्पनांचा विकास

**१) बाह्यतः अनेकेश्वरवाद पण मूलतः एकेश्वरवाद** - आर्य हे अग्नि, मरुत, वरुण या नैसर्गिक शक्तीची उपासना करीत होते. त्यांनाच मानवी रुप दिले. अनेक देवतांची पुजा करत असल्याने त्याला **अनेकेश्वरवाद** (polytheism) म्हणत असे. एकेश्वरवाद (monotheism) म्हणजे ईश्वर एकच आहे. निसर्गातील वेगवेगळेया कारणासाठी वेगवेगळ्या देवतांची उपासना करत. परंतु सृष्टीला नियंत्रित करणारी शक्ती एकच आहे. म्हणजे आर्याचे तत्वज्ञान **अनेकेश्वरवादाकडून एकेश्वरवादाकडे आणि एकेश्वरवादाकडून एकत्ववादाकडे विकसित झाले.** एकच अंतिम तत्व असून शरीर अथवा दृश्य, वस्तु आणि आत्मा, यांच्यात व्दैत नाही असे तत्वज्ञान म्हणजे **अकत्ववाद** (monism) होय. **ऋग्वेदाच्या १० मंडळात यांची** माहिती मिळते. एखादया वेळेस एखादी देवता इष्ट वाटे आणि तीस सर्वश्रेष्ठ अथवा परमेश्वर मानून तो तिचीच उपासना करु लागे. या प्रकृतीला **मैक्समुल्लर इष्टदेवतावाद** (Henotheism) असे म्हणतो. काही ऋषींनी या इष्टदेवता उपासनेच्या पलीकडे जाऊन, ज्या आदिशक्तीची विविध रुप म्हणजे देवता आहेत. पुष्कळ देवतामध्ये वसत असलेल्या सृजनशक्तीला मानवी गुणारोप करुन तिचीच देवता बनविली.

**२) व्दितयरुप देवता** - ऋग्वेदात इंद्र, वायू, इंद्रग्नी, इंद्रवरुणौ अशा दोन देवता एकत्र आणून त्यांची स्तोत्रेही गायत्री होती. काही देवता एकात दोन अशा स्वरुपाच्या आहेत. अश्विनौ हे उदाहरण होय. वस्तुतः एकत्र, दोन्ही वेळा दिसणारा असे काही आगळेच रुप या देवतांचे आहे. उदा. -ब्राम्हणस्पति, वास्तोष्पति, प्रजापति इ. होय.

**३) समुहात्मक देवता** - एकेकट्या देवता, व्दितयरुप देवता, याप्रमाणे समुहात्मक देवतांचीही कलपना आढळते. इंद्र, वृत्तशी लढण्यास निघतो तेव्हा त्याला **स्फूर्ती देणारी कवने** म्हणणारे, त्याचा उत्साह वाढविणारे **मरुतः** हा होय. बोलण्यासाठी व यज्ञाच्या प्रसंगी कोणी राहू नये यासाठी **विश्वेदेवा** म्हणजे **सर्वदेव** हा गण आमंत्रित करण्यात येऊ लागत.

### ४) जीवनाविषयी नीतिसंकल्पना/तत्वज्ञान

**अ)भौतिक जीवन** - आपले जीवन सुखी व समृध्द तसेच सत्ता, संपत्ती, स्वास्थ्य, सन्मान याच्यासाठी देवाची प्रार्थना करणे. आपले जीवन विविध धार्मिक कृत्यात घालवणे दानधर्म करणे. रंजल्या गांजलेल्यांना अन्नदान देणे. अतिथीचा सन्मान करणे. इत्यादींना ते **आदर्श नैतिक जीवन** समजत. तर मित्रांचा विश्वासघात करणे, मद्यपान करणे, धुत खळणे, रागावणे, एखादयाचा व्देष व मत्सर करणे, जादुटोणा करणे याला **पाप समजत**. पापी मनुष्यावर वरुण



munotes.in

पाश टाकतो मनुष्य स्वतः आणि पुर्वजांनी केलेले पाप याला तो जबाबदार असतो. आर्यांची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी आशावादी होती. जीवन सन्मार्गाने जगण्याची जबरदस्त इर्ष्या होती. दीर्घायुष्य, निरोगी जीवन, पराक्रमी संतती, शक्ती, संपत्ती, तेजस्वी घोडे, भरपूर दूध देणाऱ्या गाई, चांगली पिके, शत्रूचा नाश, संकटातून मुक्तता यासाठी आर्य **परमेश्वराची प्रार्थना करत** असे. धर्म या शब्दाने ज्या भावनेचा व सदाचारपणाचा बोध होतो, ती भावना आणि आचरण याचा उल्लेख ऋत या शब्दाने ऋग्वेदात केला आहे. निसर्ग व मानव यांच्यामध्ये नियमितता, सुसूत्रता आणण्याचे काम ऋत म्हणजे सत्यच करते. वैदिक देव हे **ऋतावान व ऋतावृध** असतात. असा उल्लेख ऋग्वेदात आहे.

**ब) मरणोत्तर जीवन** - ऋग्वेदाच्या **१०व्या मंडलात मरणोत्तर जीवनासंबंधी** विचार मांडले आहेत. मनुष्य गेल्यावर त्याचा पार्थिव देह मातीत मिळून जातो. पण आत्मा अमर राहतो. मृताचे पितर त्याच्यासाठी दुसरे स्थान शोधून ठेवतात. हेच यमाचे निवास स्थान होय. तेथे कर्मानुसार पितृलोक किंवा नकर यापैकी एका ठिकाणी जातो. **पितृलोकात** अमरत्व पावलेले जीव कायम सुखात राहात असत. सोमरस, दुध, मध, सुरा इत्यादींचे पान करुन नृत्यगायनात मग्न असत. **नरक विषयी** तेथे **निर्ऋती** नावाची देवता असते. यमाचा दूत **कपोत** हा पापी अत्म्यांना अंधकारमय व दुःखमय अशा निवासस्थानी आणतो. पुनर्जन्माविषयी फारच पुसट कल्पना ऋग्वेदात आढळतात. आर्यांचा धर्म, कर्म सिध्दांतापेक्षा **उपयुक्ततावादी** होता मरणानंतरच्या जगाचा विचार करण्यापेक्षा या जीवनातील आनंदाचा, निसर्गातील साधनसंपत्तीचा भरपूर आस्वाद घ्यावा. असे त्याचे साधे व सोपे जीवनाविषयीचे तत्वज्ञान होते.

munotes.in

### ३) सृष्टी किंवा विश्व उत्पत्ती/निर्मिती संदर्भातील तत्वज्ञान -

ऋग्वेदातील तत्वज्ञानाची कल्पना आणि विश्वनिर्मिती व विश्वधारणेच्या कल्पना **पुरुषसुक्ता, नासदीयसुक्त, हिरण्यगर्भसुक्त** यामध्ये आढळते. तसेच **वरुण, इंद्र, अग्नि** या देवतांना उद्देशून रचलेल्या सुक्तामधून आढळते. सृष्टी उत्पत्ती संदर्भातील कल्पना पुढीलप्रमाणे दिसून येतात.

**अ) पुरुषसुक्तात मांडलेली विश्वाच्या उत्पत्तीची कल्पना** - सृष्टीच्या उत्पत्तीविषयीच्या कल्पना ऋग्वेदाच्या **दहाव्या मंडळातील पुरुषसुक्तात** सांगितलेली आहे. ती म्हणजे प्रारंभी काही होते असे नाही किंवा काही नव्हते असे नाही. वातावरण, आकाश नव्हते मग त्यावर आवरण कसले होते ? अथांग जलाची खोल दरी होती काय ? मृत्यू नव्हता किंवा अमरत्व नव्हते. दिवस-रात्र नव्हती. देवांनी विराट पुरुषाला बळी दिला. त्याच्या अवयवापासून बहुविध सृष्टी निर्माण झाली . काही ठिकाणी पाणी हे सर्व सृष्टीचे मूळ बीज आहे. भूत, वर्तमान, भविष्य काळचे जगत् हे सर्व हा परमेश्वर आहे. हे सर्व दृश्य जग या परमेश्वराचा महिमाच आहे. परमेश्वरापासून हे जग उत्पन्न झाले आणि या ब्रम्हांडामध्ये जीव उत्पन्न झाला. त्यातूनच **औपनिषदिक तत्वज्ञानाला** प्रेरणा मिळाली विश्व, आत्मा, जीव, अस्तित्व, अनास्तव सत्य, माया यावर विचार मांडले जाऊ लागले.

### उत्तर वैदिक कालखंडातील धार्मिक परिस्थिती :

उत्तर वैदिक कालखंड व पूर्व वैदिक कालखंड यामधील धार्मिक परिस्थिती बदलली होती. पूर्व वैदिक कालखंडातील निसर्गदेवतांवरील निष्ठा कमी होऊन यज्ञाशी संबंधित देव-देवतांचे व कर्मकांडाचे महत्त्व वाढले होते. पूर्व वैदिक कालखंडातील देव देवतांचे स्वतंत्र

अस्तित्त्व या कालखंडात नष्ट होऊन देव-देवतांबद्दल श्रेष्ठ-कनिष्ठ असे भेदभाव सुरु झाले होते. त्यामुळे देवता विश्वातील जिवंतपणा नष्ट झाला होता. यज्ञ संस्थेचे महत्त्व वाढल्याने संपूर्ण मानवी जीवनच यज्ञ कल्पनेभोवती गुंतले गेले होते. प्रत्येक इच्छीत गोष्ट प्राप्त करण्यासाठी यज्ञ करणे आवश्यक आहे असे सांगण्यात येऊ लागले होते. त्यातून या कालखंडात यज्ञाचे एकूण तीन प्रकार रुढ झाले होते.

१) **नित्य यज्ञ :-** अन्नदान, अग्नीहोत्र, दर्शपूर्णमास, पिण्डपितृय,चार्तुमास्य इत्यादी यज्ञांचा समावेश नित्य यज्ञामध्ये होतो.

२) **कामेष्ठी यज्ञ :-** पुत्रेष्टी, जयेष्टी, धनेष्टी या सारख्या यज्ञांचा समावेश कामेष्टी यज्ञामध्ये होतो.

३) **सोमयाग यज्ञ :-** एक दिवस, दोन किंवा बारा दिवस, तर काही वेळा एक ते दोन वर्ष किंवा त्यापेक्षा दिर्घकाळ चालणारे यज्ञ अशा यज्ञांचा समावेश सोमयाग यज्ञामध्ये होतो.

- **राजसूय यज्ञ :-** हा राज्याच्या व प्रजेच्या कल्याणासाठी केला जात होता. हा यज्ञ १ वर्षापेक्षा जास्त काळ चालत होता.
- **अश्वमेघ यज्ञ :-** राजाच्या कर्तृत्वाचे, पराक्रमाचे प्रतिक म्हणून हा यज्ञ केला जात होता. साम्राज्यवाढ व ऐश्वर्यवाढ यासाठी हा यज्ञ केला जात होता.
- **यज्ञसंस्था :-** उत्तर वैदिक कालखंडात यज्ञसंस्था सर्वस्पर्शी झाल्यामुळे सामान्य लोकांचीसुद्धा यज्ञसंस्था श्रद्धेची गोष्ट बनली होती. व्यक्तिगत सुख, समाजसुख व राष्ट्र सुखासाठी यज्ञसंस्था श्रद्धेचे स्थान बनली होती.

**ब्राह्मण पुरोहितांचे महत्त्व वाढले :-**

उत्तर वैदिक कालखंडात यज्ञसंस्थेचे महत्त्व वाढल्याने आपोआपच ब्राह्मण पुरोहितांचे महत्त्व वाढले.

- पुरोहित देवता व यज्ञयजमान यांच्यातील दुवा ठरला.
- पुरोहिताची समाजावर स्वतंत्र छाप पडली.
- पुरोहितांचे राज दरबारातील महत्त्व वाढले.
- क्षत्रियांपेक्षाही पुरोहित समाजात श्रेष्ठ ठरला.
- पुरोहिताची गणना भूदेव म्हणून होऊ लागली.

**यज्ञविधीतील गुंतागुंत :-** उत्तर वैदिक कालखंडात यज्ञ ही इच्छित गोष्ट प्राप्त करण्याचे साधन ठरले होते. यज्ञ हे देव, दानव, मानव या सर्वांनीच केले आहेत. मात्र यज्ञांच्या नावाने होणारे पशूसंहार, हत्या, हिंसा या सर्व प्रकारामुळे यज्ञविधीतील गुंतागुंत वाढली. पुढे यज्ञाचा आकार, यज्ञ मंडपाची लांबी-रुंदी, यज्ञातील आहुती, आहुती यज्ञकुंडाच्या कोणत्या भागात टाकावयाची, कोणत्या क्षणी कोणता मंत्र म्हणावयाचा याबाबत गुंतागुंत वाढत होती.

उत्तर वैदिक कालखंडात यज्ञसंस्थेचे महत्त्व वाढले होते. या संस्थेचा अतिरेक झाल्याने या संस्थेला व्यावहारीक रुप प्राप्त झाले होते. परिणामी ही धार्मिक प्रक्रिया पुढे सर्वसामान्य लोकांना न परवडणारी होऊन बसली होती. परिणामी निरनिराळ्या प्रकारचे यज्ञ केवळ प्रतिष्ठित, धनसंपन्न, श्रीमंत लोकच करु लागले. परिणामी यज्ञ करणे ही श्रीमंत लोकांची मक्तेदारी होऊन बसली.

**आपली प्रगती तपासा**

१. उत्तर वैदिक कालखंडातील धार्मिक परिस्थिती कशी होती ते सांगा.

## ३.७ सारांश

वैदिक संस्कृतीचा कालखंड परिवर्तनाचा कालखंड असून या संस्कृतीने प्राचीन भारताच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक व राजकीय जडणघडणीमध्ये महत्वपूर्ण योगदान दिले आहे. म्हणूनच भारतीय चिरंतन संस्कृती असे म्हटले जाते.

## ३.८ प्रश्न

१. वैदिक कालखंडातील जनपदाबाबतची माहिती सांगा.
२) पूर्व वैदिक कालखंडातील सामाजिक परिस्थितीची माहिती सांगा.
३) उत्तर वैदिक कालखंडातील सामाजिक परिस्थितीची माहिती सांगा.
४) पूर्व वैदिक कालखंडातील आर्थिक परिस्थितीची माहिती सांगा.
५) उत्तर वैदिक कालखंडातील आर्थिक परिस्थितीची माहिती सांगा.
६) पूर्व वैदिक कालखंडातील धार्मिक परिस्थितीची माहिती सांगा.

## ३.९ संदर्भ


1. Bhattacharya N.N. - Ancient Rituals and their Social Contents, (Delhi, Manohar Publication) 1996
2. Jha D. N. - Ancient India in Historical Outline Motilal Banarasidas, Publishers Pvt. New Delhi.
3. Kulkarni C. M. - Ancient Indian History & Culture Karnataka Publishing House, Mumbai- 1956.
4. Majumdar R. C. - Ancient India, Motilal Banarasidas, Publishers Pvt. Ltd. New Delhi - 1974
5. Mookerjee R. K. - Ancient India, Ilahabad, Indian Press, 1956


munotes.in

**मराठी संदर्भ ग्रंथ**

१. डॉ. मोरवंचीकर आर.एस. - प्राचीन भारत, कैलास प्रकाशन, औरंगाबाद
२. प्रा. मार्डीकर मदन - प्राचीन भारत, विद्या प्रकाशन, औरंगाबाद
३. प्रा. डॉ. अनिल सिंगारे - दक्षिण भारताचा इतिहास कैलास प्रकाशन, औरंगाबाद
५. डॉ. प्रभाकर देव - प्राचीन भारत, विद्या प्रकाशन, औरंगाबाद
६. डॉ. साहेबराव गाठाळ - प्राचीन भारत, कैलास प्रकाशन, औरंगाबाद
७. डॉ. खाबडे दिनकर - प्राचीन भारत, कैलास प्रकाशन, औरंगाबाद
८. कोसंबी डी.डी. - प्राचीन भारतीय संस्कृती व सभ्यता, डायमंड प्रकाशन, पुणे

**हिन्दी**

१. झा. डी. एन. - प्राचीन भारत का इतिहास - दिल्ली विश्वविद्यालय.
२. थापर रोमिला - भारत का इतिहास, राजकमल प्रकाशन, दिल्ली.
३. शर्मा रामशरण - भारत का प्राचीन इतिहास
४. श्रीवास्तव कृष्णचंद्र - प्राचीन भारत का इतिहास तथा संस्कृती.
५. कोसंबी दामोदर धर्मानदं - प्राचीन भारत की संस्कृती और सभ्यता

❖❖❖❖

munotes.in

# ४

# इ.स. पूर्व सहाव्या शतकानंतरचा भारत

**घटक रचना:**

४.० उद्दिष्ट्ये
४.१ प्रस्तावना
४.२ सोळा महाजन पदे
४.३ महाजनपदांची प्रशासन व्यवस्था
४.४ जैनधर्माच्या उदयाची कारणे
४.५ वर्धमान महावीराचे जीवन
४.६ वर्धमान महावीराची शिकवण
४.७ भारतीय संस्कृतीतिल जैनधर्माचे परिणाम
४.८ बौद्ध धर्माच्या उदयाची कारणे
४.९ गौतम बुद्धाचे जीवन
४.१० गौतम बुद्धाचे तत्वज्ञान
४.११ बौद्ध धर्माचे पंथ
४.१२ बौद्ध धर्माचा प्रसार
४.१३ बौद्ध धर्माचा ऱ्हास
४.१४ बौद्ध धर्माचा भारतीय संस्कृतीवरील परिणाम
४.१५ पर्शियन व ग्रिक आक्रमणे
४.१६ सारांश
४.१७ प्रश्न
४.१८ संदर्भ

## ४.० उद्दिष्ट्ये

- सोळा महाजनपदे व त्यांचे प्रशासन जाणून घेणे.
- जैन धर्माच्या उदयाची, महावीरांच्या जीवन कार्याची माहिती जाणून घेणे.
- बौद्ध धर्माच्या उदयाची, गौतम बुद्धांच्या जीवन कार्याची माहिती जाणून घेणे.
- बौद्ध धर्माच्या प्रसाराची माहिती जाणून घेणे.
- बौद्ध धर्माच्या भारतीय संस्कृतीवरील परिणामांची माहिती जाणून घेणे.

## ४.१ प्रस्तावना

प्राचीन भारतीय इतिहासातील इ.स. पूर्व ६०० ते इ.स. ३३२ हा कालखंड महाजनपदांचा कालखंड मानला जातो. या कालखंडात १६ महाजनपदांचा विकास झाला. ही महाजनपदे लोकशाही व राजेशाही स्वरुपाची होती. या कालखंडातील राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक परिस्थिती उत्तम प्रकारची होती. तसेच याच कालखंडात जैन धर्माला महावीराचे नेतृत्व लाभल्याने जैन धर्माचे तत्वज्ञान, प्रसार जनमाणसांपर्यंत पोहचला होता. तर गौतम बुद्धाने नव्याने स्थापन केलेला बौद्ध धर्म, धर्माचे तत्त्वज्ञान व धर्माचा प्रसार व प्रभाव विलक्षण ठरला होता या सर्व माहितीचा आढावा प्रस्तुत प्रकरणातून आपण जाणून घेणार आहोत. तसेच प्रर्शिन व ग्रिक आक्रमणांची माहिती पाहणार आहोत.

## ४.२ सोळा महाजनपदे

इ.स.पू ६०० ते इ.स. ३३२ हा महाजनपदाचा कालखंड समजला जातो. याकाळात जनपद, गणराज्ये टोळीराज्ये अशा प्रकाराची शासनप्रणाली प्रचलित होती. जनपदापैकी १६ जनपदे ही **महाजनपदे** म्हणून ओळखली जाऊ लागली. महाजनपद या शब्दाचा मुळ अर्थ जन होय. जन याचा उल्लेख **सर्वप्रथम ऋग्वेदात** आला आहे. जन हा शब्द जनसमूह असा होता एक जन मध्ये अनेक कुटूंब असे. **सर्वप्रथम ब्राम्हण ग्रंथामध्ये जनपद** शब्द आलेला आहे. **जनपदाची व्याख्या** इतिहासकार करतात की,“जेव्हा भ्रमणशील / भटकंती जनाचे सदस्य स्थिर झाले आणि त्यांनी आपले प्रशासकीय संघटन बनवले तेव्हा त्याना **जनपद** असे म्हणतात.”

सोळा महाजनपदाची ऐतिहासिक माहिती विविध साधनातून मिळते. ती साधने म्हणजे अष्टाध्यायी, अर्थशास्त्र, पुराण, रामायण, महाभारत, अंगुत्तरनिकाय, महापरिनिर्वाणसुत्र, जैनभगवतीसुत्र (व्याख्या प्रज्ञापती),नाणी इ होय. सोळा महाजनपदे पुढीलप्रमाणे होती.

**१) काशी** - काशीचे राज्य हल्लीच्या **वाराणसीमध्ये** होते. या शहराच्या दक्षिणेला वरुणा व असी या दोन नद्या वाहत असत. त्यावरुन वाराणसी नाव पडते. जातक कथानुसार काशीची **राजधानी वाराणसी** होते. **गुत्तिल जातकानुसार** काशीचा विस्तार १२ योजनाच्या क्षेत्रात झालेला होता. जैन तीर्थकार पार्श्वनाथचे वडील **अश्वसेन** राजा होता. कुनाल जातक व महावग्गनुसार बृम्हदत्तने ने कौशलवर अधिकार स्थापन केले. शेवटी काशी राज्य **कौशल मध्ये** कंसाने समाविष्ट केले. काशी येथील **रेशमी वस्त्राला** जगभर मागणी होती. काशी हे व्यापारी, धार्मिक दृष्टया प्रसिध्द होते.

**२) कोसल / कौशल** - कोसलचे राज्य म्हणजे पूर्वीचा **अयोध्द प्रांत** होय. सध्या उत्तरप्रदेशातील **लखनौ, फैजाबाद** जिल्हे होय. राज्याच्या उत्तरेला **श्रावस्ती** व दक्षिणेला **कुशावती** या दोन राजधान्या होत्या. साकेत व अयोध्या ही नगरे होती. महाकाव्यामध्ये राजा दशरथ व राम यांचे राज्य होते. नंतरच्या काळात अयोध्या हे कोसल नावाने उदयास आले. **बुध्दाचा समकालीन राजा प्रसेनजित** होता. त्याचे शिक्षण तक्षशिला विद्यापीठात झाले. त्याने



munotes.in

आपल्या बहिणीचा कोसलदेवी हिचा विवाह **बिंबिसारशी** केला व काशीनगरचे उत्पन्न भेट दिले. बिंबिसारच्या मृत्यूनंतर अजातशत्रू व प्रसेनजित यांच्यात संघर्ष झाला पराभव झाल्याने प्रसेनजितने आपली कन्या **वजिरा** हिचा अजातशूत्रशी विवाह करुन मैत्री पून्हा निर्माण केली. गौतम बुध्दाबद्दल असलेल्या आदरामुळे प्रसेनजितने शाक्य कुळाशी विवाहाचे संबंध प्रस्थापित केले. नंतर कोसल मगध राज्यात विलीन झाले.

**३) अंग** - अंग राज्य म्हणजे सध्याच्या बिहार प्रांतातील **भागलपूर मोघरि** जिल्ह्याचा भाग होय. अंग हे **गणराज्य** असून **चंपा ही राजधानी** होती. मगध राज्याच्या पूर्वेला गंगेच्या उत्तर खोऱ्यातील **राजमहल पर्वतामध्ये** राज्य होते. चंपा नदी मगध व अंगची सीमा रेषा होती. अश्वपुर व भद्रिका हे शहरे प्रसिध्द होते. **ऐतरेय ब्राम्हणा ग्रंथानुसार** अंगच्या राजाने **दिग्विजय** केला होता. चंपा हे **व्यापाराचे** मोठे केंद्र म्हणून प्रसिध्द होते. पुढे अंग हे **मगधा** मध्ये समाविष्ट झाले.

**४) वज्जी** - वज्जी हे ८-९ राज्याचे जमातीचे **संघराज्य** होते. यामध्ये विदेह, लिच्छवी आणि वज्जी या महत्वाच्या जमाती होत्या. **वज्जी ग्राम** म्हणजे हल्लीचे **मुज्जफरपूर (बिहार)** हे होय. लिच्छवी घराण्याची राजधानी **वैशाली** होती विदेहची राजधानी **मिथिला** होती. मिथिला हे **जनकपूर** नावाने आज ओळखली जाते. सर्व वज्जी संघराज्याची राजधानी **वैशाली** होती. लिच्छवी मध्ये बौध्द धर्माचा प्रसार झपाट्याने झाला. गौतम बुध्दानी अनेक वेळा वैशालीला भेटी दिल्या होत्या. तेथेच बौध्द धर्म परिषद भरवली होती. वैशाली ही महावीराची जन्मभूमी आहे.

**५) मल्ल** - पूर्व भारतामधील एक बलाढय जमात होती. मल्लांच्या दोन शाखा होत्या. कुशीनगर व पावा ही दोन शहरे म्हणजेच दोन शाखा होत्या. या राज्यात ९ टोळ्या असून ९ विभागात पसरलेल्या होत्या भोगनगर, अनुपिया, उरुवेलकप्प ही शहरे होती. येथे **राजसत्ताक** पध्दत होती. गौतम बुध्दानी पावामध्ये **अंतिम भोजन** घेतले व **कुशीनगर येथे** देह सोडला. येथे बौध्द धर्मियाचे पवित्र स्थळे आहेत. बुध्दकाळात गणराज्य होते. भद्रसाल जातक नुसार मल्ल व लिच्छवि याच्या संघर्षाची माहिती मिळते. मल्ल शेवटी मगध राज्यात समाविष्ट झाले. मल्ल हे सध्याचा उत्तर प्रदेशातील **गोरखपूर जिल्हा** होय.

**६) चेदी** - चेदी राज्य उत्तर प्रदेशातील **कानपूर उनाव** जिल्हयात होते. नेपाळ व बुदेलखंड येथे दोन वसाहती होत्या. **चेतीय जातकानुसार** सोत्थीवती व महाभारतानुसार **शुक्तीमती** राजधानी होती. **ऋग्वेदामध्ये चेदी** राज्याचा उल्लेख आहे.

**७) वत्स** - वत्स राज्य म्हणजे सध्याचा **अलाहाबाद व बांदा जिल्हयाचा प्रदेश** होय. यमुना नदीच्या तीरावरील **कोशांबी** ही राजधानी होय. <u>**पुराणानुसार**</u> कुरुंची राजधानी हस्तिनापूर गंगेच्या पुरामुळे नष्ट झाले. त्यामुळे कुरुंची टोळी वत्सकडे स्थंलातरित झाली. तेथे साम्राज्य स्थापन केले. वत्सराजा उदयन हा गौतम बुद्धांचा समकालीन होता. **उदयन** व अवंतीचा राजा **महासेन चंडप्रद्यौत** यांच्यात शत्रूत्व होते. पुढे अवंती राजकन्या **वासवदत्रा** हिच्याशी उदयनने लग्न केले. त्याने गौतम बुध्दाला चार विहार बांधून दिले होते हर्षवर्धनाच्या रत्नावली व

प्रियदर्शिका, भासाच्या स्वप्नवासवदाता नाटक, कालिदासच्या मेधदुतामध्ये उदयनचे वर्णन आलेले आहे.

८) **पांचाल** - पांचालचे राज्य दिल्लीच्या उत्तरेस आणि पूर्वेस हिमालयाच्या पायथ्यापासून ते चंबळ पर्यत होते. म्हणजे आजच्या **रोहिलखंडचा प्रदेश** व त्याच्या आसपासचा प्रदेश होय. गंगा नदीमुळे उत्तर व दक्षिण पांचाल असे दोन विभाग पडले आहेत. **उत्तर पांचाल** म्हणजे उत्तर प्रदेशातील बदीमू, फरुकाबाद, व त्याच्या आसपासचा प्रदेश होय. त्याची राजधानी **अहिछत्र** होती. **दक्षिण पांचाल** म्हणजे कांपील व फारुखाबाद जिल्हा (उत्तर प्रदेश) होय. त्याची राजधानी **कांपिल्य** होती. पांचाल **राजा ब्रम्हदत्र** याचा उल्लेख रामायण, जातक कथा, उत्तराध्यायनसुत्र, स्वप्नवासवदात्रा यामध्ये मिळतो. कुम्भकार जातकनुसार उत्तर पांचालचा **राजा दुर्मुख** होता. ऐतरेय ब्राम्हण ग्रंथात दिग्विजयी सम्राट म्हटले आहे. ब्रम्हदत्तने विदेहवर विजय प्राप्त केल्यानंतर कन्नोज नगर स्थापन केले.

९) **कुरु** - कुरु राज्य सध्याच्या दिल्ली व यमुनेच्या सुपीक प्रदेशात होते महाभारतामुळे हे राज्य प्रसिध्द आहे. पांडवानी कुरुची स्थापना केली. त्याची राजधानी **इंद्रप्रस्थ** होती. इंद्रप्रस्थ, कुरुक्षेत्र, ही प्रसिध्द शहरे होती. कुरु कुळ हे प्राचीन काळापासून शहाणपणा व उत्कृष्ठ शरीरसौष्ठवाबद्दल प्रसिध्द होते. यादव, भोज, पांचाल याच्याशी वैवाहिक संबंध होते प्रथम राजसत्ताक व शेवटी प्रजासत्ताक होते.कुरू पुढे मगध साम्राज्यात समाविष्ट झाले.

१०) **मत्स्य** - कुरुच्या दक्षिणेला आणि शूरसेनच्या पश्चिमेला मत्स्य राज्य होते. आजच्या **जयपूर परिसरात** हे राज्य असून, त्याची राजधानी विराटनगर होती. विराट नावाच्या राजाने हे राज्य स्थापन केल्याने त्याचे नाव राजधानीला विराट नगर (बैराट) दिले असावे. त्याचा विस्तार चंबळ पासून ते सरस्वती नदीच्या जंगला पर्यत झालेला होता.

११) **शुरसेन** - यमुना काठावरील मधुरा / मथुरा ही राजधानी होती. ग्रीक लोकांनी याचा उल्लेख **सौरसेन** व राजधानी **मेथोरा** असा केला आहे. महाभारत, पुराणात यदुवंशाचा शासक राज्य करतो असा उल्लेख आहे. बौध्द ग्रंथानुसार **अवन्तिपुत्र** हा बुध्दाचा समकालीन राजा होता. तो बुध्दाचा उपासक असल्याने बौध्द धर्माचा प्रसार झाला. शुरसेन हा वासुदेव व कुंती याचा पिता होता. याचा प्रमुख वासुदेव कृष्ण असल्याने मथुरा कृष्ण पंथीयाचे केंद्र होते असा उल्लेख **मेगॅस्थिनिसने** केला आहे. कालांतराने शुरसेन मगध साम्राज्यात विलिन झाले.

१२) **अश्मक** - याचा मुळे प्रदेश सिंधू नदीच्या खोऱ्यातील होय. अस्सक, अश्वक, अश्मक असेही म्हणतात. ग्रीक इतिहासकारानी स्वात नदीच्या खोऱ्यात **अस्सेकेनॉय** जमात रहात होती असा उल्लेख केला. पाणिनीने ही याचा उल्लेख केला आहे. **भट्टस्वामीने** अश्मकचा संदर्भ महाराष्ट्राशी लावला आहे. गोदावरीच्या खोऱ्यात अस्सक व अलका ही दोन राज्य असून प्रतिष्ठान/ पैठण राजधानी होती. राजर्षि अश्मकने पोदनानगरी स्थापन केल्याचा उल्लेख महाभारतात येतो. **चुललकलिंग जातक नुसार** अश्मक राजा अरुणने कलिंगवर विजय मिळवला.

१३) **अवंती** - पश्चिम भारतातील माळवा प्रदेशात हे शक्तीशाली राज्य होते. वेत्रवती (बेटवा) नदीमुळे दोन भाग पडले. उत्तर भागाची **उज्जैन** व दक्षिण भागाची **महिसनी /महिस्मती** ही राजधानी होती. राजगृह ते प्रतिष्ठान मार्गावर अवंती असल्याने राजकीय महत्व होते. बुध्दाचा

समकालीन अवंती राजा प्रद्यौत होता. प्रद्यौत पासून संरक्षणासाठी अजातशत्रूने राजगृहला तटबंदी केली, प्रद्यौतने चंड, महासेन ही विशेषने घेतली होती. त्याच्या नंतर पालक, विशाखभूप, अजक. नंदवर्धन यांनी राज्य केले. अवंती हे शिशूनाग राजाने पराभव करुन मगधात मिळवले.

**१४) गांधार** - गांधार म्हणजे सध्याचा **पेशावर (पुरुषपुर) व रावळपिंडीचा प्रदेश** होय. तक्षशिला ही राजधानी होती हे **व्यापारी व विद्येचे** प्रमुख केंद्र होते. तसेच ते बौध्द धर्माचे प्रमुख केंद्र होते. पुराणामध्ये गांधार शासकाला **दुहावंशी** मानले आहे. **ऋग्वेदात** याचा उल्लेख आहे. कुम्भकार जातक व शतपथ ब्राम्हण ग्रंथात नग्नजीत नावाच्या सम्राटाची चर्चा आहे. तो विदहेराजा निमि, पांचालराजा दुर्मुख, विदर्भराजा भीमाचा समकालीन होता. ब्राम्हण ग्रंथात गांधार शासक **वैदीक धर्माचे अनुयायी** होते असा उल्लेख आहे. इ,स,पु ६व्या शतकात पुष्करसारिन राजा असून, तो बिंबिसारचा समकालीन होता. त्याने अंवतीचा राजा प्रद्यौतला पराभूत केले.

**१५) काम्बोज** - काम्बोज व गांधार यांचा उल्लेख प्राचीन साहित्य व अशोकाच्या शिलालेखात येतो. सध्याचा **हजारा जिल्हा** व वायव्य सरहद्द प्रांतातील **काफिरिस्तानचा** काही भाग म्हणजेच काम्बोज होय. प्राचीन काळात **राजपुरा** नावाने उल्लेख होत असे. प्रारंभी राजसत्ताक नंतर गणतंत्र पध्दतीचे सरकार होते. ह्युएन्त्संगाने आपल्या प्रवास वर्णनात उल्लेख केला आहे. वैदिक काळात **ब्राम्हण शिक्षणाचे** प्रसिध्द केंद्र होते.

**१६) मगध** - दक्षिण बिहारमधील **पाटणा व गया** परिसरात मगध राज्य होते. गंगा - शोण नदयाच्या पट्टयात हे राज्य होते. महाभारतात जरासंघ या मगध राजाचा उल्लेख येतो. याची राजधानी **गिरिवज्र** होती नंतर **राजगृह** व नंतर **पाटलीपुत्र** राजधानी करण्यात आली. हर्यक, शिशूनाग, नंद, मौर्य, गुप्त पर्यत मगध भारतीय राजनितिचे केंद्र होते.

**आपली प्रगती तपासा**

१. १६ महाजनपदांची माहिती सांगा.

## ४.३ महाजनपदांची प्रशासन व्यवस्था

बौध्द साहित्य, महाभारत आणि अर्थशास्त्र मध्ये गणराज्याच्या घटनाची माहिती मिळते. बौध्दग्रंथ अट्टा-कथानुसार कुल परिवाराच्या प्रतिनिधीची सर्व सभासदानी अध्यक्ष (राजा), उपाध्यक्ष (उपराजानो), प्रधानसेनापती (सेनापतीनो), वित्तमंत्री (भाण्डागारिका) याची निवड केलेली असते सैनिक, राजनीतिक, व्यापारीक, शेती समाजसेवा हे सर्व विषय संसदे/परिषदे समोर येऊन सभासद त्यावर निर्णय घेत असे शहराना राज्यकारभाराचे स्वायत्ततेचे अधिकार दिलेले असे. शहर परिषदेमध्ये व्यापारी, कारागीर. शेतकरी यांचे प्रतिनिधी असे मध्यवर्ती समिती

ही राजधानीच्या ठिकाणी असून ती सर्वश्रेष्ठ असे. त्याचा प्रमुख **गणाध्यक्ष** असे. राजदुत (महत्तक) याची नियुक्ती सभा करत असे.

**गणराज्याची कार्यप्रणाली-** गणराज्यांच्या कार्यपध्दतीमध्ये मध्यवर्ती समिती, मध्यवर्ती कार्यकारी/कायदेमंडळ, उपसमित्या, विविध प्रशासकीय विभाग असून या माध्यमातून गणराज्याची कार्य चालत असे.

**अ) गणराज्याची मध्यवर्ती समिती :-** गणराज्याचा सर्व कारभार मध्यवर्ती समितीतर्फे चालत असे.या समितीच्या सभासदाची संख्या मोठी असे. **शाक्यांच्या परिषदेत** ५०० यौधेयच्या परिषदेत -५००० व **लिच्छवीच्या परिषदेत** ७७०७ सभासद होते. वेगवेगळ्या गणराज्यात ही जबाबदारी शिष्टसभा, गण, मंत्रिमंडळ याच्यावर सोपवली होती. **शिष्टसभा**-म्हणजे गावातील प्रतिष्ठीत व वृध्दजनांचे मंडळ होय. **गण**–म्हणजे कोणतेही कार्य सर्व लोकांच्या संमतीने करणे. **मंत्रिमंडळ** -सर्व कारभार मंत्रिमंडळावर सोपवलेला होता. यौधेय गणराज्यात **मंत्रधर** नावाचा अधिकारी होता. त्याचे अधिकार म्हणजे आजच्या मंत्रिमंडळा सारखे होते. मध्यवर्ती समितीतील सर्व प्रकारचे पूर्ण अधिकार होते. उदा. वरिष्ठांची नियुक्ती, अधिकारपदे वंशपरंपरागत चालू ठेवणे. परराष्ट्र व्यवहार, संकट प्रसंगी मदत व निर्णय इ. घेत असे. मध्यवर्ती समितीचे बरेच सभासद राजधानीच्या ठिकाणी राहत असे सभासदांची जेथे सभा होते त्या सभागृहाला **संथागार** म्हणतात.

**मध्यवर्ती / केंद्रिय समितीची कामकाज पध्दत** - केंद्रिय समितीच्या कामकाजाची तुलना आजच्या **लोकसभेच्या कामकाजाशी** करता येईल. संथागार मध्ये राजकीय, धार्मिक, सामाजिक विषयावर चर्चा होत असे. कुशीनगरच्या **मल्ल** गणराज्याच्या सभागृहात बुध्दांच्या अंत्येष्टि संस्काराविषयी चर्चा झाल्याची माहिती मिळते. मध्यवर्ती समिती गणाध्यक्षाची नियुक्ती करत असे. त्याच्या मदतीसाठी **गणपूरक, शलाकाग्राहक** व **कारकून** असत. सभागृहात आपल्या अधिकाराच्या प्राप्तीसाठी स्वतंत्र पक्ष बनवलेले होते या पक्षांना **वार्य गृहय, व्रपक्ष्य** म्हणतात.

सभेच्या कामकाजाला सुरुवात होण्यापूर्वी एक अधिकारी प्रत्येक सभासदाला बसण्यासाठी आसन देत असे. सभेच्या कामकाजाला सुरुवात **ठरावाच्या मांडणीतून** होत असे परंतु ठराव मांडण्यापूर्वी सभासद सभागृहात उद्देशून भाषण करत असे त्या भाषणाला **ज्ञप्ती** म्हणत असे. त्यानंतर ठरावाच्या रुपात तो विषय सभे पुढे येत असे. त्या ठरावाला **प्रतिज्ञा** असे म्हणत. प्रतिज्ञेला अनुमती असेल ते स्वस्थ बसत असे. इतर त्यावर चर्चा करत असे. कधी-कधी तीन वेळा मोठयाने प्रतिज्ञा वाचून दाखविली जात असे सभागृह तटस्थ राहिले की प्रतिज्ञेला मंजूरी मिळून त्याचे कायद्यात रुपांतर होत असे.

सभेच्या बैठकीला कामचलाऊ संख्येची आवश्यकता असे. ती संख्या कीती असावी हे अगोदरच ठरविलेले असे. ही संख्या नसेल तर, सभेचा निर्णय ग्राहय मानला जात नसे या **संख्येला वर्ग** म्हणतात. ही संख्या मोजण्यासाठी **गणपूरक अधिकारी** असे आजच्या कायदेमंडळात जो प्रतोद असतो त्याच्याशी गणपूरकाची तुलना करतात.

सभासदाच्या मताला **छंद** म्हणत. एखादया सभासदाला मतदानाचा अधिकार असेल पंरतु तो सभेला हजर राहू शकत नसेल तर, आपले मत सभेकडे पोचविण्याची व्यवस्था करता येत असे. पंरतु अश्या मतांचा विचार करावयाचा की नाही हा अधिकार सभागृहावर अवलंबून होता. ठराव पास झाला तर त्याची गरज नसे. प्रतिज्ञावर मतभेद होत असे, त्या वेळी मतदानासाठी सभासदांना विविध रंगाच्या मतपत्रिका वाटल्या जात. त्या मत पत्रिकेला **शलाका** म्हणत. **शलाकाग्राहक** नावाचा अधिकारी असे. गुप्त पध्दतीने मतदान होई. त्यास गुहाक म्हणत कित्येकदा प्रकट स्वरुपामध्ये मतदान घेतले जाई त्यास **वितरक मतदान** म्हणत. शलाकाच्या विविध रंगाचा हेतू सभासदाला समजून सांगितला जात. केंद्रिय समितीच्या कारभाराच्या नोंदीसाठी कारकून असे.

**क) मध्यवर्ती कार्यकारी मंडळ /मंत्रिमंडळाची कार्य पध्दत :-** गणराज्याच्या स्वरुपानुसार कार्यकारी मंडळ किंवा मंत्रिमंडळाची संख्या असे. मल्ल गणराज्याची चार, **लिच्छवीची नऊ** संख्या होती. प्रशासकीय कारभारात गुप्तता टिकवण्यासाठी योग्य निर्णय जलद घेणे व अंमलबजावणी होण्यासाठी कमी संख्या असावी. साधारणपणे ४ ते २० सभासद संख्या असावी. त्यांची नेमणूक केंद्रिय समितीकडून होत असे. सभासदांच्या अंगी प्रज्ञा, पौरुष, उत्साह, अनुभव, शास्त्र, गणराज्याची परंपरा इ. गुण असावे

कार्यकारी मंडळ सर्व निर्णय प्रधानमंत्र्याच्या नेतृत्वाखाली व एकमताने घेत असे प्रत्येक सभासदाकडे एक स्वतंत्र विभाग असे. उदा. परराष्ट्र विभाग, आयव्यय विभाग, (महसूल विभाग) न्यायदान विभाग त्या त्या विभागातील सर्व कामे त्यांना करावी लागत असे.

**ड)प्रशासकीय विभाग** - गणराज्यातील ग्रामाचा कारभार स्थानिक सभासदाकडे असे. यामध्ये बहुधा क्षत्रिय वर्णाचे सभासद असे. या मध्ये राजकीय, सामाजिक विषयावर चर्चा करत असे. शहराचा कारभार **शहर परिषदेमार्फत** चालत असे. क्षत्रिय,व्यापारी,सामान्याचे प्रतिनिधी असे. शहराच्या प्रश्ना संदर्भात चर्चा करत असे.

प्रांत हा प्रशासनाचा तिसरा विभाग होता. त्याच्या प्रमुखाची नेमणूक बहुधा **केंद्रीय समिती तर्फे** केली जात असावी त्याच्या मदतीसाठी अधिकारी असे. केंद्रीय समिती राजधानीच्या ठिकाणी असे.

श्री जयस्वालने **हिंदू पॉलिटी** या ग्रंथात इ.स.पू ६व्या शतकात भारतात लोकशाहीची बीजे राजकीय जीवनात रुजलेली होती त्यावरुन घटनात्मक राजकीय जीवन व जबाबदार राज्य पध्दती इ.स.पूर्व ६व्या शतकात दृढ झालेली होती. काहीच्या मते ६ व्या शतकापूर्वीच अस्तित्वात असली पाहिजे त्याच्या मते भारतात पूर्वी सार्वमताची पध्दत असावी सार्वमतालाच **परिपुच्छ** असे म्हणतात राईस **डेव्हिडच्या** मते "बळ राजेशाहीबरोबरच कमी अधिक प्रबळ गणराज्य किंवा जनपदे असावी". प्राचीन भारतात लोकशाही माहित नसावी पंरतु लोकशाही पध्दतीने राज्यकारभार करण्याचे ज्ञान प्राप्त होते. केवळ अनियंत्रित राजेशाहि होती असे नाही.

**आपली प्रगती तपासा**

१. गणराज्याची कार्यपध्दती स्पष्ट करा.

## ४.४ जैन धर्म

- **जैन धर्माच्या उदयाची कारणे**

**१) वैदिक धर्मातील यज्ञ, पूजाविधी व कर्मकांड :**

ब्राह्मणयुगात मोठ्या प्रमाणात यज्ञ केले जात होते. प्रत्येक गोष्टीच्या इच्छापूर्तीसाठी यज्ञ करावा लागे. यज्ञ, पूजाविधी व कर्मकाडांचे प्रस्थ मोठ्या प्रमाणात वाढले. उत्तर वैदिक काळात यज्ञाप्रमाणेच मंत्रतंज्ञ, उपास तापास, व्रतवैकल्ये, धर्मविधी, इ. चे महत्त्व वाढून या गोष्टीं म्हणजेच धर्म असा लोकांचा समज करुन दिला होता. यज्ञविधी, पूजा, कर्मकांड यास लोक कंटाळले होते.

**२) ब्राह्मण पुरोहिताचे वर्चस्व वाढले :**

यज्ञविधी, कर्मकांड, पूजाविधी करणारा ब्राह्मण पुरोहितांचा जो वर्ग होता त्याचे महत्त्व फारच वाढले होते. प्रत्येक यज्ञ, पूजा, कर्मकांड हे ब्राह्मण पुरोहिताकडून घ्यावे लागत. धार्मिक क्षेत्रात पुरोहिताचे वर्चस्व फारच वाढले. हा वर्ग स्वतःला समाजाचा मार्गदर्शक समजत होता. राजकिय स्वरुपाच्या यज्ञामुळेही हा वर्ग राजकिय क्षेत्रातही स्वतःचे वर्चस्व टिकवून होता. हा वर्ग मनुष्य व ईश्वर यांच्यातील मध्यस्त बनला होता. धर्म, राजकारण व प्रशासन या क्षेत्रात या वर्गाचा दबदबा निर्माण झाला होता. परंतु या वर्गाच्या वर्चस्वाला जनता कंटाळली होती.

**३) वैदिक साहित्य हे संस्कृत भाषेत होते :**

वैदिक साहित्य हे संस्कृत भाषेत असल्याने सर्वसामान्यांना ते वाचता येत नसे. पुरोहितांनी वैदिक मंत्रपठणाचा अधिकार स्वतःकडे ठेवला होता. त्यामूळे धर्मवचनांचा अर्थही लोकांना कळत नसे. सर्वसामान्यांना समजेल अशा भाषेतून धर्मग्रंथ असणे आवश्यक होते. समाजाची ही गरज महावीर वर्धमान यांनी पूर्ण केली.

**४) वैदिक धर्मातील खर्चिकता व पशुहत्या :**

विविध देवतांना प्रसन्न करुन घेण्यासाठी पुरोहिताला बोलवावे लागे. त्यास दक्षिणा द्यावी लागे. विविध वस्तुंची आहुती द्यावी लागे. त्या शिवाय यज्ञयुगात पशुबळी द्यावे लागत. म्हणजेच वैदिक धर्म हा खर्चिक बनला होता. सर्वसामान्यांना बिन खर्चिक व प्राणी हत्या नसलेला धर्म हवा होता. ही गरज जैन धर्माने पूर्ण केली.

**५) वैदिक धर्मात शुद्रांना स्थान नव्हते :**

शुद्रांचा वर्ग हा अनाथांचा असल्याने या वर्गास वैदिक धर्मात स्थान नव्हते. उत्तर वैदिक काळात जाति व्यवस्था अत्यंत परिवर्तनिय झाल्याने एका जातीतून दुसऱ्या जातीत जाता येत नव्हते. लोक संख्येतील एक मोठा वर्ग हा धर्मापासून वंचित होता. सर्व समावेशक अशा नव्या धर्माची आवश्यकता निर्माण झाली होती.

**६) वैदिक धर्मातील बहुदेवत्व :**

ऋग्वेदकालीन देवतांची संख्या ३३ कोटी होती. या विविध देवतांची प्रार्थना, उपासना करावी लागे. या विविध देवदेवतांची उपासना प्रार्थना केली नाही तर फल प्राप्ती होत नाही असा समज होता. पण मोक्षप्राप्तीसाठी, आत्म उत्कर्षासाठी विविध देवतांवर विश्वास ठेवण्याची गरज नाही; जीव, परमात्मा, सृष्टी, ईश्वर इ. विषयाचे ज्ञान झाल्यास मोक्ष मिळतो व जीवन समृद्ध होते, हे उपनिषदांनी सांगितले. परंतु उपनिषदांनी सांगितलेला मार्गही कठीणच होता. म्हणूनच ख्रिस्तीपूर्व काळात लोक जैन धर्माकडे वळले.

**७) मंत्रतंत्र व अंधश्रद्धांचा प्रभाव :**

पुरोहिताचा स्वार्थ व सामान्य जनतेचे अज्ञान यातून अंधश्रद्धा वाढण्यास प्रारंभ झाला. तंत्रविद्या, जादूटोणा, वशीकरण, भूतपिशाच्य विद्या या सारख्या आचाराला व त्या विषयीच्या अंध श्रद्धांना महत्व दिले जाऊ लागले. यातून समाजाची सुटका करुन समाजाला दैनंदिन जीवनात सदाचारालाच प्राधान्य देणाऱ्या नविन धर्माची गरज वाटू लागली आणि त्यातूनच जैन धर्माच्या उदय झाला.

**८) वर्णव्यवस्था व वैदिक धर्मातील स्त्रियांचे गौण स्थान :**

वैदिक धर्मात वर्ण व्यवस्था वाढीस लागून त्यात शुद्रांना समाजात कनिष्ठ स्थान प्राप्त झाले. समाजात वर्णव्यवस्थेमुळे विषमता प्रस्थापित झाली. स्त्रियांवर अनेक बंधने लादण्यात आली. स्त्रियांना धर्माचरण, मालमत्ता, धर्मग्रंथ वाचने हे अधिकार नव्हते. स्त्रियांना व शुद्रांना समाजात स्थान देणाऱ्या व ब्राह्मण, क्षत्रियांचे अवास्तव महत्त्व नसणाऱ्या धर्माची गरज भासू लागली आणि ती गरज जैन धर्माच्या माध्यमातून पूर्ण होऊ लागली होती म्हणूनच जैन धर्माचा उदय झाला.

सारांश, ख्रिस्तीपूर्व सहाव्या शतकात साधा, सोपा, पशु हत्या नसलेला, बिन खर्चिक धर्मतत्वज्ञान लोकांच्या बोली भाषेत असणारा स्त्रियांना व अस्पृश्यांना स्थान असणारा, अंधश्रद्धा व बहुदेवत्व इ. पासून दूर असणारा धर्म लोकांना हवा होता. ही गरज पूर्ण करणारा जैन धर्म होता म्हणूनच जैन धर्माचा उदय झाला असे म्हणता येईल.

## ४.५ वर्धमान महावीराचे जीवन (LIFE OF VARDHAMANA MAHAVIRA)

जैनधर्मातील शेवटचे व चोविसावे तिर्थकार वर्धमान महावीर यांचा जन्म इ.स. पूर्व ५३९ (प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास - गायधनी/राहूरकर, पृष्ठ क्र. १२७) मध्ये वैशाली नगराजवळ कुंदग्राम येथे झाला. त्याचे वडील सिद्धार्थ व आई त्रिशाला देवी होते. सिद्धार्थ हे ज्ञातृक नावाच्या क्षत्रिय जमातीचे प्रमुख होते. आई त्रिशाला ही लिच्छवी राजा चेटक याची

बहीण होती. वर्धमानचे शिक्षण क्षत्रिय गणराज्याच्या परंपरेत झाले. दिगंबर पंथाच्या परंपरेनुसार वर्धमानाचा विवाह झाला नाही असे मानतात. इतर परंपरेनुसार यशोदा नावाच्या सुंदर तरुणीशी लग्न झाले. तिच्यापासून अनोजा/प्रियदर्शना नावाची मुलगी झाली. आई-वडिलांच्या मृत्यूनंतर वयाच्या ३० व्या वर्षी वडील बंधू नंदिवर्धन यांची परवानगी घेऊन संसार त्याग हिवाळ्यात केला.

वर्धमानने बारा वर्ष उग्र तपःसाधना केली. भिसाचार्य, दिंगबरवृत्ती व आत्मक्लेश यावर भर होता. १२ वर्ष कठोर तपस्येनंतर ऋजुपालिका नदीच्या काठी जृंभिक नावाच्या गावी एका श्याल वृक्षाखाली एक जुनाट देवळाशेजारी केवल ज्ञान प्राप्त झाले. या ज्ञानप्राप्तीमुळे वर्धमान कामक्रोधादी इंद्रिय जिंकणारा म्हणून त्याला लोक जीन असे म्हणत. महावीर जीनने ज्या मार्गाचा प्रसार केला त्यास जैनधर्म म्हणतात. केवल ज्ञान प्राप्तीनंतर धर्मप्रचार व प्रसाराचे कार्य सुरु केले. वर्षाचे आठ महिने प्रसाराचे कार्य करत असे. मक्खली गोशाल याची नालंदा येथे भेट झाली. त्यांनी सहा वर्ष एकत्र कार्य केले. लिच्छवीराज चेटकची मुलगी अथवा चम्पा नरेश द्धिवाहनची पत्नी पद्मावती ही वर्धमानची पहिली शिष्य बनली. त्यानंतर चंपा, वैशाली, राजगृह, मिथिली, श्रावस्ती इ. ठिकाणी फिरुन प्रचार केला. उदायिन (शिंधू), स्तानिक (कैशाम्दी), प्रधोत (अवंती), बिबिसार (मगध), कामदेव, चुलानिपिया, सुरदेव, चुल्लसयग, आनंद, कुंडलोलिया, महासयग, साल्हीपिया, नंदिनीपिया, सैद्धाल इ. शिष्य बनले. धर्मप्रसाराचे कार्य करत असताना वयाच्या ७२ व्या वर्षी पावा येथे इ.स. पूर्व ४६७ मध्ये मृत्यू झाला.

## ४.६ जैन धर्माचे / वर्धमान महावीराचे उपदेश / शिकवण

**१) त्रिरत्ने / रत्नत्रयी :** जैन धर्माच्या शिकवणीचे सार म्हणजे त्रिरत्ने होय. उमा स्वामीने तत्वाथीधिगम सुत्र मध्ये त्रिरान म्हणजे मोक्षमार्ग सांगितले आहे. (१)सम्यक श्रद्धा (२) सम्यक ज्ञान (३) सम्यक आचरण

**२) सम्यक्दर्शन :** महावीर व तीर्थकार सर्वज्ञानी आहेत यावर विश्वास ठेवणे, आगम हेच धर्मग्रंथ, संत हेच खरे धर्मोपदेशक आहेत यावर विश्वास ठेवणे, सम्यक दर्शनाची आठ अंगे आहेत. ती पुढीलप्रमाणे - संदेहमुक्ती, वाईट मार्गापासून मुक्ती, प्रेमळ, धर्मतत्वाचे महत्व, श्रद्धा, धर्मावर विश्वास इ.

**३) पंचमहाव्रते / पांच याम** - प्रत्येक श्रमणाने पंचमहाव्रताची प्रतिज्ञा घ्यावी लागते. त्यानुसार आचरण करावे लागत असे. पंचमाहव्रते पुढीलप्रमाणे -

**१) अहिंसा :** जीवाची हिंसा रोखणे, कोणालाही दुःख द्यावयाचे नाही. मानसिक वाचिक आणि कायिक हिंसा करू नये.

**२) सत्य :** खोटे बोलू नये, सत्य सर्वांना प्रिय व कल्याणकारी आहे. सत्यवादीला आदर्श मानतात. सत्य व्रत पाळण्यासाठी लोभ, भय, क्रोध तिरस्कार याचा त्याग करावा.

**३) असत्येय :** बिना श्रद्धेशिवाय कोणतीही वस्तू घेऊ नये. दुसऱ्याच्या द्रव्याचे हरण करणे म्हणजे हिंसात्मक कार्य होय.

**४) अपरिग्रह :** साधूने द्रव्यसंग्रह करु नये. स्वार्थी, सुखरमण राहू नये.

**५) ब्रम्हचर्य :** कामवासना बाळगू नये, स्त्रीसंग टाळावा, पार्श्वनाथाने अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह ही चार तत्वे सांगितली. त्यामध्ये महावीरांनी ब्रम्हचर्य हे पाचवे तत्व आणि दिगंबरवृत्तीची भर टाकली.

**४) पंच अणुव्रते :** संसारी जीवन जगणाऱ्या व्यक्तीला जैन धर्मात श्रावक (गृहस्थ) असे म्हणतात. त्याच्यासाठी जे नियम बनवले त्यास अणुव्रते म्हणतात. ती पुढीलप्रमाणे प्राणी हिंसा, असत्य भाषण, चोरी न करणे, परस्त्रीशी व्यभिचार न करणे, गरजेपेक्षा जास्त द्रव्याचा संग्रह न करणे.

संसारात पाहून प्राणीमात्राला संरक्षण देणे, भोगांना मर्यादा ठेवावी, सामाजिक व्रत पाळणे, साधुजीवनाचा अभ्यास करणे, अभक्ष्य, कंदमुळे आणि रात्रीचे भोजन याचा त्याग करावा.

**५) सात शीलाव्रत :** जैन धर्माच्या त्रिरत्नाचे पालन करणाऱ्या श्रावकासाठी जे नियम तयार केले त्यास शीलाव्रत म्हणतात. ते सात प्रकारचे आहेत. त्यामध्ये तीन गुणव्रते आणि चार शिक्षा व्रते आहेत. ते पुढीलप्रमाणे -

**अ) तीन गुणव्रते :** श्रावक व श्राविकांमध्ये संयम व त्यागी वृत्ती जोपासण्यासाठी गुणव्रते सांगितली आहेत.

१) दिग्व्रत : आपल्या प्रवासाच्या दिशांच्या मर्यादा पाळणे.
२) देशव्रत : प्रवासाचे मर्यादित दिवस ठरवणे.
३) अनर्य दंडव्रत : आपला व्यवसाय विनाकारण अपराधाचे भागीदार बनू नये.

**ब) चार शिक्षाव्रते :** शिक्षाव्रत पालनाने व्यक्तीच्या अंगी संन्यासवृत्ती व सामाजिक स्वास्थाची वाढ होते.

**१) सामाजिक स्वविचार :** तत्वज्ञानातील विविध विषयाचे चिंतन केल्यास मन स्थिर होण्यास मदत होते.

**२)** प्रोषधोपणास महिन्यातील पंचमी, अष्टमी, चतुर्दशी या दिवशी उपवास करणे. त्या दिवशी धर्मग्रंथाचे पठण व आत्मचिंतन करावे.

**३) उपभोप्रतिभाग परिणाम :** दैनंदिन उपयोग वस्तूचा मर्यादित साठा करणे.

**४) अतिथि संविभाग :** घरी आलेल्या अतिथिचा स्वतःच्या जेवणातील काही भाग द्यावा.

**५) पाच समिति :** गृहस्थ जीवनाचे पालन करण्यासाठी जैन धर्माने पाच समित्या स्थापन केल्या त्या म्हणजे १) ईर्या समिती - कोणाच्याही जीवाला त्रास न देणे. २) भाषा समिती - कुणाबद्दलही टिका / कठोर न बोलणे, ३) एकूण समिती - खाण्या-पिण्यामध्ये जीवहत्या नको. ४) आदान निरपेक्ष समिती - वस्तूंचा उपयोग करताना जीवाची काळजी घेणे. ५) उत्सर्ग समिती - लहान मोठ्या शंकाचा वाईट प्रसार करु नये.

**६) जैन धर्माचे दशविध / दश लक्षणे** - जैन धर्माने पुढील दश लक्षणे सांगितली आहेत. क्षमा (क्रोध नष्ट), भार्दव (अहंकाराचा अभाव), आर्जव (कुटिलतेचा अभाव) सत्य, शुचिता (आत्मशुद्धीकरण) संयम, तप, त्याग, ब्रह्मचार्य, अकिंचनत्व (आभ्यन्तरतप)

**७) ब्राम्ह तपे** - तपाचरण, उपवास, अवभोदरिका, भिक्षूचर्या, कालक्लेश इ. होय.

**८) अकरा प्रतिभा** - जैन अनुयायांनी अकरा प्रतिभांचे पालन केल्यास संयम, शिस्त, त्यागाची प्रवृत्ती यामध्ये विकास होतो. ते अकरा प्रतिभा पुढीलप्रमाणे - दर्शन, व्रते, सामाजिक, प्रोषधोवास, सचित त्याग, अवमोदरिका, ब्रम्हचर्य, आरंभ त्याग, परिग्रह त्याग, अनुभति त्याग, उद्दिष्ट त्याग इ. होय.

**९) संन्याशासाठीचे नियम / परिषद :** जैन धर्माने संन्याश्यासाठी एकूण २२ नियम सांगितले आहेत. राग, तृषा, शीत, उष्ण, नग्नता, याचना, अरति, अलाभ, दंशमशकादि, आक्रोश, रोग, मल, तृण स्पर्श, अज्ञान, अदर्शन, प्रज्ञा, सत्कार, शय्या, चर्य्या, कर्मबंध, निषधा, स्त्रीभोग इ.

**१०) सल्लेखना** - उपोषणाच्या मार्गाने हळूहळू प्राण त्याग करणे म्हणजे आत्म्याने मिळवलेला मोठा विजय असे या शिकवणीला सल्लेखना असे म्हणतात.

**११) स्यादवाद/ अनेकांतवाद** - या विश्वातील वस्तूंच्या विषयासंबंधी आपले सर्व निर्णय हे पूर्णतः स्विकारले जातात किंवा ते पूर्णतः नाकारले जातात. ते संख्यामध्ये ७ आहेत. (१) आहे, (२) नाही आहे, (३) आहे आणि नाही (४) सांगता येत नाही, (५) आहे परंतु सांगता येत नाही, (६) नाही आहे आणि सांगता येते, (७) आहे, नाही आणि सांगता येते. या सिद्धांताला सप्तभंगी सुद्धा म्हणतात.

**१२) अष्टविधपुजा :** जैन धर्मात आत्माशुद्धासाठी तीर्थकार, पंचपरमेष्टी यांची पुजा व उपासना प्रचलित होती. पुजेचे प्रकार पुढीलप्रमाणे जलपुजा (जन्म-मृत्यूचे निवारण) चंदन पुजा (भवतापाची शांतीसाठी) अक्षतपुजा (सद्गुण प्राप्तीसाठी) पुष्पपुजा (वजनविकारांचा नाश्यासाठी) नैवेदय पुजा (क्षुधाविजय प्राप्तीसाठी) दीपपुजा (मोहांधकार दूर करण्यासाठी) धूपपूजा (अष्टकर्माच्या नाश्यासाठी) फलपुजा (मोक्षप्राप्तीसाठी) मूर्तिपूजा इ. अष्टविधपुजा होत असे.

**आपली प्रगती तपासा**

१. जैन धर्माचे तत्वज्ञान सांगा.

## ४.७ भारतीय संस्कृतीवरील जैन धर्माचा परिणाम

**१) साहित्यिक देणगी :**

भारतीय संस्कृतीस जैन धर्माची मोठी साहित्यिक देणगी मिळाली आहे. जैन साहित्यात बारा अंग, बारा उपांगे, दहा प्रकिर्ण, सहा छेदसूत्रे, याशिवाय विभिन्न प्रकारचे ग्रंथ महत्त्वाचे आहेत.

munotes.in

### २) दार्शनिक देणगी :

भारतीय दर्शन शास्त्रात (तत्त्वज्ञान) जैन धर्माची मोठी देणगी लाभली आहे. दर्शनशास्त्रात जैन धर्माच्या 'स्यादवाद' या सिद्धांतास एक विशिष्ट स्थान आहे. सत्याचे विभिन्न पैलू होऊ शकतात आणि मनुष्याला परिस्थितीनुसार त्याचे आंशिक ज्ञानही प्राप्त होते. अशा प्रकार आपण सत्याचे केवळ एक स्वरुप पाहुनही संपूर्ण सत्याविषयी एकमत करतो. सत्याचे स्वरुप विभिन्न प्रकारचे असते. स्यादवाद सिद्धांतानुसार प्रत्येक कथन किंवा दृष्टिकोनात आंशिक सत्य असते. त्यामुळे संपूर्ण सत्याच्या प्राप्तीसाठी या सर्व दृष्टिकोनाचे अध्ययन करणे आवश्यक आहे. जैन धर्माचा दुसरा प्रसिद्ध दार्शनिक सिद्धांत अनेकात्मवाद आहे. या सिद्धांतानुसार जीवन भिन्न-भिन्न प्रकारचे असू शकते. आत्मा जोपर्यंत राहील तोपर्यँत तो पुनर्जन्याच्या अधीन राहतो. या सिद्धांतापासून भारतीय संस्कृतीची सहिष्णुता व उदारतेची जाणीव होते. जैन धर्माचा पुनर्जन्म आणि कर्मवादाचा सिद्धांतही महत्वपूर्ण आहे.

### ३) लेणी :

लेणीला गृहा असेही म्हटले जाते. जैन धर्माने लेणी स्थापत्याचाही सर्वाधिक विकास केला. ओरिसातील 'हाथीगुंफा', महाराष्ट्रातील औरंगाबाद जिल्ह्यातील वेरुळ येथील लेणी, मध्यप्रदेशातील उदयगिरी येथील लेणी, परभणी जिल्ह्यातील जिंतूर येथील नेमगिरी लेणी व उस्मानाबाद येथील जैन लेणी ही त्याची उल्लेखनीय उदाहरणे आहेत. ओरिसातील पुरी जिल्ह्यात उदयगिरी व खंडगिरी येथे इ.स. पू १५० च्या आसपासच्या पस्तीस जैन लेणी आहेत. वेरुळ येथे पाच जैन लेणी आहेत. उदयगिरी येथील सिंह लेणी, वेरुळ येथील इंद्रसभा आणि हाथीमुद्रा लेणी प्रसिद्ध आहेत. बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथेही एक जैन लेणी आहे. वरील सर्व लेणींच्या दरवाज्यावर जैन तीर्थकारांच्या जीवनांची दृश्ये शिल्पांकित केलेली आहेत.

### ४) मंदिरे :

जैन-मुनीनी अनेक ठिकाणी आकर्षक मंदिरे बनविली आहेत. खजुराहो येथे अनेक जैन मंदिरे आहेत. राजस्थानमधील अबू पर्वतावरील दिलवारा मंदिर कलेच्या व सौंदर्याच्या दृष्टीने प्रसिद्ध आहे. या मंदिरात मूर्तिकला वेलबुट्टी व तोरणद्वारावर शिल्पांकित केलेले नक्षीकाम अत्यंत सुंदर आहे. राजस्थानमधील राणकपूर, काठीयावाड मधील (सौराष्ट्र) गिरनार आणि पालीताना आणि बिहारमधील पावापुरी, राजगृह व पारसनाथ इत्यादी जैन मंदिरे प्रसिद्ध आहेत. दिलवाडा येथील जैन मंदिरे कलात्मक दृष्टिकोनातून आग्रा येथील ताजमहाल ची बरोबरी करु शकतो. शुत्रुंजय डोंगरावर पाचशे जैन मंदिरे आहेत. इ.स. पू. दुसऱ्या शतकात बनविलेले ओरिसातील हाथीगुंफा नावाने प्रसिद्ध असलेले गुहामंदिर आकर्षक आहे. राणकपूर येथील मंदिरातील संगमरवरी दगडाचे स्तंभ विभिन्न शिल्पांनी सजविलेले आहे. चितौड येथील चौकोर स्तंभही जैनांच्या स्थापत्यकलेवरील प्रेमाचा साक्षीदार आहे.

### ५) अहिंसेचा सिद्धांत :

जैन धर्माच्या अहिंसेच्या सिद्धांताने भारतीय समाजाला फार मोठ्या प्रमाणात प्रभावित केले. महावीर स्वामी यानी मन, वचन कर्म या बाबतीत कोणालाही त्रास किंवा पुष्ट पोहोचणार नाहीत याची दक्षता घेण्याचा मानवाला उपदेश केला. अहिंसेचा सिद्धांताच्या प्रभावामुळे वैदिक धर्मात यज्ञात देण्यात येणारी पशुबळीची प्रथा बंद होण्यास मदत झाली. भारतीय समाजावर अंहिसा परमोधर्म, या जैन धर्माच्या सिद्धांताचा प्रभाव जाणवतो.

**६) सत्कार्य करण्याची प्रेरणा :**

जैन धर्माच्या तत्त्वज्ञानानुसार पूर्व जन्मात केलेल्या कर्मानुसार मनुष्य पुढील जन्म घेत असतो. जर त्याने सत्कर्म केले तरच त्याला मोक्षप्राप्ती मिळते आणि जन्म मरणाच्या बंधनातून त्याची सुटका होते. मोक्षप्राप्ती हेच मनुष्याच्या जीवनाचे अंतिम उद्दिष्ट आहे व ते साध्य करण्यासाठी सत्कर्म करणे आवश्यक ठरते. हा विचार समाजात रुजला आणि त्यामुळेच समाजात सत्कर्म करण्यास समाजातील व्यक्तिंना प्रेरणा मिळाली.

**७) चित्रकलेच्या क्षेत्रातील योगदान :**

जैन धर्माने चित्रकलेच्या विकासातही महत्वपूर्ण योगदान दिले. जैन आचार्यांच्या हस्तलिखित पुस्तकात अनेक प्रकारची सुंदर चित्रे उपलब्ध आहेत. चित्र रंगवण्यासाठी चमक देणाऱ्या रंगाचा उपयोग करण्यात येत असे. भारतीय चित्रकलेच्या विकासात जैन धर्मीयांचा चित्रकलेने योगदान दिल्याचे आढळते.

**८) राजकीय क्षेत्रातील योगदान :**

राजकीय क्षेत्रात जैन धर्माचा फार मोठा प्रभाव पडला. जैन धर्माचा अंहिसा या सिद्धांताच्या प्रभावामुळे जनतेने युद्धाचा त्याग करुन शांततापूर्ण जीवन जगण्यास प्रारंभ केला. मगधचा राजा अज्ञातशत्रू आणि नंद शासकाने जैन धर्माचा स्वीकार केल्याने ते युद्धापासुन परावृत्त झाले. याचा परिणाम असा झाला की भारताच्या शत्रूनी भारतावर हल्ले करण्यास प्रारंभ केला. काही इतिहासकारांच्या मते अंहिसेमुळे भारताचा पराभव झालेला नाही. भारताच्या पराभवासाठी इतर अनेक कारणे कारणीभूत आहेत.

**९) भाषा विकासाला प्रोत्साहन :**

जैन धर्मामुळे भाषेच्या विकासाला प्रोत्साहन मिळाले. जैन अनुयायांनी विभिन्न कालखंडात विभिन्न भाषेत ग्रंथ लिहिले. संस्कृत प्राकृत आणि अपभ्रंश भाषेत काही ग्रंथ लिहिण्यात आले. त्यापासुन पुढे कालांतराने मराठी, हिंदी व गुजराती भाषेचा जन्म झाला. जैन अनुयायांनी कन्नड, तामीळ व तेलगू या दक्षिणी भारतीय भाषांच्या विकासातही महान योगदान दिलेले आहे.

## ४.८ बौध्द धर्म

इ.स.पूर्व ६ व्या शतकात १६ महाजनाची सत्ता होती. हा कालखंड आध्यात्मिक, पारमार्थिक, वैचारिक, आणि चिंतनाचा होता. सामाजिक, धार्मिक जीवनात ज्या वेगवेगळया घटना घडल्या त्यामधून बौध्द व जैन धर्माचा उदय झाला.

### • बौध्द धर्माच्या उदयाची कारणे

**१) ब्राम्हण व पुरोहितांचे वर्चस्व** - ब्राम्हण कालखंडापासून समाजात सर्व क्षेत्रात विशेषता धार्मिक क्षेत्रात ब्राम्हण वर्गाची मक्तेदारी वाढली. जन्मापासून ते मृत्यूपर्यंत सर्व धार्मिक विधी व संस्कार ब्राम्हणामार्फतच केले जात. त्यामुळे ब्राम्हणाचे वर्चस्व वाढले. समाजाला ज्ञान व योग्य मार्गदर्शन करण्यास अज्ञानी ब्राम्हण असमर्थ ठरला त्यामुळे समाजाचा त्यांच्यावरील विश्वास कमी झाला. या परिस्थितीतून बौध्द व जैन धर्माचा उदय झाला.

**२) यज्ञ संस्थेचे प्राबल्य :-** परमेश्वराची कृपा संपादन करण्याचे साधन म्हणजे यज्ञ होय. ऋग्वेदकाळात आर्यांनी निसर्ग देवतांची कृपा प्राप्त करण्यासाठी यज्ञ करत असे. या काळात व्यक्ती स्वतःच्या इच्छेनुसार व शक्तीनुसार स्वतःच यज्ञ करत असे. ब्राम्हण काळात देवदेवताना संतुष्ट करण्यासाठी पशु किंवा प्राण्यांची आहुती देण्यास प्रारंभ झाला. धार्मिक जीवनात गुंतागुंतीच्या धार्मिक रुढी परंपरा निर्माण झाल्याने ब्राम्हण वर्गाचे महत्व वाढते. त्यामुळे समाज सर्व परिस्थितीला कंटाळलेला होता.

**३) आर्य-अनार्य यांच्यातील वैचारिक संघर्ष** - इ.स.पूर्व ६ व्या शतकातील धार्मिक क्रांतीचे प्रमुख कारण म्हणजे आर्य-अनार्य यांच्यातील वैचारिक संघर्ष होय. आर्यांची संस्कृती जेवढी प्रवृत्तिमार्गी होती तेवढीच अनार्याची संस्कृती निवृत्तीमार्गी होती. अनार्य संस्कृतीच्या संसार-त्याग, वैराग्य, आणि काया-क्लेश इ. विचारांना आर्यसंस्कृतीमध्ये महत्व नव्हते. आर्य-अनार्य यांच्यातील जातीय संघर्षाने सांस्कृतिक संघर्षाचे स्वरुप धारण केले. या संघर्षाचे प्रमुख केंद्र मगध होते. या संघर्षातून बौध्द व जैन धर्माच्या रुपाने ब्राम्हण धर्माविरुध्द क्रांती झाली. त्यातून बौध्द व जैन धर्माचा उदय झाला.

**४) वेदवादाला विरोध** - भारताचा प्रथम ग्रंथ वेद असून तो अपौरुषेय आहे. प्रत्यक्ष ब्रम्हदेवाच्या मुखातील वचने असल्याने वेदावर भारतीयांची अटळ श्रध्दा व विश्वास आहे. सामाजिक, धार्मिक प्रश्नांचे समाधान करण्याचा प्रमुख ग्रंथ म्हणून वेदाचा स्विकार केलेला आहे. बुध्दीवादी लोकांच्या विचारात क्रांती उत्पन्न झाली. त्यामुळे धार्मिक क्षोत्रात असंतोष निर्माण झाला. त्यातून नवीन धर्म उदयाला आला.

**५) वैदिक वाङमयाची क्लिष्टता** - त्या काळात सर्वसामान्याची भाषा प्राकृत होती. वैदिक वाङमयातील सर्व ग्रंथ संस्कृत भाषेत असल्याने त्यातील ज्ञान आत्मसात करणे सामान्याला शक्य नव्हते. उपनिषदात विश्वनिर्मिती, ब्रम्हतत्त्व, आत्मतत्व, मोक्ष इ. प्रश्नांची चर्चा केलेली होती. या ज्ञानाचा सामान्याला उपयोग नव्हता. धर्माचे तत्वज्ञान साध्या, सोप्या भाषेत सांगितले जावे अशी लोकांची मागणी होती.

**६) जाती संस्थेचे स्वरुप** - ऋग्वेदकाळात गुणकर्मावर आधारित वर्णाश्रम व्यवस्था निर्माण झाली. त्यानुसार ब्राम्हण,क्षत्रिय, वैश्य व शुद्र हे समाजात चार वर्ण होते. पहिल्या तीन वर्णामध्ये वर्ग बदलता येत असे, रोटीबेटी व्यवहार चालत असे. उत्तरवैदिक काळात जातीय व्यवस्था ताठर बनली. **जन्मानुसार** वर्ण ठरु लागला. समाजात वरिष्ठाकडून कनिष्ठांची पिळवणूक होऊ लागली त्यामुळे जाती विरहित धर्म निर्माण व्हावा असे सामान्य जनतेला वाटू लागले.

**७) मंत्रावरील अढळ विश्वास** - ब्राम्हण काळात कर्मकांडाबरोबरच मंत्र-तंत्राला महत्व प्राप्त झाले. मंत्रामध्ये दैवीशक्ती आहे की,जी अनेक दुखःद घटना दुर करुन जीवनात आनंद निर्माण करुन देते. त्यामुळे जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात मंत्राचा प्रभाव आहे असे लोकांना वाटत होते. बुध्दीवादी लोकांनी मंत्र-तंत्रावर टिका केल्या. साध्या सोप्या धर्माची कल्पना मांडली.

**८) विकृत देववाद** - वैदिक काळात आर्याने मानवी जीवन नियंत्रित करणाऱ्या प्रत्येक शक्तीला देवताचे रुप दिले. त्या देवताबरोबर मैत्रीचे संबंध कायमचे ठेवले. कारण देवता त्यांची शुभ चिन्तक आणि हितैषी होती. परंतु ब्राम्हणकाळात या विचारामध्ये बदल झाला. देवतांची संकल्पना मानवी रुपात होऊ लागली. परमेश्वर हा स्वेच्छाचारी, निरंकुश असून माणसाने त्याचा

दया कृपापात्र बनून राहिले पाहिजे असा विचार निर्माण झाला, त्यामुळे विचारवंतांच्यात असंतोष निर्माण झाला.

**९) उपनिषद तत्वज्ञानाचा प्रसार** - प्रचलित ब्राम्हण धर्मातून विचारवंताना आत्मशांती मिळाली नाही. आत्मशांतीचा नवा मार्ग उपनिषद तत्वज्ञानाने दाखवला. तप व चिंतनाचे महत्त्व वाढले. ब्राम्हण कालीन धर्मविधी ऐवजी त्यागी, समर्पित जीवनामुळे तप व चिंतन याला प्रतिष्ठा प्राप्त झाली. त्यातून नवीन धर्म उदयाला आला.

**१०) लोकभाषेचा उपयोग** - नव्या धर्मपंथाने आपले विचार, तत्वे लोकभाषेत म्हणजे अर्धमागधी व पाली भाषेत मांडले. त्यांची तत्वे लोकांना समजली. त्यामुळे नव्या धर्मांचा उदय झाला.

**११) राजकीय परिस्थिती** - इ.स.पूर्व ६ व्या शतकामध्ये राजकीय परिस्थिती पुढील प्रमाणे होती. भारतामध्ये अनेक छोटी राज्य असून राजकीय दृष्ट्या दुर्बल होती. या राज्यामध्ये लोकशाही व राजेशाही प्रशासन होते. त्यांच्यात साम्रज्यवादी प्रवृत्ती असून आपल्या शेजारील राज्यावर हल्ला करुन विजय प्राप्त करणे. परंतु कोणतीही शक्तीशाली प्रशासन आणि जनतेमध्ये ऐक्याची भावना निर्माण केलेली नाही.

**आपली प्रगती तपासा**

१. बौध्द धर्माच्या उदयाची कारणे सांगा.

---

---

---

---

---

## ४.९ गौतम बुध्दाचे जीवन (LIFE OF GAUTAM BUDDHA)

इ.स.पू ६ व्या शतकात वेद प्रभावाचा अधिकार नाकारुन आणि साध्या, सोप्या तत्वावर आधारित व लोकभाषेत प्रचार केलेल्या बौध्दधर्माची स्थापना झाली.

**१) गौतम बुध्दाचे घराणे व जन्म:-** कपिल वस्तू येथील **शाक्य वंशीय** राजा शुध्दोदन हे **क्षत्रिय** असून ते शाक्य गणराज्याचे प्रमुख होते. शुध्दोदनाची पत्नी **कोलिय** गणराज्याची राजकुमारी मायादेवी होती. शुध्दोदन व मायादेवी यांच्या पोटी सिध्दार्थ गौतमचा जन्म झाला. त्याचे **जन्मनाव**-सिध्दार्थ, **गोत्रनाम.** गौतम आणि आध्यात्मिक नाव बुध्द या नावाने प्रसिध्द आहेत. मायावती प्रसुतीसाठी माहेरी जात असताना वाटेत नेपाळमध्ये **रोहिणी** नदीच्या काठी लुंबिनी (तिलौराकोट) या गावी शालावृक्षाखाली सिध्दार्थाचा जन्म इ.स.पूर्व ५६३ मध्ये झाला. तो दिवस **वैशाख पौणिमेचा** होता. बुध्दाच्या जन्मस्थाना संदर्भात अशोकाचा रुम्मिनदेई शिलालेख,

ह्युयनत्संगचा वृतांत यातून माहिती मिळते. मायावती पुत्रजन्मानंतर सात दिवसांनी मरण पावली. बाल सिध्दार्थाचे संगोपन त्याची मावशी व सावत्र आई महाप्रजापती गौतमी हिने केले. गौतमीने सिध्दार्थाचा संभाळ केल्याने गौतम या नावाने ओळखला जाऊ लागला. राजपुत्राला शोभेल असे सर्व प्रकारचे शिक्षण दिले. **ललित विस्तारातील** दंतकथेनुसार सिध्दार्थ **धनुर्विद्येत** प्रवीण होता असे कळते.

**२) वैवाहिक जीवन:-** गौतमाच्या जन्माआधी मायावतीला स्वप्न पडले की, कमळ तोंडात धरलेला पांढरा शुभ्र हत्ती आपल्या शरीरात प्रवेश करत आहे. यावरुन ज्योतिषांनी असे भविष्य सांगितले की, राजपुत्र चक्रवर्ती सम्राट बनेल किंवा महान संन्याशी बनेल. आपला मुलगा संन्याशी बनू नये यासाठी शुध्दोदनने सर्व प्रकारच्या सुखाची काळजी घेतली. वयाच्या १६ व्या वर्षी गौतमाचे लग्न **दंडपाणी** यांची अतिशय सुंदर कन्या **यशोधरा** हिच्याशी झाले. तिच्यापासून **राहूल** नावाचा पुत्र झाला.

**३) संसारत्याग :** रोहिणी नदी ही शाक्य व कोलीय या दोन राज्यांची सीमा होती. या दोन्ही राज्यांतील लोक या नदीचे पाणी शेतीसाठी घेत असत. या नदीचे पाणी प्रथम कोणी व किती घ्यावे याबाबत प्रत्येक सुगीच्या हंगामात त्यांचा वाद होत असे. सिद्धार्थ गौतम संघाचा सभासद झाल्यापासून आठव्या वर्षी शाक्य व कोलीयांच्या सेवकांत नदीच्या पाण्यावरुन मोठा संघर्ष झाला. तेव्हा हा प्रश्न आता युद्ध करुनच कायमचा निकालात काढावा असा विचार शाक्य व कोलीय यांनी केला. त्यासाठी शाक्यांच्या सेनापतीने शाक्य संघाचे अधिवेशन बोलाविले व कोलिय यांना कायमचा धडा शिकविण्यासाठी संघाने कोलीया विरुद्ध युद्ध पुकारावे असा ठराव मांडला परंतु सिद्धार्थाने या ठरावास विरोध करुन पुढील सूचना केली.

"युद्धाने कोणताही प्रश्न सुटत नाही किंवा आपला हेतू साध्य होत नाही. त्यामुळे दुसऱ्या युद्धीचे बीजे रोवली जातील, जो दुसऱ्याची हत्या करतो त्यास त्याची हत्या करणारा दुसरा भेटतो. संघाने युद्ध करण्याची घाई करु नये. प्रथम दोष कुणाचा आहे याची चौकशी करावी. शाक्यातील दोन व कोलीयातील दोन अशी चार माणसे प्रथम निवडावीत आणि या चार माणसांनी मिळून पाचवा मनुष्य निवडावा व या पाच माणसांनी हे भांडण मिटवावे. वैराने वैर शमत नाही तर वैरावर प्रेमानेच मात करता येते."

सिद्धार्थाची सूचना बहुमताने अमान्य झाली तर सेनापतीचा प्रस्ताव बहुमताने पास झाला. दुसऱ्या दिवशी संघाची दुसरी सभा बोलाविली व त्यामध्ये कोलायाशी युद्ध करण्यासाठी २० ते २५ वर्षे वयाच्या प्रत्येक शाक्य तरुणाने सैन्यात दाखल व्हावे, अशी घोषणा करण्यासाठी संघाने परवानगी घ्यावी असा ठराव सेनापतीने मांडला. या ठरावालाही केवळ सिद्धार्थानेच विरोध केला. या वेळी सिद्धार्थ म्हणाला, "मित्र हो! तुम्हाला जे वाटेल ते तुम्ही करा. तुमच्या बाजुस बहुमत आहे. पण मला खेदाने म्हणावे लागत आहे की सैन्य भरतीच्या तुमच्या निर्णयास माझा विरोध आहे. मी तुमच्या सैन्यात दाखल होणार नाही व युद्धातही भाग घेणार नाही." यानंतर सेनापती सिद्धार्थला म्हणाले, बहुमताने घेतलेला संघाच्या निर्णयाचे तु पालन केलेच पाहिजे. नसता संघाच्या आज्ञेचा भंग केला म्हणून संघ तुला देहांताची किंवा देहत्यागाची शिक्षा देऊ शकते. याशिवाय संघ तुझ्या कुटुंबावर सामाजिक बहिष्कार टाकू शकेल व तुझ्या अनुमतीची आवश्यकता संघाला राहणार नाही. (कारण शाक्यांचे राज्य यावेळी कोसल राज्याचे मांडलिक राज्य होते) कोलीयांशी युद्ध करण्याच्या संघाच्या योजनेस विरोध करण्यामुळे दुष्परिणाम भोगावे

लागतील याची सिद्धार्थाला जाणीव झाली. त्यासाठी त्याला पुढील तीन पर्यायांवर विचार करावा लागला.

१) शाक्य संघाच्या सैन्यात दाखल होऊन कोलीयांविरुद्धच्या युद्धात सहभागी होणे.
२) देहान्त शासनाला किंवा देश त्यागाला संमती देणे.
३) आपल्या कुटुंबियावर सामाजिक बहिष्कार ओढवून घेणे आणि त्यांच्या मालमत्तेची जप्ती होऊ देण्यास तयार होणे.

सिद्धार्थाने पहिला पर्याय न स्विकारण्याचा निर्धार केला. तिसरा पर्याय असह्य होता. त्यामुळे त्याला दुसरा पर्याय योग्य वाटला. त्यानुसार तो संघाला म्हणाला, "माझ्या कुटुंबियांवर सामाजिक बहिष्कार टाकून त्यांना दु:ख देऊ नका. त्यांच्या उपजीविकेचे साधन असलेली शेती जप्त करुन त्यांची उपासमार करु नका. ते निरपराध आहेत. मीच अपराधी आहे. माझ्या अपराधाची शिक्षा मला एकट्यालाच भोगू द्या. मला देहांताची किंवा देशत्यागाची यांपैकी तुम्हाला जी योग्य वाटेल ती शिक्षा द्या. मी ती खुशीने स्विकारीन. मी याविषयी कोसल राज्याच्या राजाकडे मुळीच याचना करणार नाही याचे मी आपणास वचन देतो" पण शाक्य संघाच्या सेनापतीने सिद्धार्थाचे म्हणणे अमान्य केले. कारण सिद्धार्थ स्वेच्छेने देशत्याग किंवा देहातांची शिक्षा भोगण्यास तयार झाले असले तरी कोसलाधिपती ही शिक्षा संघानेच दिली असा निष्कर्ष काढील. तो त्याचा जाब संघाला विचारील अशी भीती सेनापतीला वाटत होती. तेव्हा सिद्धार्थ पुन्हा सेनापतीला म्हणाला, "हीच जर अडचण असेल तर मी परिव्राजक होतो व हा देश सोडतो हा मार्ग चांगला वाटला. पण सेनापती सिद्धार्थाला म्हणाला की, तुला आई-वडील आणि पत्नीच्या संमतीशिवाय परिव्राजक कसे होता येईल? यावर सिद्धार्थ म्हणाला, त्यांची संमती मिळो न मिळो हा देश त्वरीत सोडून जाण्याचे मी तुम्हाला वचन देतो. यानंतर संघाने सिद्धार्थाने सुचविलेला हा मार्ग मान्य केला. शाक्य संघाच्या सभेत घडलेला वृत्तांत सिद्धार्थ घरी परतण्यापूर्वीच त्याच्या मात्यापित्यांना समजला. त्यामुळे ते दु:खी होणे साहजिक होते. सिद्धार्थाने देश त्याग करु नये यासाठी शुद्धोदन व महाप्रजापती गौतमीने केलेला प्रयत्न निष्फळ ठरला. यानंतर सिद्धार्थाने यशोधरेच्या महालात जाऊन तिला विचारले. परिव्रज्य घेण्याच्या माझ्या निश्चयाबद्दल तुला काय वाटते? या प्रश्नाचे उत्तर देताना यशोधरा सिद्धार्थाला म्हणाला मी आपल्या जागी असते तर याशिवाय दुसरे काय करु शकले असते! आपला हा परिव्राजक होण्याचा निर्णय योग्य असून माझी आपल्या निर्णयास अनुमती व पाठिंबा आहे. मी सुद्धा आपल्या बरोबर परिव्रज्य घेतली असती. पण मला राहुलचे संगोपण करावयाचे असल्याने मी परिव्रज्या घेत नाही. आपण परिव्राजक झाले नसते तर बरे झाले असते. परंतु आपण शूर व धाडसी बनुन परिस्थितीला सामोरे गेले पाहिजे. आपण आपल्या आई-वडीलांची व राहुलची अजिबात चिंता करु नका. माझ्या शरीरात प्राण असेपर्यंत मी त्याची देखभाल व मानवजातीला कल्याणकारी अशी शुर, धैर्यवान व उदात्त मनाची पत्नी लाभल्याबद्दल आपण किती भाग्यवान आहोत व अशा महान पत्नीचा व आपला वियोग देवाने कसा घडवून आणला याची त्याला प्रथमच जाणीव झाली. यानंतर त्यांने राहूलकडे पाहिले व तो घराबाहेर पडला. या घटनेला बौद्ध साहित्यात 'महाभिनिष्क्रमण' म्हणतात.

**४) ज्ञानप्राप्ती** - आत्म्याच्या साधनेसाठी गुरुच्या शोधात सिद्धार्थ अनेक ठिकाणी भटकत राहिला. वैशालीच्या **आलार कलाम** आश्रमातील आचार्याकडून ज्ञान मार्गाचे तंत्र आत्मसात केले. त्यानंतर राजगृहाजवळ **उदक रामपुत्र** या आचार्याकडून ध्यानविधीचे ज्ञान प्रप्त केले.

त्यानंतर मगध (गया) येथील उरुवेल येथील निरंजना नदीकाठी अश्वत्थ वृक्षाखाली हटयोगाच्या तपश्चर्येस प्रारंभ केला. सात आठवडे ज्ञानप्रप्तीसाठी समाधिस्त बसला. कठोर परिश्रमातून **वैशाखपौणिमेला** ज्ञानप्रप्त झाले. तेव्हापासून सिध्दार्थाला **बुध्द** म्हणजे ज्ञाता, असे ओळखले जाऊ लागले. या ज्ञानास **संबोधी** असे नाव असून ज्ञानप्राप्ती ज्या वृक्षाखाली झाली त्या पिंपळ वृक्षाला **बोधीवृक्ष** असे संबोधले जाते.

**५) धर्मप्रसार व महापरिनिर्वाण–** आपणाला ज्ञानप्राप्त झाले त्याचा प्रसार करण्याच्या कार्याला प्रारंभ केला.यासाठी तो प्रथम आलार कलाम व उदक रामपुत्र यांच्याकडे गेला परंतु ते मरण पावले होते. त्यानंतर तो वाराणसी येथे (सारनाथ) येथील हरिणांच्या वनात पाच भिक्षूना आपले **पहिले प्रवचन** दिले त्याला **धम्मचक्रप्रवर्तन** असे म्हणतात. तर पाच भिक्षू **पंचवर्गीय** म्हणून प्रसिध्द आहेत. गौतम बुध्द काशीला गेले तेव्हा **बौध्द संघाची** स्थापना केली. राजगृह येथील सारिपुत्र, मौद्रल्यायन, कपिलवस्तू येथे राहूल व त्याची आई गौतमी (पहिली स्त्री धर्म स्विकारणारी) धर्म स्विकारला त्याचप्रमाणे मगध, अंग, कोसल इ. राज्यातील अनेक लोकांनी बौध्द धर्म स्विकारला. धर्मप्रसाराचे कार्य करत असताना वयाच्या ८० व्या वर्षी मल्लाची राजधानी कुशिनारा येथे इ.स.पूर्व ४८३ मध्ये मृत्यू झाला. या घटनेला **महापरिनिर्वाण** असे म्हणतात.

## ४.१० गौतम बुद्धाचे तत्वज्ञान

बुध्दाच्या शिकवणीची माहिती पाली भाषेतील सुत्तपिटक या ग्रंथातून मिळते. मानवी जीवनाची दुःखातून सुटका करणे हाच प्रमुख हेतू होता. यासाठी त्यांनी चार तत्व सांगितली. त्यांना चार आर्य सत्य असे म्हणतात.

**१) चार आर्यसत्य - १) दुःख** - जगात सर्वत्र दुःखाचेच अधिराज्य आहे. जन्म, व्याधी, बुध्दत्व, विरह, मृत्यू, अनिष्ट प्राप्ती, इष्ट विनाश ही दुःखाची कारणे आहेत. सुख हे क्षणभंगूर असते पण दुःख दीर्घकाळ असते.

**२) दुःखाचे कारण** -दुःख जीवनापासून विभक्त नाही. जीवनाचाच तो एकभाग आहे. दुःखाचे मुळ कारण म्हणजे तृष्णा होय. तृष्णा तीन प्रकारची म्हणजे इंद्रिय सुखाची कामतृष्णा, जगाचा मोह म्हणजे भवतृष्णा वैभवाची आकांक्षा म्हणजे वैभव तृष्णा. या तीन प्रकारच्या तृष्णाला त्रिविध म्हणतात.

**३) दुःख निरोध** - दुःखापासून सुटका करुन घेणे कठीण असले तरी अशक्य नाही. तृष्णा नष्ट केल्यास दुःखसुध्दा नष्ट होते. तेव्हा मानव अनंत आत्मसुखाचा उपभोग घेऊ शकतो.

**४) दुःख निरोधाचा मार्ग** - आत्यंतिक भोगवाद व त्यागवादाने दुःखाचा शेवट होत नाही तर अज्ञान व तृष्णेचा नाश केल्यास दुःखाचा नाश होतो. यासाठी अष्टांगमार्ग सांगितलेला आहे.

**२) अष्टांग मार्ग/मध्यप्रतिपदामार्ग/मध्यममार्ग -**

बुध्दाचा पहिला संदेश म्हणजे सारनाथ येथे 'धर्मचक्रपरिवर्तन' या विषयाचे विवेचन होय. तेथेच त्याने अष्टांगमार्ग सांगितला. अष्टांगमार्ग म्हणजे **बौध्दधर्माचे सार** होय. (अष्टांगमार्गातील आठ अवस्था पुढीलप्रमाणे )



munotes.in

१) **सम्यक् दृष्टि** - चार आर्यसत्याचे सर्वांगीण ज्ञान म्हणजे सम्यकदृष्टि होय.

२) **सम्यक् संकल्प** - कोणत्याही फलाची अपेक्षा न करता सत्यदृष्टिनुसार जीवन सुधारण्याचा निर्धार करणे. यासाठी राग, लोभ ऐश्वर्य, सत्ता, कामोपभोग याबद्दल तृष्णा नष्ट झाली पाहिजे.

३) **सम्यक् वाक्/वाणी** - कोणीही दुःखी होणार नाही अशी आपली वाणी असावी. नेहमी सत्यवचनी, मृदुभाषी, मितभाषी असावे. परनिंदा, चहाडी, शिवीगाळ असे बोलू नये.

४) **सम्यक् कर्म** - हिंसा, चोरी, व्यभिचार इ.कर्मापासून दुर रहावे. मनुष्याने सत्य कर्म करावे.

५) **सम्यक् आजीव** - नितीमार्गाने मिळवलेल्या संपत्तीवर उदर निर्वाह करावा. अप्रामाणिकपणे व लाचारीच्या मार्गाने काहीही मिळवू नये.

६) **सम्यक् व्यायाम** - मनांतील दुष्ट भावनांचे दमन करुन आध्यात्मिक व भौतिक उन्नतीसाठी सुविचार व सद,विचारांची जोपासना करावी.

७) **सम्यक् स्मृती** - जगातील सुख, सत्ता, प्रसिध्दी हे सर्व नाशवंत आहेत. याची जाणीव ठेऊन त्यापासून दुर रहावे.

८) **सम्यक् समाधी** - मनाची एकाग्रता वाढवल्यास निर्वाणपद प्राप्त होते. वरील अष्टांगमार्गाचा अवलंब केल्यास दुःखाचे निरोधन होऊन मोक्ष अथवा निर्वाणपद प्राप्त होते.

**३) बुध्दधर्मातील त्रिरत्ने** -अष्टांगमार्गाचा सार म्हणजे प्रज्ञा, करुणा, शील ही बुध्द धर्मातील त्रिरत्ने होय. **प्रज्ञेमुळे** मिथ्यादृष्टिचा नाश होतो. **शील** म्हणजे सर्व पापापासून निवृत्त होऊन शुध्दचरित्र होय. **करुणा** म्हणजे दुःखिताबद्दल दया, कळवळा निर्माण होतो. प्रज्ञा करुणा, शील हे बुध्द धर्माचे **आधारस्तंभ** आहेत.

**४) ब्रम्हा विहार/चित्तशुध्दीचे उपाय** - गौतम बुध्दाने नैतिक व दैनंदिन जीवनातील सदाचाराच्या शिकवणुकीबरोबर चित्त शुध्दीचे चार उपाय सांगितले आहेत. त्याला **ब्रम्हविहार** असे म्हणतात. मैत्री, करुणा,मुदिता व उपेक्षा हे **चार उपाय** होय. प्राणीमात्रा बद्दल प्रेम बाळगणे म्हणजे **मैत्री** होय. दुसऱ्याचे दुःख पाहून स्वतः दुःखी होणे म्हणजे **करुणा** होय. दुसऱ्याच्या सुखात, आनंदात स्वतः समाधानी होणे म्हणजे **मुदिता** होय. कर्माप्रमाणे सुखदुःखाची निर्मिती होणे याची जाणीव ठेवणे म्हणजे **उपेक्षा** होय. ब्रम्हाविहारामुळे ज्ञान व सद्‌गती प्राप्त होते.

**५) पंचशील तत्वे/सदाचार** - गौतमाने आपल्या पवित्र व उदात्त चारित्र्याने लोकांपुढे काही नैतिक आदर्श ठेवले होते. अनुयायांच्या मार्गदर्शनासाठी जे नैतिक नियम घालून दिले त्यास पंचशील तत्वे म्हणतात. ते पुढीलप्रमाणे.

१) **अहिंसा** - कोणत्याही जीवमात्रास ठार करु नये.

२) **सत्य** - नेहमी सत्य बोलावे.

३) **अस्तेय** - गरजेपुरतेच साहित्य ठेवावे.

४) **ब्रम्हचर्य** - व्यभिचार करु नये.

५) **अपरिग्रह** - मादक द्रव्यांचे सेवन करता कामा नये.

**१) दहाशील आणि नैतिक आचरण :**

गौतम बुद्धांनी एका नवीन जीवन पद्धतीचा पुरस्कार केला. दहा शील मार्गाचे आचरण केल्यास मनुष्याची जन्म-मरणाच्या बंधनातून सुटका होते व तो 'निर्वाण' प्राप्ती करु शकतो. यासाठी खालील दहाशील मार्ग सांगितले आहेत.

१) अहिंसा - कोणत्याही प्राण्याची व जीवाची हिंसा न करणे.
२) अस्तेय - चोरी न करणे.
३) सत्य - असत्य संभाषण न करणे. नेहमी सत्याचीच कास धरण.
४) अपरिग्रह - मादक पदार्थ, द्रव्ये न घेणे.
५) ब्रह्मचर्य - व्यभिचार न करणे व अपवित्र गोष्टी पासून दूर राहणे.
६) सुंगधी द्रव्य वापरु नयेत पुष्पमाला घालू नयेत.
७) नृत्य गायनाचा त्याग करणे.
८) अवेळी जेवण करु नये.
९) जमिनीवर अंथरलेल्या चटईवर झोपावे. कोमल गादीचा वापर करु नये.
१०) कामिनी व कंचन यांचा त्याग करणे.

**आपली प्रगती तपासा**

१. बौध्द धर्माचे तत्त्वज्ञान सांगा.

## ४.११ बौद्ध धर्मातील पंथ

गौतमबुध्दाच्या महापरिनिर्वाणानंतर दोनशे वर्षातच भिक्षूंमध्ये मतभेद होऊन बौध्दसंघात अनेक गट किंवा पंथ निर्माण झाले. सम्राट अशोकाच्या काळापर्यंत १८ पंथ निर्माण झाल्याचा उल्लेख मिळतो. या काळात स्थविरवादी, काश्यपीय, महीशाष्टक, महासांघिक, सर्वास्तिवादी, हैमावत, माध्यमिक, बहुश्रूतीय, वात्सीपुत्रीय, योगाचार, धर्मगुप्तिक, सौत्रांतिक, चैत्यक इ पंथ असण्याची माहिती मिळते. हीनयान व महायान हे दोन अतिशय महत्वाचे पंथ होते.

munotes.in

### हिनयान व महायान पंथातील फरक :

| | | | |
|---|---|---|---|
| १) | हा पंथ सनातनी कर्मठ व संन्यासमार्गी पंथ आहे. | १) | हा पंथ सुधारक, उदार व भक्ति मार्गी आहे. |
| २) | सर्वसंगपरित्याग करुन स्वप्रयत्नाने निर्वाणासाठी झटणारा अर्हंत हा हीनयानांचा आदर्श आहे. | २) | संसारात राहूनही सर्वभूतहितार्थ झटणारा बोधिसत्व हा महायानाचा आदर्श आहे. |
| ३) | हीनयानाचा आत्मक्लेशवर भर आहे. | ३) | भक्ती हे महायानाचे साधन आहे. |
| ४) | गौतम हा मृत धर्मगुरु आहे. प्रत्येकास बुद्धत्व प्राप्त होत नाही असे हीनयान मानतो. | ४) | गौतम बुद्ध ही अमर दैवी विभूती असून प्राणिमात्राला बुद्धत्व प्राप्त होते असे महायान पंथ मानतो. |
| ५) | पाली ही हीनयान पंथाची भाषा आहे. | ५) | संस्कृत ही महायान पंथाची भाषा आहे. |
| ६) | स्वप्रयत्नाने याच जन्मी निर्वाण प्राप्त करुन घ्यावे असे हीनयान सांगतो निर्वाण प्राप्ती मनुष्याच्या कर्मावर अवलंबून आहे. | ६) | निर्वाण हे या जन्मीचे ध्येय असून हे क्रमशः प्राप्त होते अशी महायानाची शिकवण आहे. |
| ७) | सिलोन, ब्रह्मदेश येथे हा पंथ आहे. | ७) | तिबेट, चीन, मध्य व पूर्व आशियात हा पंथ आहे. |
| ८) | स्तूप, चैत्य व प्रतीकोपासना हीनयानास संमत आहे. पण बुद्धाची ईश्वराच्या स्वरुपात उपासना या पंथास मान्य नाही. | ८) | बुद्धावतार बोधिसत्व व बौद्ध मूर्तिपूजा हा पंथ शिकवतो. अवतारी गौतमाच्या जीवनाशी संबंधित असलेली स्थळे ही या धर्माची तीर्थक्षेत्रे आहे. |
| ९) | या संप्रदायाच्या अनुयायंची संख्या कमी आहे. | ९) | या संप्रदायाच्या अनुयायांची संख्या जास्त आहे. |
| १०) | आष्टांग मार्ग, पंचशील यावर श्रद्धा आहे. | १०) | श्रद्धा, भक्ती समर्पण, मूर्तिपूजा यावर भर |
| ११) | बौद्ध धर्मपरिषदांनी वेळोवेळी बौद्ध धर्मात घडवून आणलेले परिवर्तन हीनयानास मान्य नव्हते. | ११) | बौद्ध धर्मपरिषंदानी बौद्ध धर्मात घडवून आणलेले परिवर्तन महायानास मान्य आहे. |

### आपली प्रगती तपासा

१. बौद्ध धर्मातील हिनयान व महायान पंथातील फरक लिहा.

## ४.१२ बौध्द धर्माच्या प्रसाराची कारणे

१) **धर्मस्थापनेवेळची अनुकूल परिस्थिती** - भारतामध्ये बुध्द धर्म स्थापन्यास अत्यंत अनुकूल परिस्थिती होती. हिंदुधर्मामध्ये अनिष्ट रुढी, परंपरा व यज्ञ याचे फार महत्व वाढले होते. त्यामुळे सामान्य जनता अतिशय नाराज होती. त्यांना हिंदूधर्मात बदल किंवा नविन विचार अपेक्षीत होते ते बौध्दधर्माच्या रुपाने मिळाले म्हणूनच धर्माचा प्रसार झाला.

२) **गौतम बुध्दाचे आदर्श व प्रभावी व्यक्तीमत्व** - गौतम बुध्द राजघराण्यातील असूनही सामान्य दुःखापासून मुक्त करण्यासाठी सर्व सुख, ऐश्वर्य यांचा त्याग केला. तसेच प्रसन्न व्यक्तीमत्व, अघोम वक्तृत्व, अलौकिक त्याग, प्रखर बुध्दिमत्ता, शांत व हसतमुख स्वभाव, जनहिताची तळमळ या गुणांचा सामान्यावर परिणाम होऊन त्यांना अनेक अनुयायी मिळाले.

३) **साधी शिकवण** -गौतम बुध्दाची शिकवण साधी व सरळ व सामान्याला सहज समजू शकेल अशी सोपी होती. सदाचार, नीतीमत्ता यावर धर्म आधारलेला होता. सत्कर्म केल्यास फळही चांगले मिळते. स्वर्ग, नरक, देवदेवता, मूर्तीपूजा,यज्ञ,संस्कार इ.आचार व विचारांना स्थान नव्हते म्हणून लोकप्रिय झाली.

४) **लोकभाषेत शिकवण** - गौतम बुध्दाने धर्मप्रसारासाठी पाली, प्रकृत या लोकभाषेचा उपयोग केला. त्याच भाषेत वाङमयाची निर्मिती करुन सामान्य जनतेपर्यंत आपले तत्वज्ञान पोहचवले. ह्याचा अधिक परिणाम झाला.

५) **राजाध्यक्ष** - गौतम बुध्द स्वतः राजघराण्यातील असल्याने अनेक घराण्यांशी संबंध होता. शुध्दोधन, बिंबिसार तसेच शासनातील श्रेष्ठ अधिकारी, मांडलिक राजे यांनी बौध्द धर्म स्विकारला. बुध्दाच्या महानिर्वाणानंतर सम्राट अशोक, मिलिंद, कनिष्क, हर्षवर्धन इ.राजांनी बौध्द धर्म स्विकारुन धर्माला राजाश्रय दिला. त्यांनी धर्मप्रसारासाठी विविध उपाय योजना केल्या. त्यामुळे धर्माचा प्रसार झाला.

६) **समानतेच्या तत्वाची वागणूक** -वैदिक धर्मात जन्मावर आधारलेली जातीय व्यवस्था होती. सामाजात वरिष्ठ व कनिष्ठ अशी विषमता होती. बौध्द धर्माने कोणताही भेदभाव न करता सर्वांना आपल्या धर्माचे दरवाजे खुले ठेवले. सर्वांनाच प्रेमाची, समानतेची, सन्मानाची वागणूक दिली. त्यामुळे जनतेने त्यांना पाठिंबा दिला परिणामी धर्माचा प्रसार झाला.

७) **बौध्द संघाची कामगिरी** - गौतम बुध्दाने धर्मप्रसारासाठी प्रचारकांची जी संघटना केली त्यास बौध्द संघ म्हणतात. धर्मसंघात सर्वसंग परित्याग केलेले भिक्षू व भिक्षूणींचा समावेश होता. त्यांची आदर्श वागणूक, त्यागी, विव्दान इ त्याच प्रमाणे ते सामान्य लोकांच्यात मिसळत असे. विहार हे मांगल्याची व त्यागाची स्फूर्तिस्थाने असून लेकशिक्षणाचे कार्य करीत असे. त्यामुळे धर्माचा प्रसार झाला.

८) **बौध्दधर्मातील लवचिकता** - बौध्दसंघातील पंडित, आचार्य, भिक्षूंनी धर्माचा प्रसार करताना काळानुसार व गरजेनुसार योग्य तो धर्मात बदल केले. धर्मप्रसार करताना कोणी टिका,

निंदा केली. प्रसंगी मार दिला तरीही त्याला प्रतिकार केला नाही. त्यामुळे भारत व परदेशात धर्माचा प्रसार झाला.

## ४.१३ बौध्द धर्माच्या ऱ्हासाची कारणे (CAUSES OF THE DELLINE OF BUDDHISM)

भारतात ६ व्या शतकात बौध्दधर्माचा उदय झाला. त्याच्या प्रसाराची प्रक्रिया ही १३ व्या शतकापर्यंत सुरुच होती. भारताबरोबर जगातही धर्माचा प्रसार व लोकप्रियता मोठी होती. या धर्माच्या ऱ्हासाला विविध कारणे होती ती पुढीलप्रमाणे.

**१) राजाश्रयाचा अभाव** - मौर्यकाळात बौध्दधर्माला राजाश्रय प्राप्त झाल्याने त्याचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला. शुंग, गुप्त वाकाटक आणि त्यांचे समकालीन राजांनी शैव, वैष्णव इ. पंथाचा स्विकार करुन हिंदुधर्माचा पुरस्कार केला. हर्षवर्धन व पाल राजा शिवाय इतर कोणीही बौध्दधर्माला उत्तेजन दिले नाही. त्यामुळे बौध्दधर्माचा ऱ्हास झाला.

**२) बौध्द धर्माच्या पंथातील मतभेद** - बौध्दधर्माची शिकवण साधी व सोपी असल्याने प्रसार झाला. धर्मातील आचार, तत्वज्ञान यावरुन मतभेद झाले. अनेक पंथ निर्माण झाले. त्यांच्यात वाद निर्माण होऊन त्यांची सर्वशक्ती खर्च झाली. महायान व हिनायान पंथाच्या वादामुळे ऱ्हासाला प्रारंभ झाला.

**३) वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन** - बौध्द धर्माचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाल्याने वैदिक धर्माच्या विचारवंत व तत्ववेत्यांनी धर्माचे परीक्षण केले. त्यांनी जुन्या वैदिक धर्माचा कायापालट करुन अधिक सोपा, आकर्षक व सर्व संग्राहक बनवला. इ.स.८ व्या शतकात कुमारिलभट्ट व आद्य शंकराचार्य यांनी उदार दृष्टिकोन स्विकारुन वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन केले. त्यामुळे बौध्द धर्माची पिछेहाट सुरु झाली.

**४) बौध्द संघ अंतर्गत भ्रष्ट** - प्रारंभीच्या काळात बौध्द संघ व भिक्षू विषयी अत्यंत आदर होता. **शाक्त पंथाच्या** सहवासाने संघात स्त्रियांना प्रवेश मिळाला. संघात वामाचार सुरु झाला. संघाला अनेकांकडून विपूल देणग्या मिळाल्या, त्यामुळे आळशी स्त्रीसंग विषयासक्त, व्यसनी जीवन बनले. अंतर्गत भ्रष्टतेमुळे धर्माचा ऱ्हास सुरु झाला.

**५) प्रभावी प्रचारकांचा अभाव** – गौतम बुध्दाच्या मृत्यूनंतर त्यांच्या तोडीचा एकही प्रचारक झाला नाही. पूर्वीच्या नियमामध्ये शिथिलता आणण्याच्या विचारावरुन मतभेद सुरु झाले. ते मतभेद दूर करुन सर्वांना एकत्र आणण्याचे प्रभावी कार्य कोणीच केले नाही. धर्मप्रसाराचे प्रभावी कार्य करण्यासंदर्भात मार्गदर्शन ही केले नाही.

**६) परकीय आक्रमण** - इ.स ६ व्या शतकापासून भारतात हुण, अरब, तुर्क यांनी उत्तर भारतात आक्रमणे केली. त्यांनी अनेक बौध्द भिक्षूंना ठार मारले त्यांचे विहार, स्तूप नष्ट केले. त्यामुळे बौध्दधर्माचा नाश ओढवला.

**७) बौध्द धर्माच्या मुळ तत्वात बदल** – बौध्द धर्माच्या प्रसाराच्या हेतूने महायान पंथाने मुळ तत्वात बदल केला. संस्कृत भाषा, मूर्तिपूजा, मंत्रतंत्र, श्रध्दा व भक्ति यांचा स्विकार केल्याने तो

भक्तिपंथाच्या जवळचा बनला. महायान व वैष्णवपंथ यांच्यात फरक नाहीसा झाला. त्यामुळे बौध्दधर्माचे स्वतंत्र अस्तित्व नष्ट होऊन तो हिंदूधर्माचा एक गट आहे अशी सामान्यांची धारणा झाली.

**८) बौध्दधर्मात निर्माण झालेले दोष** - गौतम बुध्दाच्या नंतर धर्माचे साधे स्वरुप नष्ट होऊन त्यात क्लिष्टता आली. बौध्द धर्मात ईश्वरी सत्तेविषयी निश्चित कल्पना नसल्यामुळे सामान्य जनता धर्मापासून दूर जाऊ लागली.

**९) दुःखाचे तत्वज्ञान** - गौतम बुध्दाने आपल्या तत्वज्ञानात दुःखाविषयी विचार मांडला. जीवनात सर्वत्र दुःख आहे. सुखाचा लवलेश नाही. असा आभास उत्पन्न झाला. दुःखमय तत्वज्ञान दिर्घकाळ समाजाला मानवले नाही. जीवनात दुःख असले तरीही त्याच्यावर मात करुन सुखाचा मार्ग शोधला पाहिजे. असा विचार लोकांच्या समोर उदयाला आला. त्यामुळे बौध्द धर्माच्या ऱ्हासाला प्रारंभ झाला.

**आपली प्रगती तपासा**

१. बौध्द धर्माच्या ऱ्हासाची कारणे सांगा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ४.१४ बौध्द धर्माचा भारतीय संस्कृतीवरील परिणाम (CAUSES OF THE DELLINE OF BUDDHISM)

भारतीय लोकांच्यावर बौद्धधर्माचा दिर्घकाळापासून प्रभाव होता. तत्कालीन राजकीय, सामाजिक, धार्मिक, साहित्य व स्थापत्य इ. क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात बौद्ध धर्माचा प्रभाव होता.

**१) राजकीय क्षेत्रातील परिणाम** - प्राचीन काळात सम्राट अशोक, कनिष्क आणि हर्षवर्धन यासारख्या थोर सम्राटांनी बौद्धधर्माचा स्विकार केला. बौद्ध धर्माच्या सिद्धांतानुसार त्यांनी राज्यकारभार केला. लोकांच्या मनात अहिंसेबद्दल प्रेम निर्माण केले. अहिंसा, शांती व मानवी कल्याण हा संदेश राजकीय क्षेत्राला बौद्ध धर्माने दिला. अशोक, कनिष्क, हर्षवर्धन यांनी बौद्ध धर्म परिषदा आयोजित केल्या. आज स्वतंत्र भारताचा राज्यकारभार व राजनिती बौद्ध तत्वाच्या आधारेच सुरु आहे.

munotes.in

**२) सामाजिक क्षेत्रातील परिणाम** - बौद्ध धर्माच्या उदयापूर्वी वैदिक धर्माचा प्रभाव समाजात होता. त्यामध्ये रुढी, परंपरा, अंधश्रद्धा, यज्ञ, जातिप्रथेचे प्राबल्य होते. भारतीय समाजाला सर्वप्रथम समानतेचा संदेश बौद्ध धर्माने दिला, बौद्ध संघात सर्व जाती, धर्मातील स्त्री-पुरुष यांना प्रवेश दिला. समाजात समानता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. बौद्ध संघामध्ये सर्वांना सर्व प्रकारचे स्वातंत्र्य दिले होते. सर्व धर्म समावेशकतेचे व समानतेचे तत्व स्विकारुन लोकशाहीची बीजे रोवली. अहिंसा, सत्य, सदाचार, दुःख, शांती, क्षमा, संयम, लोकहित इ. आदर्श लोकांपुढे ठेवून भारतीयांची नैतिक पातळी उंचावण्याला मदत केली.

**३) भारतीय संस्कृतीचा परदेशात प्रसार** - भारतीय संस्कृतीचा प्रसार बौद्ध धर्माने जगात केला. बौद्ध भिक्षू आणि सम्राट अशोक यांनी धर्माचा परदेशात प्रसार केला. सुमात्रा, जावा, सयाम, चीन, जपान, इंडोचायना, ब्रह्मदेश इ. देशात भारतीय संस्कृतीचा प्रसार झाला. त्यामुळे त्यांचे मैत्रीचे संबंध भारताबरोबर निर्माण झाले. आंतरराष्ट्रीय जगात प्रेम शांतता, सुख, सहचर्य इ. गुणाची वाढ होण्यास बौद्धधर्माचे मोलाचे कार्य आहे.

**४) धार्मिक क्षेत्रातील परिणाम** - वैदिक धर्माच्या कट्टरते विरोधात बौद्ध धर्माचा उदय झाला. वैदिक धर्मातील कर्मकांड, यज्ञ आणि सामान्य लोकांना न समजणारे धर्म सिद्धांत होते. याउलट बौद्ध धर्माने साधे सोपे व सरळ तत्त्वज्ञान लोकांच्या समोर मांडले. महायान पंथाने गौतम बुद्धाला ईश्वरी अवतार मानून त्याची मूर्ती बनवण्याची परंपरा सुरु केली. त्यांची पूजा ही सुरु केली. परमेश्वराच्या आराधनेमध्ये नवी पद्धत सुरु झाली. ती म्हणजे मंदिर, मठ, विहार या धार्मिक स्थळांची निर्मिती झाली. वैदिक धर्मामध्ये यज्ञाला महत्व असल्याने ब्राह्मण, पुरोहित वर्गात महत्व वाढले. ते जनतेचे आर्थिक शोषण करत असे. बौद्ध धर्माने त्यांचे समाजातील उच्चस्थान नष्ट केले व सदाचार, शांती सुखी जीवन जगण्याची प्रेरणा दिली. धार्मिक शिक्षणाचे महत्व ओळखून नालंदा विद्यापीठाची स्थापना केली. धर्मप्रसाराचे माध्यम म्हणून प्रश्नोत्तर व संवाद शैलीचा उपयोग बौद्धधर्माने केला. सर्व प्रथम धार्मिक संघाची स्थापना बौद्धधर्माने केली. त्याचे अनुकरण इतर धर्माने ही केले. वैदिक धर्मात संन्यासी व धर्मपालक व्यक्ती एकान्त, चिंतन यासाठी वनाला महत्व देत होते. बौद्ध धर्माने धार्मिक संघाला महत्व दिले.

**५) बौद्ध धर्माचा कला क्षेत्रातील परिणाम** - गौतम बुद्धाचा संदेश लोकांच्यापर्यंत पोहचवण्याच्या हेतूने अनेक स्तंभाची निर्मिती करण्यात आली. बौद्ध भिक्षंच्या निवासासाठी, अध्यापन, चिंतन यासाठी जी वस्तीस्थाने निर्माण केली त्यास **विहार** असे म्हणतात. गौतम बुद्ध व महत्त्वाचे साधू यांच्या अस्थिवर स्मारक बांधले म्हणजे स्तूप होय. कुशिनगर, राजगृह, पावा, वैशाली, कपिलवस्तू इ. ठिकाणी गौतम बुद्धाच्या अस्थिवर स्तूप बांधल्याचा उल्लेख आहे. सांची व भारहुत, अमरावती येथील स्तूप कलेसाठी प्रसिद्ध आहेत. अशोकाने सारनाथ, कनिष्काने पुरुषपुर येथील स्तूप बांधला असावा. पुरुषपुरु हा गांधार शैलीचा उत्कृष्ट नमुना आहे.

धार्मिक मूर्ती निर्माण करण्याची परंपरा सर्वप्रथम बौद्ध धर्माने सुरु केली. पाषाणाच्या, ब्राँझच्या अनेक मूर्ती भारतात व शेजारील देशात तयार करण्यात आल्या. गौतम बुद्ध व बोधिसत्वांच्या मूर्ती बनवल्या होत्या. सांची, भारहूत, गया, नागार्जून कोंडा व अमरावती येथे कलापूर्ण मूर्ती आहेत. सारनाथ येथील गुप्तकालीन बुद्धमूर्ती भारतीय मूर्तिकलेचे प्रतिक होय. बौद्ध भिक्षूंच्या तपस्येसाठी, ध्यानधारणेसाठी गुहा तयार केल्या जात त्यांना चैत्य म्हणतात. चैत्य कोरण्याचे कार्य दूसऱ्या शतकापासून सुरु आहे. पर्वत कोरुन कलाकृती निर्माण करणे त्याला

लेणी म्हणतात. लेणीमधून गौतम बुद्धाच्या जीवनातील प्रसंग केरले आहेत. अजिंठा, वेरुळ, कार्ले, भाजे, एलिफंटा इ. लेण्या प्रसिद्ध आहेत.

चित्रकलेवर ही बौद्ध धर्माचा प्रभाव होता. पर्वत गुहा, मंदिराच्या भिंती यामधून चित्रकला आढळते. अजिंठा, वेरुळ, बाघ इ. गुंफा चित्रकलेसाठी प्रसिद्ध आहेत. बुद्धाचे जीवन, त्याचा धर्म, धर्मप्रसार आणि तत्कालीन समाज व राजकीय परिस्थितीचे चित्रे कोरलेली आहेत.

**६) साहित्य क्षेत्रातील वरील परिणाम -** बौद्धधर्माच्या तत्वज्ञानावर अनेक ग्रंथरचना झाली त्यामुळे वाङ्मय क्षेत्रातही बौद्धधर्माचे मोठे योगदान आहे. बौद्धधर्मातील त्रिपिटकाची रचना पाली भाषेत आहे. आनंद व उपाली यांनी विनयपिटक व सुत्तपिटक हे दोन भाग तयार केले. विनयपिटकात भिक्षूच्या आचाराचे नियम व तत्कालीन सामाजिक जीवनाची माहिती मिळते. सुत्तपिटकात गौतम बुद्धाची प्रवचने आहेत. धम्मपद हा नितिग्रंथ मानला जातो. अभिधम्मपिटकात बौद्धतत्वज्ञानाचा संग्रह आहे. व्याकरण व तर्कशास्त्राच्या संबंधी ग्रंथाची रचना सर्वप्रथम बौद्ध विद्वानांनी केली. जयादित्य व जितेंद्र यांनी व्याकरण शास्त्राच्या विकासामध्ये महत्त्वाचे योगदान दिले. नागार्जूनने शुन्यवाद सिद्धांत मांडला. चंद्रगोमिनचे व्याकरण अमरसिहांचे अमरकोश, हर्षवधनाचे नागनंद इ. महत्त्वाचे साहित्य आहे. जातक कथा हे बुद्धाच्या पूर्वजन्मीच्या काल्पनिक कथा आहेत. महायान पंथाने संस्कृत भाषेत ग्रंथ निर्मिती केली. सिंहली, तिबेटी भाषेतही मोठ्या प्रमाणात ग्रंथ आहे. श्रीलंका, ब्रह्मदेश, सयाम मधील बौद्ध त्रिपटकांना आपले धर्मग्रंथ मानतात.

**आपली प्रगती तपासा.**

१) बौध्द धर्माचा भारतीय संस्कृतीवर काय परिणाम झाला ते सांगा.

______________________________________________________

______________________________________________________

______________________________________________________

______________________________________________________

______________________________________________________

## ४.१५ पर्शियन आक्रमणे

### ४.१५.१ पर्शियन आक्रमणे :

**१) पर्शियन/इराणी साम्राज्याचा संस्थापक - कुरुष/सीरस/सायरस** - इ.स.पूर्व ५५८ ते ५३० भारतामध्ये मगध साम्राज्याचा उदय झाला. त्यावेळी पर्शिया/पारसी/इराण मध्ये **हखमनी** या नवीन वंशाचा उदय झाला. या वंशाचा **पहिला राजा सायरस** याने अखमनोशीय/अकमेनियन/एकेमेनियन साम्राज्याची स्थापना केली. त्याच्या समकालीन शासकांनी त्याचा **'महान'** या शब्दात उल्लेख केला. त्याने इ.स.पूर्व. ५५८ ते इ.स. पूर्व ५३० या काळात राज्य केले. **हेरोडोटस, कैसियस, जैनोफोन, स्ट्रेबो, ऐरियन** यांच्या लेखनातून त्याच्या विषयी माहिती मिळते. सायरस याने बॅक्ट्रिया, आशिया, मायनर, मेडिया, बॅबिलोनिया, ॲसीरिया लिडिया, सीरिया या राज्यांचा प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली आणला. **प्लिनीच्या मते** त्याने

पूर्वेकडील स्वारीत वायव्य सरहद्द प्रांताचा काही भाग आणि गांधार देश जिंकला असावा. या स्वारीत **कापिशी** नगरीचा विध्वंस केला. या वेळी गांधार राजा **पुक्कुसाति** याने प्रतिकार केला असावा. त्यामुळे पूर्व गांधार जिंकता आले नाही. याचवेळी **पुक्कुसातिने** बिंबिसारकडे मदतीची याचना केली होती. **प्लिनीच्या मते** सायरस भारतावरील पहिले पर्शियन आक्रमण होय. **क्टेशियास** या **इतिहासकाराच्या मते** या युध्दात एका भारतीय योध्याच्या हातून सायरस मारला. **झेनोफेनच्या** मते एका भारतीय राजाने त्याच्या दरबारी आपला वकील पाठवून त्याला खंडणी दिली. **एरियनच्या विवरणानुसार** अष्टक व अश्वक या राज्यावर त्याने वर्चस्व स्थापन केले. दारयवोष/दारीयसच्या बेहिस्तून शिलालेखात त्याच्या साम्राज्यातील २३ प्रांतामध्ये गांधार प्रांताचा उल्लेख आहे. डॉ. मजुमदारने बौध्द ग्रंथाच्या आधारे मत मांडले की, कुरुषच्यावेळी गांधार दोन भागात विभागले होते. तक्षशिलेचा राजा पुक्कुसाति होता आणि पश्चिम गांधार मध्ये अश्वक व अष्टक होते कदाचित पश्चिम गांधार कुरुषच्या नियंत्रणाखाली असावा.

**२) दारियस/दारयवोष पहिला (इ.स.पूर्व ५२२ - इ.स.पूर्व ४८६)** - सायरस नंतर पर्शियाचा राजा त्याचा मुलगा **कांबीसेस** हा झाला. त्याच्या काळात भारतावर आक्रमण झाले नाही. कांबीसेस नंतर त्याचा मुलगा दारियस पहिला सत्तेवर आला. तो अतिशय महत्वाकांक्षी होता. **पर्सेपोलिस बेहिस्तून, नक्शे-रुस्तम** शिलालेखातून त्याच्याविषयी माहिती मिळते. **बेहिस्तून** (इ.स.५१९) **शिलालेखावरुन** कंबोज, पश्चिम गांधार, सिंध प्रदेशावर आक्रमण करुन तो प्रदेश साम्राज्याला जोडल्याचे दिसून येते**. पर्सेपोलिस** (इ.स.पूर्व ५१६) नक्शे-रुस्तम (इ.स.पूर्व ५१५) येथील शिलालेखात हिंदूचा उल्लेख आहे. हिरोडोटस या ग्रीक इतिहासकाराच्या लिखाणावरुन असे दिसते की, सिंधू नदीचे खोरे व राजपुतान्यातील काही वाळवंटी प्रदेश मिळून त्याच्या साम्राज्याचा २० वा प्रांत होता. सिंधू प्रांतातून दरवर्षी १० हजारापेक्षा जास्त स्टलींग पौंड किमतीचे सोने मिळत असे. इ.स.पूर्व ५१७ मध्ये **स्कायलैक्सच्या** अधिपत्याखाली सिंधू नदीच्या खोऱ्यात नाविकदल पाठविले होते. **पंजाबी-सिंधी** सैनिकही पर्शियन सैन्यात होते. इराणी राज्यात भारतीय सैन्याला अतिशय महत्व होते.

**३) क्षयार्ष/झरसीस/जर्गजीज - (इ.स.पूर्व ४८६ ते इ.स. पूर्व ४६५)** - दारियसनंतर त्याचा मुलगा **झरसीस** सत्तेवर आला. त्याने ग्रीक देशावर स्वारी केली. यावेळी त्याच्या सैन्यात **भारतीय सैन्याची** एक तुकडी होती. भारतीयांनी युरोपच्या भूमीवर लढलेले हे **पहिलेच युध्द** होते. या सैनिकांचा तत्कालीन शिलालेखात **गांधारियन** (गंधारवासी) आणि **भारतीय** (सिंधू नदीच्या पूर्वेकडे प्रांत) असा उल्लेख केलेला आहे.

**४) भारतातील पर्शियन सत्तेचा शेवट** - दारियस/डॅरीयसनंतर क्षयार्ष, दुसरा दारियस, तिसरा दारियस सत्तेवर आला. **तिसरा दारियसच्या** काळात इ.स.पूर्व ३३१ मध्ये अलेक्झांडरने भारतावर स्वारी केली. **अरवेलच्या लढाईत** इराणीचा पराभव करुन, सर्व साम्राज्य जिंकून घेतले. त्यामुळे इराणी सत्तेचा शेवट होऊन ग्रीक सत्ता भारतात स्थापन झाली. **बाल्टीक देशाच्या क्षत्रपाच्या** नेतृत्वाखाली भारतीय सैन्याच्या एका तुकडीने दारियसच्यावतीने अलेक्झांडरशी निकराचा लढा दिला होता.

### ४.१५.२ पर्शियन आक्रमणाचे परिणाम :

पर्शियन/ इराण च्या वर्चस्वाखाली भारताचा काही प्रदेश होता. विशाल इराणी साम्राज्यामुळे भारताचा पश्चिम जगताशी संबंध/ दळणवळण सुरु झाले.

- **सांस्कृतिक देवाण-घेवाण -** परस्परांच्या सामाजिक रुढी, परंपरा, धार्मिक आचारविचार, तत्वज्ञान याची देवाण-घेवाण झाली. राजदरबाराबाबतचे रीतिरिवाज, समारंभ विषयक प्रथा, दरबारात खास प्रसंगी अग्नी ठेवणे, स्त्री शरीरसंरक्षकांची योजना इ.चंद्रगुप्ताने स्विकार केला. आलेख लेखनाची कला इराणपासून घेतली. अशोकाच्या स्तंभावर सिंह, बैल, इतर प्राण्यांचे शिल्प हा इराणी **प्रभावाचा परिणाम** होय. मौयाचे लाकडी राजवाडे व अशोक काळातील कला यावर इराणी प्रभावाचा परिणाम होय.

- **युध्दशास्त्र व युध्दतंत्र** - पंजाब, सिंध मधील लोकांचे दारियसने सैन्यदल निर्माण केले. त्यांनी प्रथम युरोपच्या भूमीवर ग्रीकांविरुध्द लढाईत भाग घेतला होता. इराण युध्दतंत्राची ओळख भारतीयांना झाली. **मौर्यकाळात इराणी सैन्य** पध्दतीचा स्विकार केला.

- भारताच्या आंतरराष्ट्रीय/ विदेशी व्यापाराला मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन मिळाले.

- तत्कालिन बरेच व्यापारी समुद्रीमार्गाने पश्चिमेकडील देशांमध्ये येणे-जाणे सुरु झाले. त्यांच्या व्यापारी वस्तू/ मिश्र व युनान पर्यंत जाऊ लागला.

- पर्शियन/ इराणी लोकांच्या संपर्कामुळे एक महत्वपूर्ण परिणाम झाला. तो म्हणजे पश्चिम भारतामध्ये 'खरोष्टी' लिपीचा प्रसार झाला.

- इतिहासकारांच्या मते पर्शियाच्या वर्चस्वाखालील भारतीय प्रदेशात 'अरमाईक' लिपी प्रचारात आली. या कारणामुळे नंतर या प्रदेशात उजवीकडून डावीकडे लिहिल्या जाणाऱ्या खरोष्टी लिपीचा विकास झाला.

- पर्शियन/इराणी राजांनी साम्राज्याची विभागणी प्रांतामध्ये केली होती. या प्रांतांना 'क्षबपी' आणि प्रांतांधिकाऱ्याला 'क्षत्रप' म्हटले जात असे. मौर्य काळातसुद्धा साम्राज्य प्रांतामध्ये विभक्त करण्यांची पद्धत चालू राहिली. उत्तर-पश्चिम भारतामध्ये 'क्षत्रप' शब्द खूप प्रचलित राहिला आहे.

- प्राचीन भारताच्या इतिहासामध्ये उज्जैन व मथुरा येथील दोन्ही क्षत्रप वंशाचे स्थान महत्वपूर्ण आहे. त्यांनी भारतातील राजकिय व सांस्कृतिक क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे.

**आपली प्रगती तपासा**

१. पर्शियन /इराणी आक्रमणाचे परिणाम सांगा.

**४.१५.३ ग्रीक आक्रमणे :**

ग्रीक लोक प्रारंभी टोळ्यांच्या स्वरुपात भटकत होते. इ.स.पूर्व १८०० ते इ.स.पूर्व १२०० च्या काळात आपल्या वसाहती ग्रीकमध्ये स्थापन केल्या. ग्रीकला पूर्वी हेलास असे म्हणत आणि ग्रीक स्वतःला **हेलेन्स** म्हणवीत. स्वतःला ते श्रेष्ठ व इतरांना रानटी समजत. ग्रीक कवी **होमरच्या 'इलियट' व ओडेशी** या दोन महाकाव्यातून ग्रीक संस्कृतीची माहिती मिळते. इ.स.पूर्व ५ व्या शतकात स्वतंत्र नगरराज्य स्थापन झाले. प्रथम स्पार्टा व अथेन्स ही दोन नगरराज्य उदयास आली. या दोन राज्यात तीन युध्द झाली. **स्पार्टाने** इ.स.पूर्व ४०५ च्या ॲगॉसपोट्यानीच्या युध्दात अथेन्सचा पराभव केला. या विजयामुळे स्पार्टाची सर्व ग्रीक राज्याचे नेतृत्व करण्याची महत्वाकांक्षा वाढली. ॲरगॉस, कॉरिन्थ, अथेन्स, थिब्ज ही राज्ये संयुक्तपणे स्पार्टावर चालून गेली. स्पार्टा व थिब्ज यांच्या संघर्षात स्पार्टाचा पराभव इ.स.पूर्व ३७१ मध्ये झाला. त्यामुळे ग्रीकचे **नेतृत्व थिब्जकडे** आले. याच काळात मॅसिडोनियाच्या प्रदेशावर **फिलिप दुसरा राजा** असून तो शूर सेनापती, मुत्सद्दी व कर्तबगार होता. त्याने इ.स.पूर्व ३३४ मध्ये ग्रीकांवर आक्रमण करुन, आपले वर्चस्व स्थापन केले. फिलिपने नगरराज्यांना अंतर्गत स्वातंत्र्य व शांतता यांची हमी दिली. इ.स.पूर्व ३३६ मध्ये एका समारंभात त्याचा खून झाला. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा **अलेक्झांडर ऊर्फ सिकंदर** हा मॅसिडोनियाचा राजा झाला. त्याने भारतावर आक्रमण केले. त्यामुळे भारत-ग्रीक संबंध आले.

**१) अलेक्झांडर ऊर्फ सिकंदरचा पूर्व वृत्तान्त - इ.स.पूर्व ३३६ ते इ.स.पूर्व ३२३ –**

ग्रीकच्या उत्तरेला असलेल्या बलाढ्य मॅसिडोनिया राज्यात, राजा दुसरा फिलीप याचा मुलगा अलेक्झांडर याचा जन्म इ.स.पूर्व ३५६ मध्ये झाला. सुप्रसिध्द तत्ववेत्ता ॲरिस्टॉटल हा अलेक्झांडरचा गुरु होता. परंतु त्याच्या मनावर, विचारावर ॲरिस्टॉटलचा फार प्रभाव पडला नाही. तत्वज्ञान, साहित्य यापेक्षा युध्दशास्त्राकडे अधिक ओढ त्याची होती. लहानपणापासून सेनापतीची जबाबदारी, भविष्यात प्रबळ व विस्तारित साम्राज्य निर्माण करणे, हे त्याचे ध्येय होते. वडिल राजा दुसरा फिलिप याचा खून झाल्याने वयाच्या विसाव्या वर्षी इ.स.पूर्व ३३६ मध्ये साम्राज्याचा प्रमुख बनवला. याच वेळी त्याच्या विरुध्द निरनिराळ्या ग्रीक संस्थांनी बंड केले. ते कठोरपणे मोडून काढले. यासाठी ३० हजार पायदळ, ५ हजार घोडदळ निर्माण केले. त्याची **जग जिंकण्याची महत्वाकांक्षा** होती. त्याने इराणच्या सत्तेवर असलेल्या तिसरा दारियस याच्यावर आक्रमण केले. इ.स.पूर्व ३३१ मध्ये अरबेलच्या युध्दात पराभव केला. त्याची राजधानी पर्सेपोलिस जाळून नष्ट केली. यानंतर त्याने आशिया मायनर, सिरिया, इजिप्त पॅलेस्टाईन, मेसोपोटेमिया, पर्शियन, बॅक्टेरिया इ प्रदेशाचा मालक बनला. अफगाणिस्तान प्रदेशात **अलेक्झांड्रिया** हे शहर बसविले आज हे शहर **कंदहार नावाने** प्रसिध्द आहे. यानंतर त्याने **'इराणचा महान सम्राट'** ही पदवी धारण केली. यानंतर त्याने आपले लक्ष भारताकडे वळविले.

**२) अलेक्झांडरच्या आक्रमणाच्या वेळची भारताची राजकीय परिस्थिती** - अलेक्झांडरच्या स्वारी वेळी भारताची राजकीय परिस्थिती मोठी शोचनीय होती. वायव्य भारतात सुमारे लहान **मोठी १५० राज्ये** होती. ती सर्व स्वतंत्र असून त्यात प्रजासत्ताक श्रेष्ठजनसत्ताक, राजसत्ताक स्वरुपाची होती. त्यांच्यात सतत संघर्ष होत असे. त्याचा फायदा अलेक्झांडरला झाला. यावेळी काही महत्वाची राज्य होती. ती म्हणजे **काबूल नदीच्या** उत्तरेकडील डोंगराळ प्रदेशात **अश्वक व अश्वकायन** राज्य असून **मसाक/मशकावती** राजधानी होती. **गांधार प्रदेशात** सिंधू नदीच्या पश्चिमेला खैबर खिंडीच्या तोंडाशी **हस्ती राज्य** असून **पुष्कलावती**

राजधानी होती. **सिंधू व झेलम** नद्यांच्या परिसरात तक्षशिला राज्य असून **अंभी राजा** होता. त्याचे पोरस हा शत्रू असल्याने **अंभीने अलेक्झांडरला** आमंत्रण दिले. **झेलम व चिनाब** नद्याच्या दुआबात व तक्षशिलेच्या पूर्वेस **पुरु राज्य** असून **पोरस** राजा होता. तो अत्यंत स्वाभिमानी होता. तक्षशिलेच्या उत्तरेस **अभिसाराचे** राज्य होते. पंजकोर नदीच्या खोऱ्यात गौर/गुरोईन राज्य होते. **रावी व व्यास** नद्यांमध्ये **कढ/कथेवाई** राज्य असून **संगाला** ही राजधानी होती. **चिनाब व झेलम** या नद्यांच्या संगमाच्या प्रदेशात **शुद्रकाचे** राज्य होते. रावी नदीच्या मुखाकडे मालव राज्य होते. चिनाब नदीच्या पश्चिम भागात ग्लागनीकाम राज्य होते. चिनाब व झेलम नद्यांच्या मधल्या भागात **सीओई** राज्य होते. **चिनाब व रावी** प्रदेशात **शिबी** राज्य असून त्याच्या दक्षिणेला **अग्रश्रेणी, मालव** त्यापलिकडे कंठ व शुद्रक राज्ये होती.

**३) अलेक्झांडरची भारतावरील स्वारी** –

**१) पहाडी प्रदेशावर वर्चस्व** - इ.स.पूर्व ३२७ च्या मे महिन्यामध्ये हिंदुकुश ओलांडून काबूल नदीच्या खोऱ्यात आला. **निकाय** येथून आपल्या सैन्याचे दोन गट केले. एका गटाचे नेतृत्व स्वतः **अलेक्झांडरने** केले तर दुसऱ्या गटाचे नेतृत्व **हेफिस्तियन व पेरीडाफस** या सेनापतीकडे दिले. त्यांनी काबूल नदीच्या उत्तर काठावरुन खैबर खिंडीतून सिंधू नदीच्या रोखाने वाटचाल करु लागला. **तक्षशिलचा राजा अंभीच्या** मदतीने पेशावरच्या प्रदेशात पोहचले. सिकंदर स्वतः डोंगराळ प्रदेशातून प्रवास करत काबूल, पंजकोर नद्यांच्या प्रदेशातील पर्वतीय गणराज्यावर विजय प्राप्त केला. अलेक्झांडर विरोधी **सर्वप्रथम हस्ती/अत्ती राज्याने** आघाडी उभारली. हस्त येथील हस्तीक जमातीचा राजा **हस्तक** याने प्रचंड विरोध केला. परंतु ठार झाला. यानंतर **आश्वक** राज्यावर चाल केली. येथे मोठे युध्द झाले. अलेक्झांडरने ४० हजार लोकांना कैद केले. २ लाख ३० हजार बैल पकडले. यानंतर **अश्वकायन** राज्यावर हल्ला केला. **मसकावती** नदीच्या काठी **मस्सग** हा अभेदी किल्ला होता. ३० हजार घोडदळ, ३५ हजार पायदळ, ३० हत्ती, ७ हजार भाडोत्री सैन्य होते. **राणी क्लिओर्फिसच्या नेतृत्वाखाली** अश्वकायननी अलेक्झांडरशी संघर्ष केला परंतु पराभव झाला. ग्रीक इतिहासकार अलेक्झांडरचा हा विजय **भारतातील पहिला मोठा विजय** म्हणून गौरवतात. यानंतर अलेक्झांडरने और्नस, ओश किंवा दिती, बजीरा इ प्रदेश जिंकला. ग्रीकांच्या दोन्ही गटाचे सैन्य **ओहिंद** येथे एकत्र झाले. **ओहिंद** या ठिकाणी पूल बांधून सिंधू नदी ओलांडली. आणि सिंधू नदीच्या खोऱ्यात प्रवेश केला.

**२) देशद्रोही तक्षशिलचा अंभी राजा** - अलेक्झांडरने पहाडी प्रदेशावर वर्चस्व स्थापन केले. इ.स.पू ३२६ च्या उन्हाळ्यात ओहिदंजवळ सिंधू नदी ओलांडून भारताच्या भूमीवर पाऊल ठेवले. खैबरमार्गे तो तक्षशिलेच्या राज्यात घुसला. तक्षशिलेच्या अंभी राजाने त्याचे स्वागत केले. अलेक्झांडरने तक्षशिला येथे भव्य दरबार भरवून आपल्या ऐश्वर्याचे व शक्तीचे प्रदर्शन केले. अनेक लहान-मोठया राजांनी मांडलिकत्व स्विकारून अलेक्झांडरची अधिसत्ता मान्य केली. तसेच नजराणेही स्विकारले. पंरतु **झेलम व चिनाब** या दोन नद्यांच्या मध्ये **पोरसचे** राज्य होते. त्याने ग्रीकांपुढे शरणागती स्विकारण्यास नकार दिला.

**३) झेलम नदी काठावरील कारी मैदानावरील युध्द** - अनेक राजे अलेक्झांडरला शरण गेल्याने पोरस दु:खी झाला.त्याचा मित्र अभिसार यानेही दगा दिला. अलेक्झांडरने पोरसला बोलणी करण्यासाठी बोलवले त्यावेळी पोरसने कळवले की "मी केवळ एक सार्वभौम राजा म्हणून बरोबरीच्या नात्याने अलेक्झांडरने मला सीमेवर भेटावे". त्यामुळे उभय पक्षानी युध्दाची तयारी केली. यावेळी पावसाळा असूनही, झेलम नदी पार करुन पोरसवर हल्ला करण्याचे ठरवले. अलेक्झांडर आपल्या अफाट सैन्यानिशी पश्चिम तीरावर तळ देऊन बसला. नदीच्या पुरामुळे दोन महिने वाट पाहिली. आपल्या तळाच्या उत्तरेस सतरा मैलावर प्रवाहातील एका बेटाच्या आश्रयाने निवडक सैन्यासह नदीपार केली. यावेळी त्याच्या बरोबर ११हजार सैनिक व घोडदळ होते. पोरसला माहिती मिळताच आपल्या मुलाजवळ दोन हजार सैन्य व १२० रथ देऊन पाठवले. पंरतु ग्रीकांच्या पुढे निभाव लागला नाही. या युध्दात मुलगा ठार झाला. त्यानंतर पोरसने लढण्याचा निश्चिय केला. २० हजार पायदळ, चार हजार घोडदळ, तीनशे रथ व दोनशे हत्ती ऐवढे सैन्य पोरसजवळ होते, **असे एरियन सांगतो**. झेलमकाठी **कारीच्या मैदानावर** ग्रीक व भारतीय सैन्याचे घनघोर युध्द झाले. रात्रीच्या पावसामुळे जमीन घसरटी झाली. असल्याने, मोठाली धनुष्ये वापरता आले नाहीत. चिखलामध्ये रथाची चाके रुतली. त्यामुळे पोरसचा पराभव झाला. या युध्दात पोरसचे दोन मुले ठार झाली. स्वत: जखमी झाला. पोरसला युध्द कैदी म्हणून अलेक्झांडर समोर उभे केले. त्याला कशा प्रकारची वागणूक हवी असे अलेक्झांडरने विचारले, **तेव्हा पोरसने उत्तर दिले** की,"आपल्याला राजासारखे वागवावे. अलेक्झांडर त्याच्यावर संतुष्ट होऊन पोरसला सोडून दिले व त्याचे राज्यही परत देऊन त्याच्याशी मैत्रीचे संबंध जोडले. तसेच पूर्वेकडील पंधरा संघराज्ये त्यास जोडले.

**४) अलेक्झांडरचे इतर विजय :-** कंदाहारच्या हिंदू राजाने बंड केले. अश्वकांनी त्यांचा **सत्रप निकेनरला** ठार मारले. याच वेळी इराणमधून आशियन फौजेची मदत मिळाली. त्यामुळे परिस्थितीवर नियंत्रण ठेवता आले. त्यानंतर त्याने रावीच्या काठावरील कठ लोकाच्या संघराज्यावर हल्ला चढवला. १७ हजार कठ सैनिक ठार झाले. ७हजार युध्द कैदी झाले. या युध्दात पोरसने मदत केली होती. म्हणून हे राज्यही पोरसला देण्यात आले. त्यानंतर सॅहुनी व भगल या दोन राजांचा पराभव करुन बियास नदीच्या तीरावर येऊन पोहचला.

**५) अलेक्झांडरचा परतीचा प्रवास व मृत्यू :-** सतत युध्दामुळे सैन्य थकले होते. त्यामुळे सैन्यात बंडाळी सुरु झाली. पूर्वेकडे नंदाचे अतिबलाढय राज्य असल्याने त्याच्यावर आक्रमण न करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे त्याने परत फिरण्याचा निर्णय घेतला. बियास व झेलम या दोन नद्यांनमधील प्रदेश **पोरसच्या स्वाधीन** केला. झेलमच्या पश्चिमेकडील भाग आंभी राजाला दिला. अभिसरला काश्मिरचे राज्य दिले. इ.स.पू ३२६ मध्ये झेलम व चिनाब संगमावर आला. त्यावेळी मालव व क्षुद्रक यांच्याबरोबर संघर्ष झाला. त्यामध्ये अलेक्झांडर जखमी झाला. त्यामुळे सैनिकांनी मोठया प्रमाणात कत्तल सुरु केली. शिबी आणि अर्जुनायननेही विरोध केला. पंरतू पराभव झाला. इ.स.पू३२५च्या सप्टेंबरमध्ये अलेक्झांडर बाबिलोनमार्गे मायदेशी परत जाण्यास निघाला. इ.स.पू ३२३ मध्ये बाबिलोन येथे मरण पावला. भारतामध्ये अलेक्झांडरचा मुक्काम **फक्त १९ महिने** होता.

munotes.in

### ४.१५.४ ग्रिकांच्या स्वारीचे परिणाम :

मॅसिडोनियाच्या अलेक्झांडरने इ.स.पू ३२६ मध्ये स्वारी केली. त्याच्या स्वारीच्या परिणामाबाबत इतिहासकारांमध्ये मतभेद आहेत. तरीपण जे काही परिणाम दिसून येतात ते पुढील प्रमाणे

**१) भारतीयांमध्ये राजकीय ऐक्याची भावना वाढली** - अलेक्झांडरच्या स्वारी वेळी छोटी-छोटी व कुचकामी राज्य होती. त्यामुळे पराभव झाला. परकीय आक्रमणापासून सरंक्षण आपण करु शकत नाही या जाणिवेतून न चंद्रगुप्त मौर्याने राज्य स्थापन केले. या स्वारीमुळे मौर्याच्या साम्राज्य विस्ताराची पार्श्वभूमी तयार झाली.

**२) ऐतिहासिक घटनांच्या नोंदी** - अलेक्झांडर बरोबर सैन्य, कारागीर, इतिहासकार होते. इतिहासकारानी त्याच्या स्वारीचे सविस्तर वर्णन, तारीख, वार लिहिला त्यामुळे त्याचे लिखाण केले. ते लिखाण एक विश्वसनिय ऐतिहासिक साधन म्हणून उपयोग पडले. त्याचे अनुकरण भारतात सुरू झाले.

**३) आर्थिक परिणाम** - स्वारीमुळे ग्रीकांशी पर्यायाने युरोपशी संबंध आला व्यापाराची भरभराट झाली. दळणवळणासाठी भूमार्ग, जलमार्ग, खुला झाला भारतात ग्रीक प्रमाणे सुबक नाणी पाडली जाऊ लागली.

**४) सांस्कृतिक परिणाम :-** विद्वानांची वैचारिक देवाण-घेवाण सुरु झाली. विद्वान, अभ्यासू मंडळी पश्चिम आशिया, युरोपमध्ये जाऊन तत्वज्ञानाचा अभ्यास करु लागले.

**५) गांधार शिल्पशैलीचा विकास :-** ग्रीकाकडून मूर्तीकला शिकले त्यातून गांधार शिल्पकलेच विकास झाला.

**६) गणराज्यातील जीवन विस्कळीत झाले/नामशेष झाली** - ग्रीकांनी पश्चिम पंजाबामधील गुराढोराची लुट केली ग्रीकांनी जिंकलेल्या प्रदेशातून असंख्य लोकांना गुलाम म्हणून नेले त्यामुळे गणराज्यातील जीवन विस्कळीत झाली.

७) शस्त्रे, डावपेच याचे ज्ञान प्राप्त झाले-

८) ग्रीकांच्या सामाजीक चालीरीतीचा भारतीयावर प्रभाव पडला.

९) भारतात नाणी पाडण्याची प्रक्रिया सुरु झाली.

१०) पाश्चात्य देशातील विचारांची भारतीयांना ओळख झाली.

११) कलाक्षेत्रात प्रभाव - गांधारशैलीचा, मुर्तीकला.

### ६) ग्रीक संस्कृतीचा भारतावर प्रभाव न पडण्याची कारणे-

१) ग्रीकांची सत्ता भारताच्या एका कोपऱ्यात - वायव्येकडे होती

२) ग्रीक सतत आपापसात लढत होते -

३) भारतीय ग्रीकांना दुष्ट - युध्दखोर विजेते समजत असे -

४) भारतीयांनी ग्रीकांना संस्कृती व कलेचे प्रसारक कधीच मानले नाही

५) भारतीय संस्कृती मुळातच प्रौढ व समृध्द होती.

६) भारतीय संस्कृती व समाज व्यवस्था काही सामावून न घेणारी होती.

७) भारतीय जीवनात प्रचंड आत्मसात केल्याने स्वतंत्र अस्तित्वातच राहिले नाही.

## ४.१६ सारांश

इ.स.पूर्व सहाव्या शतकानंतरच्या भारताचा विचार करता भारत या कालखंडात राजकीय, आर्थिक व धार्मिक दृष्टिकोनातून समृद्ध होता. महानजपदाने स्वतंत्र राजप्रणाली निर्माण केली होती. त्याचे स्वतंत्र प्रशासन होते. परिणामी या महाजनपदाना स्वतंत्र असे स्थान निर्माण झाले होते. तर धार्मिक प्रवाहात जैन व बौद्ध धर्माने स्वतंत्र असे अस्तित्व निर्माण केले होते. धमयोगापेक्षा कर्म योगाला महत्व देव महावीर व गौतम बुद्ध यांच्या नेतृत्वात समाजमनावर आपापल्या नेतृत्वाचा व आपापल्या धर्माचा स्वतंत्र ठसा उमटविला होता. परिणामी हा सर्वच कालखंड भारतीय इतिहासाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा ठरला. तसेच आपण पर्शियन व ग्रिक आक्रमणाची माहिती सुद्धा यात अभ्यासली आहे.

## ४.१७ प्रश्न

१. सोळा महाजनपदांवर सविस्तर माहिती लिहा.
२. महाजनपदांच्या प्रशासनावर भाष्य करा.
३. जैन धर्माच्या उदयास असलेले जबाबदार घटक सांगा.
४. महावीराचे जीवन व कार्य सांगा.
५. बौद्ध धर्माच्या उदयास असलेले जबाबदार घटक सांगा.
६. गौतम बुद्धाचे तत्वज्ञान विस्ताराने लिहा.
७. बौद्ध धर्माच्या भारतीय संस्कृतीवरील प्रभावांवर भाष्य करा.
८) प्रर्शियन व ग्रिक आक्रमणांची माहिती सांगा.

## ४.१८ संदर्भ


1. Bhattacharya N.N. - Ancient Rituals and their Social Contents, (Delhi, Manohar Publication) 1996
2. Jha D. N. - Ancient India in Historical Outline Motilal Banarasidas, Publishers Pvt. New Delhi.
3. Kulkarni C. M. - Ancient Indian History & Culture Karnataka Publishing House, Mumbai-1956.
4. Majumdar R. C. - Ancient India, Motilal Banarasidas, Publishers Pvt. Ltd. New Delhi - 1974
5. Mookerjee R. K. - Ancient India, llahabad, Indian Press, 1956


munotes.in

## मराठी संदर्भ ग्रंथ

१. डॉ. मोरवंचीकर आर.एस. - प्राचीन भारत, कैलास प्रकाशन, औरंगाबाद

२. प्रा. मार्डीकर मदन - प्राचीन भारत, विद्या प्रकाशन, औरंगाबाद

३. प्रा. डॉ. अनिल सिंगारे - दक्षिण भारताचा इतिहास कैलास प्रकाशन, औरंगाबाद

५. डॉ. प्रभाकर देव - प्राचीन भारत, विद्या प्रकाशन, औरंगाबाद

६. डॉ. साहेबराव गाठाळ - प्राचीन भारत, कैलास प्रकाशन, औरंगाबाद

७. डॉ. खाबडे दिनकर - प्राचीन भारत, कैलास प्रकाशन, औरंगाबाद

८. कोसंबी डी.डी. - प्राचीन भारतीय संस्कृती व सभ्यता, डायमंड प्रकाशन, पुणे

## हिन्दी

१. झा. डी. एन. - प्राचीन भारत का इतिहास - दिल्ली विश्वविद्यालय.

२. थापर रोमिला - भारत का इतिहास, राजकमल प्रकाशन, दिल्ली.

३. शर्मा रामशरण - भारत का प्राचीन इतिहास

४. श्रीवास्तव कृष्णचंद्र - प्राचीन भारत का इतिहास तथा संस्कृती.

५. कोसंबी दामोदर धर्मानदं - प्राचीन भारत की संस्कृती और सभ्यता


❖❖❖❖

munotes.in